४१ वा वर्धापन दिन

सोलापूर तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

वर्धापन दिन...

सोलापूर | शनिवार, २ ऑगस्ट २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २६४ | पाने १२+१२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com

## कर्मयोगी दीपस्तंभ



आता सहवास नसला तरी स्मृती सुंगध देत राहील...
जीवनाच्या प्रत्येक वळणावर आठवण तुमची येत राहील...

# कै. सि.ना.आलुरे गुरुजी

यांना चतुर्थ पुण्यस्मरणानिमित्त विनम्र अभिवादन!

-: अभिवादक :-

## शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर

४१वा वर्धापन दिन

सोलापूर **तरुण भारत**

SOLAPUR TARUN BHARAT


न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

४१वा वर्धापन दिन



## विचारपुष्प



हिंदू धर्माची शिकवण तर मानवता धर्माची आहे, पण आज त्यातले घटक आपल्या मुळापासून दूर जात स्वत:ला अल्पसंख्यक म्हणवू लागले आहेत. हिंदू समाज अल्पसंख्यकांमध्ये विभागला जातो आहे. कारणमीमांसा झाली पाहिजे. सगळ्यांना समान संधी, समान दर्जा, समान सोयी-सवलती असाव्यात. सगळ्यांसाठी समान नागरी कायदा असावा.

**- प्रो. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या**
रा. स्व. संघाचे चतुर्थ सरसंघचालक

# भगवा दहशतवाद सिद्ध करण्यासाठी मोहनजींच्या अटकेचा होता आदेश!

## एटीएसचे माजी अधिकारी मेहबूब मुजावर यांचा खळबळजनक खुलासा




मालेगाव बॉम्बस्फोट

◆ **पुणे, १ ऑगस्ट**

मालेगाव बॉम्बस्फोटाचा तपास सुरू असतानाच भगवा दहशतवाद ही संकल्पना रूढ करण्यासाठी आणि तसे सिद्ध करण्यासाठी तपास संस्थेने घाट घातला होता. त्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांना अटक करण्याचा आदेशही मला देण्यात आला होता, असा खळबळजनक खुलासा एटीएसचे माजी अधिकारी मेहबूब मुजावर यांनी केला आहे. त्यांच्या विधानामुळे भगवा दहशतवाद ही संकल्पना मुद्दाम रूढ करण्याचा तत्कालीन काँग्रेस सरकारचा डाव उघड झाला आहे.

मालेगाव बॉम्बस्फोटातील सर्व आरोपींची पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करण्याचा आदेश न्यायालयाने दिला. त्यापाठोपाठ एटीएसच्या माजी पोलिस अधिकाऱ्याच्या दाव्याने नव्याने खळबळ माजली आहे. एटीएसचे माजी पीएसआय मेहबूब मुजावर यांनी म्हटले आहे की, भगवा दहशतवाद सिद्ध करण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांना त्यावेळी अटक करण्याचे आदेश मला देण्यात आले होते. या आदेशामागील उद्देश 'भगवा दहशतवाद' असल्याचे सिद्ध करणे होता. विशेष म्हणजे, एटीएसने




सुरुवातीला या प्रकरणाची चौकशी केली होती, परंतु नंतर ती राष्ट्रीय तपास यंत्रणेने ताब्यात घेतली.

मुजावर म्हणाले, भगवा दहशतवाद सिद्ध करण्यासाठी डॉ. मोहनजी भागवत यांना अटक करण्यासाठी दबाव आणण्यात आला. माझ्याकडे या दाव्याचे कागदोपत्री पुरावे आहेत. आता या प्रकरणातील सर्व सात आरोपी निर्दोष सुटले आहेत, यामुळे एटीएसचे बनावट काम उघड झाले आहे. मुळात, भगवा दहशतवाद नव्हता. सगळे खोटे होते. मी कोणाच्या मागे गेलो नाही. कारण मला वास्तव माहीत होते. डॉ. मोहनजी भागवतांसारख्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाच्या महनीयाला पकडणे माझ्या क्षमतेबाहेर होते, असेही ते म्हणाले.

मुजावर यांनी केलेल्या खुलाशानंतर माजी खासदार सुब्रम्हण्यम स्वामी यांनी कडवट प्रतिक्रीया व्यक्त केली. माजी गृहमंत्री पी. चिदम्बरम यांना अटक करून त्यांची सखोल चौकशी करण्याती यावी, अशी मागणी स्वामी यांनी केली. ◂*(वृत्तसंस्था)*

### आदेश न पाळल्याने माझ्यावर खोटा खटला



» या निर्णयामुळे एका बनावट अधिकाऱ्याने केलेल्या बनावट तपासाचा पर्दाफाश झाला आहे. एटीएसने त्यावेळी कोणती चौकशी केली आणि का केली हे मी सांगू शकत नाही, परंतु मला राम कलसांगरा, संदीप डांगे, दिलीप पाटीदार आणि सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यासारख्या व्यक्तिमत्त्वांबद्दल काही गोपनीय आदेश देण्यात आले होते. हे सर्व आदेश असे नव्हते की कोणीही त्यांचे पालन करू शकेल. मी आदेशांचे पालन न केल्यामुळे माझ्यावर खोटा खटला दाखल करण्यात आला आणि त्यामुळे माझी ४० वर्षांची कारकीर्द उद्ध्वस्त झाली, असा आरोपही मुजावर यांनी केला. ■

# भारतावरील व्यापार शुल्काला आठवडाभराची स्थगिती

## ९२ देशांवर ७ ऑगस्टपासून लागू होणार शुल्क

### ट्रम्प यांचा निर्णय

◆ **वॉशिंग्टन, १ ऑगस्ट**

अमेरिकेत निर्यात होणाऱ्या भारतीय वस्तूंवर लावण्यात आलेले २५ टक्के टॅरिफ अर्थात् व्यापार शुल्काला आठवडाभराची स्थगिती देण्यात आली आहे. भारतासह ९२ देशांवर ७ ऑगस्टपासून निर्धारित टॅरिफ लादण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शुक्रवारी दिली. यापूर्वी १ ऑगस्टपासून टॅरिफ लावण्याचा निर्णय ट्रम्प यांनी घेतला होता.

भारतासह ७० पेक्षा अधिक देशांवर १० ते ४१ टक्क्यांपर्यंत टॅरिफ लादण्याच्या आदेशावर ट्रम्प यांनी स्वाक्षरी केल्याची माहिती व्हाईट हाऊसच्या प्रवक्त्याने दिली. भारतावर २५ टक्के टॅरिफ आणि अतिरिक्त दंड, पाकिस्तानवर १९ टक्के, बांगलादेशवर २० टक्के आणि अफगाणिस्तानवर १५ टक्के व्यापार शुल्क लावण्यात आले. नवीन व्यापार शुल्क अमेरिकेला आर्थिक बळ देईल आणि व्यापार संतुलन देखील निर्माण करेल. याशिवाय



अमेरिकेला आर्थिक सुरक्षा मिळेल आणि वर्षानुवर्षे सुरू असलेल्या व्यापारातील असमतोलही दूर होईल, असे ट्रम्प यांनी त्यांच्या समाज माध्यम खात्यावर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. परस्पर टॅरिफ दरांमध्ये पुढील सुधारणा या शीर्षकाच्या कार्यकारी आदेशात, ट्रम्प यांनी जगभरातील सुमारे ९२ देशांसाठी टॅरिफ दर जाहीर केला आणि ७ ऑगस्टपासून त्याची अंमलबजावणी होणार असल्याचे नमूद केले.

**वाटाघाटीसाठी दिली मुदतवाढ**

कार्यकारी आदेशावर स्वाक्षरी केल्यानंतर ट्रम्प यांनी म्हटले की, काही व्यापारी भागीदार देशांनी अमेरिकेसोबत व्यापार आणि सुरक्षा करार करण्यास सहमती दर्शविली आहे आणि काही सहमतीच्या मार्गावर आहेत. वाटाघाटी करण्यास वेळ मिळावा यासाठी मुदतवाढ दिली आहे. ◂*(वृत्तसंस्था)*

## महत्त्वाचे




### उपराष्ट्रपतीपदासाठी निवडणूक जाहीर

**नवी दिल्ली :** जगदीप धनखड यांनी काही दिवसांपूर्वी उपराष्ट्रपतीपदाचा राजीनामा दिला. त्यांनी अचानक घेतलेल्या या निर्णयामुळे आश्चर्य व्यक्त केले जात होते. मात्र प्रकृतीच्या कारणामुळे मला हा निर्णय घ्यावा लागत आहे, असे त्यांनी सांगितले होते. त्यानंतर आता उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीची घोषणा करण्यात आलेली आहे. मिळालेल्या माहितीनुसार येत्या ९ सप्टेंबर रोजी उपराष्ट्रपतीपदासाठी निवडणूक घेण्यात येणार आहे. याच दिवशी मतमोजणी होईल आणि निकाल जाहीर केला जाईल. या निवडणुकीसाठी २१ ऑगस्टपर्यंत अर्ज करता येईल. त्यामुळे आता देशाच्या उपराष्ट्रपतीपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार, याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. भारतीय निवडणूक आयोगाने उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. या कार्यक्रमानुसार ९ सप्टेंबर रोजी या निवडणुकीचा निकाल लागणार आहे. तर २१ ऑगस्टपर्यंत उमेदवारांना अर्ज करता येतील. २५ ऑगस्टपर्यंत उमेदवारी अर्ज वापस घेता येणार आहे. ९ स्पटेंबर रोजी या निवडणुकीसाठी मतदान होईल आणि याच दिवशी मतमोजणी करून निकाल जाहीर केला जाईल. जगदीप धनखड यांनी २१ जुलै रोजी रात्री आपल्या उपराष्ट्रपतीपदाचा राजीनामा दिला होता. हा निर्णय घेताना त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे आभार मानले होते. प्रकृतीच्या कारणास्तव मी हा निर्णय घेत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले होते. धनखड यांच्या या निर्णयानंतर नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा दिल्या होत्या.

# अमेरिकेकडून एफ-३५ जेट खरेदी करणार नाही

## भारताच्या निर्णयाने डोनाल्ड ट्रम्प यांना जोरदार धक्का



◆ **नवी दिल्ली, १ ऑगस्ट**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के कर लादण्याची घोषणा केल्यामुळे दोन्ही देशांमधील व्यापार संबंधांमध्ये तणाव वाढला आहे. ट्रम्प यांनी भारतावर कमी व्यापार केल्याचा आणि जास्त आयात शुल्क लावल्याचा आरोप केला आहे. या आरोपांना भारताने 'एफ-३५' लढाऊ विमानांच्या खरेदीचा करार थांबवून जोरदार प्रत्युत्तर दिले आहे.

ब्लूमबर्गच्या एका अहवालानुसार, भारताने अमेरिकेला कळवले आहे की त्यांना आता एफ-३५ स्टेल्थ लढाऊ विमाने खरेदी करण्यात रस नाही. फेब्रुवारीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिका दौऱ्यात ट्रम्प यांनी भारताला ही विमाने विकण्याची ऑफर दिली होती. पण आता भारताने हा करार थांबवला आहे, ज्यामुळे अमेरिकेला मोठा धक्का बसला आहे. यामागचे मुख्य कारण म्हणजे, मोदी सरकारचे मेक इन इंडिया धोरण. भारताची संरक्षण क्षेत्रातील प्राथमिकता आता स्वदेशी डिझाईन आणि उत्पादनावर केंद्रित आहे. भारत सरकार अशा संरक्षण करारांवर भर देत आहे, ज्यात संयुक्त उत्पादन आणि तंत्रज्ञान हस्तांतरण शक्य होईल.

यापूर्वी ट्रम्प यांनी भारत-रशिया संबंधांबद्दल बोलताना त्यांना (भारताला) रशियासोबत जे करायचे ते करू द्या, असे म्हटले होते. भारत नेहमीच रशियाकडून मोठी लष्करी साहित्य खरेदी करतो आणि रशियाचा सर्वात मोठा ऊर्जा ग्राहक देखील आहे, असेही ट्रम्प म्हणाले होते. सध्या तरी भारत सरकार व्यापार चर्चा व्यवस्थित ठेवण्यावर लक्ष केंद्रित करत आहे. पण संरक्षण खरेदीचा निर्णय मात्र सध्या बाजूला ठेवण्यात आला आहे, असे सरकारी सूत्रांनी सांगितले. ◂*(वृत्तसंस्था)*

### तात्काळ सूडाची कारवाई नाही, पण पर्यायी उपायांवर विचार

» **ब्लूमबर्गच्या अहवालानुसार, ट्रम्प यांच्या कर लावण्याच्या घोषणेवर भारत तात्काळ कोणताही सूड घेणार नाही. त्याऐवजी, भारत सरकार व्हाइट हाऊसला शांत करण्यासाठी काही पर्यायी उपायांवर विचार करत आहे. यामध्ये पुढील तीन ते चार वर्षांत अमेरिका-भारत यांच्यातील व्यापार असमतोल कमी करण्यासाठी भारताकडून नैसर्गिक वायू, दळणवळण उपकरणे आणि सोन्याची आयात वाढवण्याची शक्यता आहे.** ■

### एफ-३५ जेटलाही अपघात

» अभेद्य मानले जाणारे अमेरिकेचे एफ-३५ हे लढाऊ विमान दोन दिवसांपूर्वी कॅलेफोर्नियातील लेमूरे नौदल तळाजवळ कोसळले. अपघाताचे कारण जाहीर करण्यात आले नाही. अपघातातून वैमानिक थोडक्यात बचावला. एवढे महागडे आणि शक्तीशाली समजले जाणारे लढाऊ विमान कोसळल्याने त्याच्या क्षमतेविषयी शंका निर्माण झाल्या आहेत. ■





# प्रमिलताईंचे पार्थिव 'एम्स'च्या स्वाधीन

## ● देहदानाची इच्छा पूर्ण ● तन समर्पित, मन समर्पित, और यह जीवन समर्पित

**नागपूर, १ ऑगस्ट**

राष्ट्र सेविका समितीच्या माजी प्रमुख संचालिका प्रमिलताई मेढे यांचे पार्थिव त्यांच्या इच्छेनुसार आज शुक्रवारी सकाळी मिहानमधील अ. भा. आयुर्विज्ञान संस्थेच्या (एम्स) स्वाधीन करण्यात आले.

त्यांना अखेरचा निरोप देताना समितीच्या प्रमुख संचालिकांसह असंख्य सेविका व इतर उपस्थितांना अश्रू अनावर झाले होते. प्रमिलताईंचा १९६५ पासून निवास असलेली अहिल्या मंदिराची वास्तू व परिसरही जणू स्तब्ध होता. काल गुरुवारी दीर्घ आजाराने सकाळी ९.०५ वाजता धंतोलीमधील देवी अहिल्या मंदिरात प्रमिलताईंचे देहावसान झाले. त्यांचे अंतिम दर्शन घेण्यासाठी सेविका आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा ओघ सुरूच होता. रात्री मुख्यमंत्री फडणवीसांनी अंतिम दर्शन घेतले.

### अखेरचा प्रवास

» **सकाळी ठीक ८ वाजता प्रमिलताईंचा अखेरचा प्रवास सुरू झाला. त्यांचे पार्थिव शेजारच्या दांडेकर सभागृहात ठेवण्यात आले. तेथे अंतिम प्रणाम तसेच प्रार्थना झाली. प्रमिलताईंच्या इच्छेनुसार त्यांच्या तीन पत्रांचे वाचन करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी व इतर मान्यवरांचे शोकसंदेश वाचण्यात आले.** ■

# देवेगौडांचा नातू प्रज्वल रेवण्णा अत्याचार प्रकरणात दोषी

## ● आज शिक्षेची घोषणा

**बंगळुरू, १ ऑगस्ट**

कर्नाटकच्या विशेष न्यायालयाने जनता दल (एस)चे माजी खासदार प्रज्वल रेवण्णाला बलात्कार आणि लैंगिक छळाच्या प्रकरणात मोठा धक्का दिला. न्यायालयाने या प्रकरणात रेवण्णाला दोषी ठरवले. शनिवारी त्याच्या शिक्षेची सुनावणी होणार आहे.

न्यायालयाने दोषी ठरवल्याचा निर्णय देताच, रेवण्णा न्यायालयातच ढसाढसा रडू लागला. माजी खासदार प्रज्वल रेवण्णाला सेक्स टेप प्रकरणात दोषी ठरवण्यात आले आहे. न्यायालयाकडून उद्या शनिवारी त्याला शिक्षा जाहीर केली जाणार आहे. प्रज्वल रेवण्णा हा देशाचे माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांचा नातू आहे.



प्रज्वल रेवण्णावर लैंगिक छळाचे अनेक गुन्हे दाखल आहेत. याशिवाय त्याच्यावर अनेक महिलांवर बलात्कार केल्याचाही आरोप आहे. त्याच्यावरील आरोपांमुळे जेडीएसने त्याला पक्षातून निलंबितही केले होते. घरात काम करणाऱ्या एका महिलेने त्याच्याविरुद्ध लैंगिक छळाची तक्रार दाखल केली होती. याशिवाय बंगळुरूमध्ये सार्वजनिक ठिकाणी अनेक पेन ड्राइव्ह सापडले होते.

पेन ड्राइव्हमध्ये तीन ते पाच हजार व्हिडीओ असल्याचा दावा करण्यात आला होता, ज्यामध्ये प्रज्वल महिलांचा लैंगिक छळ करताना दिसला. व्हिडीओंमध्ये महिलांचे चेहरे स्पष्ट दिसत होते. प्रज्वल रेवण्णावर लैंगिक छळाचे अनेक गुन्हे दाखल झाले. या प्रकरणाच्या चौकशीसाठी एसआयटी स्थापन करण्यात आली होती.




लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टच्या वतीने दिला जाणारा यंदाचा लोकमान्य राष्ट्रीय पुरस्कार केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना पुणे येथे प्रदान करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, मंत्री चंद्रकांत पाटील, ट्रस्टचे अध्यक्ष रोहित टिळक, विश्वस्त आणि माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे उपस्थित होते.

# नेत्यांनी सत्य बोलावे : गडकरी

◆ **पुणे, १ ऑगस्ट**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा कार्यकर्ता असलो, तरी मी संघर्षवृत्तीचा आहे. राजकारणात खरे आणि स्पष्ट बोलणे चालत नाही. मात्र, नेत्यांनी सकारात्मक राहून सत्य बोललेच पाहिजे, असे केंद्रीय रस्ते आणि परिवहनमंत्री नितीन गडकरी यांनी येथे सांगितले. सत्कार हा व्यक्तीच्या कार्याचा होत असतो. त्यासाठी तो पात्र असावा लागतो. लोकमान्य टिळक पुरस्कारासाठी मी पात्र नाही, मात्र, लोकमान्यांच्या विचारांनुसार कायम काम करत राहणार असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टच्या वतीने दिला जाणारा यंदाचा लोकमान्य राष्ट्रीय पुरस्कार नितीन गडकरी यांना शुक्रवारी प्रदान करण्यात आला. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार आदी उपस्थित होते. ◂*(वृत्तसंस्था)*

# शिवी दिल्यास ५०० रुपये दंड!

## ● सातारा गाव ठरले पहिले 'शिवीमुक्त गाव' ● ग्रामसभेत एकमताने ठराव


◆ **चंद्रपूर, १ ऑगस्ट**

मूल्याधिष्ठीत गाव म्हणून चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर तालुक्याच्या साताऱ्याची ओळख आहे. यंदाच्या महाराष्ट्र दिनी या गावच्या ग्रामसभेत 'शिवीमुक्त गाव' करण्याच्या प्रस्तावाला एकमताने मान्यता दिली. कोणीही महिलांचा अपमान करणारी भाषा वापरल्यास, शिवी दिल्यास त्याच्याकडून ५०० रुपयांचा दंड आकारला जाईल. दंड न भरल्यास संबंधित व्यक्तीला ग्रामपंचायतीकडून कोणतेही सरकारी दाखले दिले जाणार नाहीत, असा निर्णय घेण्यात आला.

गावातील वादावादीत आई-बहिणींवरून अपमानास्पद शिव्यांचा वापर वाढत असल्याने दीड हजार लोकसंख्या असलेल्या साताराच्या ग्रामपंचायतीने महिलांच्या सन्मानासाठी अभिनव आणि ठोस पाऊल उचलले. ग्रामपंचायतीचे सरपंच गजानन गुळधे यांनी यासाठी पुढाकार घेतला. भांडणे होत असतील, तर ती समजुतीने मिटवावी, पण स्त्रियांबाबत अपमानास्पद शब्दप्रयोग यापुढे खपवून घेतला जाणार नाही, असा संदेश त्यांनी ग्रामसभेत दिला. सुरुवातीला काहींनी या निर्णयाला विरोध दर्शविला, मात्र गावातील शिक्षक, आरोग्य सेविका व ज्येष्ठ नागरिकांनी योग्य समज दिल्याने सगळ्यांनी त्यास पाठिंबा दिला.




या सकारात्मक निर्णयामुळे गावात नव्या पिढीवर चांगले संस्कार होतील, अशी भावना गुळधे यांनी व्यक्त केली. या प्रस्तावाला शिवीमुक्त गाव, दारूबंदी व स्वच्छता मोहीम यासारख्या इतर




सामाजिक उपक्रमांची जोडही देण्यात आली.

याशिवाय, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्रवेशद्वार व वाचनालय, छत्रपती शिवाजी महाराज व्यासपीठ आणि सार्वजनिक सभागृह, सोलरवर चालणारा पाणीपुरवठा आणि जलशुद्धीकरण यंत्र, महिलांसाठी रोजगार निर्मिती केंद्र, वृद्ध विश्रांती निवारा, ओला-सुका कचरा व्यवस्थापन व इलेक्ट्रिक कचरा गाडी व्यवस्था, बंदिस्त गटारे, सार्वजनिक शौचालये, अंगणवाडी व शाळांचे बांधकाम, वृक्षारोपण व संगोपन यशस्वी राबवले गेले. या उत्कृष्ट कामगिरीसाठी गावाला २०२२-२३ चा तालुकास्तरीय संत गाडगेबाबा पुरस्कार, २०२०-२१ चा आर. आर. पाटील स्मार्ट ग्राम पुरस्कार, २०२०-२१ चा जिल्हास्तरीय संत गाडगेबाबा पुरस्कार तसेच २०२२-२३ नागपूर विभागातून ग्राम स्वच्छतेचा दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार मिळाला आहे. सरपंच गुळधे आता गावात युवकांसाठी रोजगार निर्मितीच्या संधी शोधत आहेत. ◂*(तभा वृत्तसेवा)*

### जाती, धर्मातील दुरावा कमी होण्यासाठी छत्रपतींचा पुतळा



» छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे, तर देशाचे प्रेरणास्थान आहेत. त्यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करताना कधीच जाती, धर्माला मध्ये आणले नाही. 'माझी जात', 'माझा धर्म', 'माझा देव', 'माझे गुरू' यावर अधिक भर दिल्याने समाजात दुरावा निर्माण होतो. हीच भावना लक्षात घेऊन गावातील नागरिकांनी एकत्र येत श्रमदान व वर्गणीच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा गावात उभारला आहे. ■

**महत्वाची सूचना**
दै. सोलापूर तरुण भारतच्या ४१ व्या वर्धापन दिनामित्त १ ते ६ ऑगस्ट दरम्यान दररोज **'विकसनशील सोलापूर'** ही १२ पानी विशेष पुरवणी प्रसिध्द करीत आहोत. याची वाचक, विक्रेते आणि जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.
- व्यवस्थापक




महत्त्वाचे



## पत्रकारांना आता दरमहा २० हजार पेन्शन मिळणार

**सोलापूर** : राज्य शासनाने आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेतील सन्माननिधी दरमहा ११ हजार रुपयांवरून वाढवून २० हजार रुपये करण्याचा निर्णय यापूर्वीच घेतला होता. मात्र, त्यासंदर्भातील शासन निर्णय शुक्रवारी काढण्यात आला आहे. त्यामुळे पत्रकारांना २० हजार रुपये पेन्शन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. शासनाने आजपासून संबंधित लाभार्थी पत्रकारांना वाढीव सन्माननिधी प्रत्यक्ष अदा करण्यास सुरुवात केली आहे. यानुसार, आता पात्र ज्येष्ठ पत्रकारांना दरमहा २० हजार रुपये सन्माननिधी प्राप्त होणार आहे. यामुळे राज्यभरातील ज्येष्ठ पत्रकारांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. याबद्दल राज्य मराठी पत्रकार संघाने व इतर पत्रकार संघांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे तसेच मुख्यमंत्री फडणवीस यांचे आभार मानले आहेत.

## आक्षेपार्ह पोस्टनंतर दगडफेक, जाळपोळ; पोलिसांनी फोडल्या अश्रूधुराच्या नळकांड्या

# पुणे महामार्गावरील यवतमध्ये २ समाजात वाद अन् तणाव

**पुणे, दि. १ ऑगस्ट**

पुण्याच्या दौंड तालुक्यातील सोलापूर-पुणे महामार्गावरील यवत येथे दोन गटांत जातीय तणाव निर्माण झाला आहे. व्हॉट्सपवरील एका आक्षेपार्ह पोस्टमुळे हा वाद भडकला. त्यात दोन्ही गटांनी एकमेकांवर दगडफेक केली. त्यानंतर पोलिसांनी वेळीच घटनास्थळी धाव घेऊन स्थितीवर नियंत्रण मिळवले. सध्या या ठिकाणी तणावपूर्ण शांतता आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांकडून या घटनेची माहिती घेतली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही थेट घटनास्थळी स्थितीचा आढावा घेतला.

यासंबंधीच्या माहितीनुसार, दौंड तालुक्यातील यवत गावातील एका समुदायाच्या तरुणाने शुक्रवारी सकाळी सोशल मीडियावर एक आक्षेपार्ह पोस्ट केली. या पोस्टची माहिती मिळताच गावात तणाव निर्माण झाला. त्यानंतर दुपारी १२ च्या सुमारास यवतचा आठवडी बाजार बंद करण्यात आला. यावेळी एका गटाच्या लोकांनी काही दुचाकी पेटवून दिल्या. या घटनेमुळे गावात तणावपूर्ण स्थिती उद्भवली. यवतचे पोलिस निरीक्षक नारायण देशमुख यांनी सांगितले की, आक्षेपार्ह तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याची चौकशी सुरू आहे. सध्याचा तणाव पाहता गावात मोठा बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, आक्षेपार्ह पोस्ट करणारा तरुण यवतच्या सहकार नगर भागात राहतो. पोस्टनंतर संतप्त जमावाने त्याच्या घराची तोडफोड केली. यावेळी काही लोकांनी एका धार्मिक स्थळावर दगडफेकही केली. यामुळे तणाव वाढला. पण पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्यामुळे पुढील अनर्थ टळला. या घटनेचे अनेक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झालेत. उल्लेखनीय बाब म्हणजे गत शनिवारी २६ जुलै रोजी यवतच्या नीळकंठेश्वर मंदिरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचा कथित अवमान झाला होता. या घटनेमुळे निर्माण झालेला तणाव काहीसा निवळला होता. पण त्यानंतर लगेचच ही घटना घडल्यामुळे येथील तणावात मोठी वाढ झाली आहे. भाजपचे वादग्रस्त आमदार गोपीचंद पडळकर व राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वात काल यवतमध्ये एक मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चामुळे गावात तणाव निर्माण झाला होता. हा तणाव आज दुसऱ्या दिवशीही कायम होता. त्यातूनच आजची घटना घडल्याचा दावा केला जात आहे. दौंडचे आमदार राहुल कूल यांनी याविषयी बोलताना सांगितले की, यवतमध्ये मागील दोन-तीन दिवसांपासून तणावाचे वातावरण होते. सर्वांशी संवाद साधून हा तणाव निवळण्याचा प्रयत्न सुरू होता. सध्या तिथे पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. आम्ही परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करत आहोत. दरम्यान राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सरकारवर खरमरीत टिका केली आहे.





### कलम १४४ लागू : अजित पवार

काहींनी आक्रमक भूमिका घेतली आणि या ठिकाणी तोडफोडीची घटना घडली. त्या संदर्भात योग्य ती कारवाई होईल. आपला महाराष्ट्र नेहमीच सर्वांना बरोबर घेऊन जाणारा आणि जातीय सलोखा ठेवणारा महाराष्ट्र आहे. जी घटना घडली त्या घटनेत काही प्रमाणात नुकसान झाले आहे. यामध्ये दोन वाहनांच्या काचा फुटलेल्या आहेत. मध्य प्रदेशात कोणत्यातरी एका घटनेची बातमी आणि त्यात एक फोटो टाकून स्टेटस ठेवल्यानंतर घटनेचा उद्रेक झाला ही वस्तुस्थिती आम्ही नाकारत नाही. आता या ठिकाणी १४४ कलम लागू करण्यात आलेलं आहे.



**मुख्यमंत्र्यांनी घेतला स्थितीचा आढावा :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यवत येथील परिस्थिती पूर्णतः नियंत्रणात असल्याचा दावा केला आहे. ते म्हणाले, मी एका कार्यक्रमात होतो. आताच मी यवतच्या प्रकरणाबाबत माहिती घेतली. त्या ठिकाणी एका बाहेरच्या व्यक्तीने चुकीचं स्टेटस ठेवल्यामुळे तणाव निर्माण झाला. कोणत्यातरी पुजाऱ्याने बलात्कार केला वैगेरे अशा आशयाचे स्टेटस ठेवण्यात आले होते. यामुळे लोक रस्त्यावर आले. जमावाला पांगवण्यासाठी लाठीचार्ज देखील करावा लागला. आता परिस्थिती नियंत्रणात आहे. सध्या दोन्ही समाजाची लोक एकत्र बसले आहेत. तणाव संपवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. याठिकाणी तणाव उत्पन्न होईल अशी घटना घडली तर त्याच्यावर कठोर कारवाई केली जाईल, असे ते म्हणाले.

**आक्षेपार्ह स्टेटसमुळे वाद झाला**

या घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलिस अधीक्षक (ग्रामीण) संदीप गिल यांनी यवतच्या दिशेने धाव घेतली. त्यांनी पोलिसांना स्थिती नियंत्रणात आणण्यासाठी योग्य ते निर्देश दिले. यावेळी बोलताना ते म्हणाले, एका तरुणाने आक्षेपार्ह स्टेटस ठेवल्यामुळे गावात तणाव निर्माण झाला होता. पोलिसांनी आरोपी तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याच्यावर कारवाईही करण्यात आली आहे. या घटनेनंतर काही लोक एकत्र जमल्यामुळे गावात तणाव निर्माण झाला.

# अखेर कोल्हापुरात मुंबई उच्च न्यायालयाचे सर्किट बेंच मंजूर

### कोल्हापुरात वकिलांचा जल्लोष

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १ ऑगस्ट:**

मुंबई उच्च न्यायालयाचे सर्किट बेंच कोल्हापुरात सुरू करण्याबाबत शुक्रवारी राज्य शासनाने अधिसूचना जारी केली आहे. १८ ऑगस्ट पासून हे काम कोल्हापुरात सुरू होणार आहे. यामुळे कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पक्षकारांना न्याय लवकर मिळण्याची संधी उपलब्ध होणार आहे. हा निर्णय करताना कोल्हापुरातील सामान्य जनतेने आनंद व्यक्त केला.

कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि सोलापूर या सहा जिल्ह्यांसाठी मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ , सर्किट बेंच कोल्हापूर मध्ये स्थापन करण्यात यावे या मागणीसाठी गेल्या चार दशकापासून कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, रत्नागिरी, सिंधूदुर्ग येथील वकील खंडपीठ कृती समितीच्या माध्यमातून लढा देत आहेत.

मुंबई उच्च न्यायालयाचे सर्किट बेंच कोल्हापुरात स्थापन करण्यासाठी योग्य स्थिती उपलब्ध आहे. यासंबंधीचे सादरीकरण खंडपीठ कृती समितीचे निमंत्रकासह सहा जिल्ह्यातील वकिलांच्या शिष्टमंडळाने उच्च न्यायालयातील पाच न्यायाधीशासमोर सादरीकरण केले. न्यायाधीशांनी याप्रश्नी अभ्यास करून निर्णय देण्यात येईल असे आश्वत केले होते. सर्किट बेंच स्थापण्याच्या अनुषंगाने सकारात्मक चर्चा झाल्याचे कृती समितीचे निमंत्रक ॲड. सर्जेराव खोत यांनी म्हटले आहे.कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या सहा जिल्ह्यातील अधिकार क्षेत्राचा वापर करण्याकरिता कोल्हापूर येथे मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन करण्याबाबतचा पत्रव्यवहार केला आहे. नियमित खंडपीठाची स्थापना होईपर्यंत सर्किट बेंच स्थापन व्हावे, अशीही मागणी कोल्हापूर जिल्ह्यातील आजचे पालकमंत्री, खासदार, आमदार यांनी सातत्याने लावून धरली होती.

### तिरुपती मंदिरात रील्स बनवणाऱ्यांवर होणार कारवाई

**नवी दिल्ली** : समाज माध्यमांवर रील बनवण्याचे प्रस्थ खूपच माजले आहे. लोक प्रत्येक ठिकाणी रील बनवत असतात आणि समाज माध्यमांवर शेअर करतात. अशा स्थितीत ते मंदिरांनाही सोडत नाहीत.

आता तिरुपती देवस्थानने मात्र मंदिर परिसरात रील बनवणाऱ्यांवर कारवाई करण्याचे जाहीर केले आहे. तिरुमला तिरुपती देवस्थानम् अर्थात टीटीडीने मंदिर परिसरात रील्स बनवणाऱ्यांच्या विरोधात कडक आदेश जारी केले आहेत. गेल्या काही दिवसात काही लोकांनी मंदिराच्या परिसरात आक्षेपार्ह व्हिडीओ बनवले आणि ते समाज माध्यमांवर शेअर केले.

# नांदणी मठाची 'माधुरी' हत्तीण परत येणार?

**कोल्हापूर, दि. १ ऑगस्ट:**

नांदणी मठाच्या हत्तीणीला वनतारामधून परत आणण्यासाठी आवश्यक ती कायदेशीर कारवाई करू, त्यासाठी वनताराही सकारात्मक असल्याची माहिती कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी म्हटले आहे. तसेच मठाची हत्तीण वनतारामध्ये नेण्यात आपली कोणतीही भूमिका नाही, जे काही झाले आहे ते सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर झाल्याचे वनताराच्या सीईओंनी स्पष्ट केले आहे.

कोल्हापूर येथील नांदणी मठातील माधुरी हत्तीणीला सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर वनतारामध्ये नेण्यात आले. त्यामुळे कोल्हापूरमध्ये असंतोष निर्माण झाला होता. जनतेचा विरोध पाहता वनताराचे सीईओ आणि मठाधीपती यांच्यात बैठक झाली. या बैठकीला कोल्हापूरचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर, खासदार धैर्यशील माने, खासदार धनंजय महाडिक उपस्थित होते. या बैठकीनंतर नांदणी मठाने त्यासाठी सर्व कायदेशीर बाबी पूर्ण कराव्यात आणि वनतारा त्यासाठी सर्व ते सहकार्य करेल, असे वनताराच्या सीईओंनी म्हटले आहे. हवे असेल तर नांदणीच्या मठामध्ये वनताराचे एक यूनिट सुरू करू. आम्हाला जर कोर्टाच्या सूचना आल्या तर आम्ही त्या पद्धतीने कार्यवाही करू. आमची यामध्ये शून्य भूमिका आहे. लोकांमध्ये तीव्र आक्षेप आहे, पण आमचा या प्रकरणाशी संबंध नसल्याचे वनताराच्या सीईओंनी म्हटल्याची माहिती प्रकाश आबिटकर यांनी दिली आहे.पत्रकारांशी बोलताना प्रकाश आबिटकर, कोल्हापूरवासियांची भावना सर्वोच्च न्यायालयात मांडू. एखादा निर्णय ज्या वेळी सर्वोच्च न्यायालय घेते त्यावेळी फक्त जनभावना महत्त्वाची नाही. त्या जनभावनेइतकीच कायदेशीर प्रक्रियाही महत्त्वाची आहे.



# घोटाळेबाज आयुक्त अनिल पवार चौरस फुटामागे घ्यायचा २५ रुपये!

### ईडीकडून कोट्यावधीची मालमत्ता जप्त

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १ ऑगस्ट:**

सेवानिवृतीनंतर दुसऱ्या दिवशी सक्तवसुली संचालनाल्याच्या (ईडी) रडारवर आलेल्या वसई विरार महापालिकेचे आयुक्त अनिल कुमार पवार यांनी कोट्यावधीची मालमत्ता स्पष्ट झाले आहे. विविध प्रकल्पाच्या मंजुरीसाठी ते प्रति चौरस फुटामागे २० ते २५ रुपये दर आकारत असल्याचे अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासातून समोर आले आहे. पवार हे २८ जुलैला रिटायर झाले. त्यानंतर ईडीने त्यांच्या निवासस्थानासह एकूण १२ ठिकाणी छापे टाकले होते.



मनी लॉन्ड्रिंग प्रतिबंधक कायदा (पीएमएलए) २००२ अंतर्गत मुंबई, पुणे, नाशिक व सातारा येथील १२ ठिकाणी कारवाई करून एकूण १.३३ कोटीची रोकड, अनेक मालमत्तांचे कागदपत्रे, बँक डिपॉझिट स्लिप्स आणि डिजिटल डिव्हायसेस जप्त करण्यात आले आहेत. विशेष म्हणजे अनिल पवार यांनी वसई-विरार महापालिकेचे मध्ये आयुक्तपद स्वीकारल्यानंतर मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार सुरु झाला. कोणत्याही प्रकल्पाला परवानगी देताना प्रति चौरस फूट २०-२५ रुपये, तर नगररचना उपसंचालक यांचे १० रुपये प्रति चौरस फूट कमिशन आकारल्याचेही ईडीच्या तासात समोर आले आहे. ही कारवाई जयेश मेहता, वाय. एस. रेड्डी आणि इतरांविरोधातील महापालिकेच्या घोटाळ्याच्या प्रकरणात झाली आहे. वसई-विरार पालिकेच्या हद्दीत २००९ पासून बेकायदेशीर व्यावसायिक इमारतींच्या बांधकामात अनिल पवार आणि अन्य अधिकाऱ्यांचा सहभाग असल्याचे तपासात उघड झाले आहे. अधिकाऱ्यांच्या संगनमतातून मोठ्या प्रमाणावर काळा पैसा बांधकाम परवानगी मिळवण्यासाठी वापरला गेला.

# 'श्यामची आई' सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट

- नाळ-२ चा भार्गव सर्वोत्कृष्ट बाल कलाकार
- ७१ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांची घोषणा
- शाहरुख खान प्रथमच बेस्ट ॲक्टर

**नवी दिल्ली, दि. १ ऑगस्ट:**

शुक्रवारी दिल्लीत ७१ व्या राष्ट्रीय पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. शाहरुख खानला 'जवान' चित्रपटासाठी आणि विक्रांत मेस्सीला १२th फेल चित्रपटासाठी संयुक्तपणे सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार देण्यात आला आहे. मराठी चित्रपटांसाठी 'श्यामची आई' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाचा पुरस्कार मिळाला आहे. त्यासोबतच नाळ-२ चित्रपटातील भार्गव जगतापला सर्वोत्कृष्ट बाल कलाकाराचा पुरस्कार मिळाला आहे.



राणी मुखर्जीला 'मिसेस चॅटर्जी व्हर्सेस नॉर्वे' चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार देण्यात आला आहे. कटहलला सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपटाचा पुरस्कार देण्यात आला आहे. 'सिर्फ एक बंदा काफी है' या हिंदी चित्रपटाला सर्वोत्कृष्ट संवादाचा पुरस्कार मिळाला आहे. या चित्रपटाचे संवाद दीपक किंगराणी यांनी लिहिले आहेत. ७१ व्या राष्ट्रीय पुरस्कारात, शाहरुख खान आणि विक्रांत मेस्सी यांना संयुक्तपणे सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला आहे. शाहरुखला त्याच्या 'जवान' चित्रपटासाठी आणि विक्रांतला '१२ वेंह फेल' चित्रपटासाठी हा पुरस्कार मिळाला आहे. 'जवान' हा एक ॲक्शन थ्रिलर चित्रपट होता. या चित्रपटात शाहरुख दुहेरी भूमिकेत दिसला होता. दुसरीकडे, विक्रांतचा चित्रपट एक चरित्रात्मक नाटक होता. हा चित्रपट आयपीएस अधिकारी मनोज कुमार शर्मा आणि त्यांची पत्नी आयआरएस अधिकारी श्रद्धा जोशी यांच्या जीवनावर आधारित होता. राणी मुखर्जीचा २५ वर्षांच्या कारकिर्दीतील हा पहिलाच राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार आहे. तिचा 'मिसेस चॅटर्जी व्हर्सेस नॉर्वे' हा चित्रपट एका सत्य घटनेवर आधारित कायदेशीर नाटक आहे.

हा चित्रपट सॉफ्टवेअर इंजिनियर सागरिका चक्रवर्ती यांच्या 'द जर्नी ऑफ अ मदर' या आत्मचरित्रापासून प्रेरित आहे. आशिमा चिब्बर दिग्दर्शित या चित्रपटात राणीने सागरिकाची भूमिका साकारली आहे. २०११ मध्ये, जेव्हा सागरिका तिचा पती अनुरूप भट्टाचार्यसोबत नॉर्वेमध्ये राहत होती, तेव्हा तिच्या मुलांना नॉर्वेजियन अधिकाऱ्यांनी काढून घेतले. सागरिका तिच्या मुलांच्या ताब्यासाठी नॉर्वेजियन सरकारशी लढते. तो प्रवास चित्रपटात दाखवण्यात आला आहे. कटहलला सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपटाचा पुरस्कार देण्यात आला.

**राष्ट्रीय पुरस्कार विजेत्यांना मिळते लोटस पदक**

राष्ट्रीय पुरस्कार विजेत्यांना पदक म्हणून सिल्व्हर लोटस किंवा गोल्डन लोटस दिले जाते. यासोबतच रोख बक्षीस देखील दिले जाते. तथापि, काही श्रेणींमध्ये फक्त गोल्डन लोटस किंवा सिल्व्हर लोटस दिले जाते.हा समारंभ केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाद्वारे आयोजित केला जातो, ज्याचे संपूर्ण काम चित्रपट महोत्सव संचालनालयाच्या (डीएफएफ) देखरेखीखाली केले जाते. त्यानंतर, राष्ट्रपती या पुरस्कारांचे वितरण करतात.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# मालेगाव : एक ऐतिहासिक निर्णय

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातील साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर आणि लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित यांच्यासह सातही आरोपींची विशेष एनआयए न्यायालयाने निर्दोष मुक्तता केल्याचा निर्णय ऐतिहासिक आणि समस्त हिंदूंना दिलासादायक म्हणावा लागेल. 'भगवान के घर देर है, अंधेर नहीं', असे म्हटले जाते. आता न्यायालयांच्या बाबतीतही तसेच म्हणावे लागेल. न्यायालयाच्या या निर्णयाने परमपवित्र आणि पूजनीय अशा भगव्या ध्वजाचे स्वत:च्या राजकीय स्वार्थासाठी राजकारण करणाऱ्या सडक्या मानसिकतेच्या काँग्रेसी नेत्यांच्या चेहऱ्याचा रंग उडाला असेल, यात शंका नाही.

१७ वर्षांनंतर या खटल्याचा निकाल लागला. न्यायालयाने या सर्वांची निर्दोष मुक्तता केल्याबद्दल आनंद व्यक्त करायचा की निर्दोष असताना एक-दोन नाही तर तब्बल १७ वर्षे या सर्वांना तुरुंगात अनन्वित हालअपेष्टा भोगाव्या लागल्या, अत्याचाराचा सामना करावा लागला, याबद्दल खेद व्यक्त करायचा, हे कळत नाही. साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर, कर्नल प्रसाद पुरोहित यांच्यासह रमेश उपाध्याय, अजय राहिरकर, सुधाकर चतुर्वेदी, समीर कुळकर्णी आणि सुधाकर द्विवेदी या सात जणांची या खटल्यातून निर्दोष मुक्तता झाली. यातील रमेश उपाध्याय हे लष्करातील निवृत्त मेजर होते. या प्रकरणात लष्करातील काही अधिकाऱ्यांसह अभिनव भारत संघटनेच्या काही प्रमुख लोकांना आरोपी करण्यात आले होते. मालेगाव बॉम्बस्फोटात बळी पडलेल्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी २ लाख आणि जखमींना ५० हजार रुपये देण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहे. मात्र न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली असली तरी या सातही जणांच्या आयुष्यातील मोलाची अशी जी १७ वर्षे वाया गेली, या काळात त्यांचे अपरिमित, जे आर्थिक, शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि कौटुंबिक असे कधीही भरून न निघणारे जे नुकसान झाले, त्याची भरपाई आता कोण आणि कशी करणार, याचे उत्तर मिळाले पाहिजे. लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित यांच्यासोबतच्या तुकडीतील सर्व सहकारी लष्करात मोठ्या पदांवर पोहोचले, ब्रिगेडियरही झाले, पण पुरोहित यांना त्याच पदावरून निवृत्त व्हावे लागले. हिंदू संघटनांच्या अनेक नेत्यांना षडयंत्रात फसवण्याचे कारस्थान काँग्रेसी नेत्यांनी रचल्याची कबुली या प्रकरणातील आता निवृत्त पण तेव्हा कार्यरत असलेल्या तपास अधिकाऱ्यांनी देत काँग्रेस नेतृत्वाच्या हिंदुविरोधी मानसिकतेचा बुरखा फाडला आहे. मालेगावात दोन बॉम्बस्फोट झाले. पहिला बॉम्बस्फोट ८ सप्टेंबर २००६ ला झाला, यात ३७ जण ठार झाले. विशेष म्हणजे या प्रकरणातील सर्व आरोपींची २०१६ मध्ये निर्दोष सुटका झाली. दुसरा बॉम्बस्फोट २९ सप्टेंबर २००८ ला झाला, यात ६ जण ठार, तर शंभरावर जखमी झाले होते. विशेष म्हणजे पहिल्या बॉम्बस्फोटातील बळीसंख्या कितीतरी जास्त असताना त्याचा पाहिजे तसा गाजावाजा झाला नाही, पण दुसऱ्या बॉम्बस्फोटातील बळीसंख्या कितीतरी पटीने कमी असताना जाणीवपूर्वक हे प्रकरण तापवण्यात आले. यातून हिंदू समाजाला लक्ष्य करण्यात आले. हिंदुस्थानात हिंदू समाजाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा, त्याचा बळीचा बकरा करण्याचा प्रयत्न झाला, ही अतिशय खेदाची बाब म्हणावी लागेल. सुदैवाने हिंदू समाजावर आलेले हे ग्रहण न्यायालयाच्या निर्णयाने सुटले आहे.

साध्वी प्रज्ञासिंह, प्रसाद पुरोहित यासह सात जणांना या बॉम्बस्फोट प्रकरणात पकडण्यात आले म्हणण्यापेक्षा यात अडकवण्यात आले, असे म्हणणे अधिक सयुक्तिक होईल. पहिला बॉम्बस्फोट हा अल्पसंख्यक समाजातील लोकांनी घडवला, तर दुसऱ्याचा दोष हिंदू समाजावर ढकलण्यात आला. देशात याआधीही अनेक बॉम्बस्फोट झाले, पण धर्माच्या आधारावर त्याची विभागणी कधी झाली नाही. पण यावेळी प्रथमच हिरव्या दहशतवादाला वाचवण्यासाठी भगव्या दहशतवादाचा उल्लेख करण्यात आला. काँग्रेस हा पक्ष सुरुवातीपासूनच हिंदुद्वेष्टा असल्यामुळे मुस्लिम तुष्टीकरणातून त्याने भगवा दहशतवादाचे नॅरेटिव्ह सेट करण्याचा प्रयत्न केला, पण या देशातील सुजाण आणि संयमी हिंदूंनी त्याचा हा प्रयत्न हाणून पाडला. दहशतवादाला कोणताही धर्म आणि रंग नसतो, असे म्हटले जाते. न्यायालयाने आपल्या निकालातून याकडे लक्ष वेधले आहे. सर्व मुस्लिम दहशतवादी नाही हे खरे असले तरी सर्व दहशतवादी हे मुस्लिम आहेत, हे आपल्याला कसे विसरता येईल. विशेष म्हणजे भारतच नाही तर जगातील अनेक देश या हिरव्या दहशतवादाचे बळी ठरले आहेत. पहलगाम येथे निर्दोष भारतीय पर्यटकांची झालेली हत्या ही हिरव्या दहशतवादाची फलनिष्पत्ती म्हणावी लागेल. यावेळी प्रथमच धर्म विचारून आणि समोरची व्यक्ती हिंदू धर्माची असल्याची खात्री पटल्यानंतर त्याला बायको आणि मुलांसमोर गोळ्या घालण्यात आल्या, याकडे दुर्लक्ष कसे करता येईल. दहशतवादावर चढलेला हिरवा रंग पुसून काढण्यासाठी तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी सर्वप्रथम भगवा दहशतवाद हा शब्द वापरला. नंतर पी. चिदंबरम्, काँग्रेसमधील वाचाळ नेते दिग्विजयसिंह यांनी भगव्या दहशतवादाचे तुणतुणे वाजवणे सुरू केले. काँग्रेस पक्ष आणि त्याचे नेते स्वत:ला समाजवादी म्हणवत होते, पण ते कधी नमाजवादी झाले, ते त्यांनाही समजले नाही. अनिवासी भारतीय असे म्हटले जाते, म्हणजे जे भारतात राहात नाही, पण तनाने आणि मनाने भारतीय आहेत. तसेच काँग्रेस नेत्यांबद्दल म्हणावे लागेल. काँग्रेस नेते सुंता न करता स्वत:ला मुस्लिम समजू लागले होते. हिंदू समाज हा सोशीक, सहिष्णू आणि संयमी असल्यामुळेच या देशात काँग्रेसचे फावले. हिंदू समाज आक्रमक झाला असता, त्याने रौद्ररूप धारण करत तांडव केले असते तर काँग्रेसला विशेषत: गांधी घराण्याला कधीच सत्तेवरून पायउतार व्हावे लागले असते, एवढेच नाही, तर आपला बाडबिस्तर गुंडाळून परदेशात विशेषत : इटलीला पळून जावे लागले असते. २०१४ मध्ये देशातील हिंदू समाजाने आपले खरे रूप दाखवले आणि काँग्रेसला पराभूत करत भाजपाला सत्तेवर आणले. आपल्याकडून वर्षानुवर्ष झालेल्या चुकीचे प्रायश्चित्त हिंदू समाजाने नरेंद्र मोदी यांना पंतप्रधानपदावर एकदा, दोनदा नाही तर सलग तीनदा विराजमान करून घेतले. शंभर पापांचा घडा भरल्याशिवाय हिंदू समाज आक्रमक होत नाही, त्याला धडा शिकवल्याशिवाय राहात नाही. पण हिंदू समाजाने एकदा का सुदर्शन चक्र हातात घेतले की तो मग शिरच्छेद केल्याशिवाय कोणालाच सोडत नाही. हिंदू हा कालही दहशतवादी नव्हता, आजही नाही आणि उद्याही राहणार नाही, ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलेली प्रतिक्रिया देशातील कोट्यवधी हिंदूंच्या मनातील भावना म्हणावी लागेल. काँग्रेस पक्षात एकटे पडल्यानंतर तसेच भगवा दहशतवाद हे शब्द आपला राजकीय बळी घेतील, या भीतीतून सुशीलकुमार शिंदे यांनी, भगवा दहशतवाद हा शब्द माझा नव्हता, तर काँग्रेस नेतृत्वाच्या दबावामुळे मला तो वापरावा लागला, असा पश्चातबुद्धीचा आणि बालिश खुलासाही केला. पण 'बूंद से गई सो हौद से नहीं आती' हेच खरे. मालेगाव खटल्याच्या निकालानंतर दिग्विजयसिंह यांनीही मी कधीच भगवा दहशतवाद असा शब्द वापरला नसल्याचा हास्यास्पद दावा केला. हिंदू समाजाने देशातून काँग्रेसला पळता भूई थोडी केल्यानंतर काँग्रेस नेत्यांच्या डोक्यात चढलेले भगव्या दहशतवादाचे भूत उतरले. तसेही 'लाथों के भूत बातों से नहीं मानते' असे म्हणतात. काँग्रेस नेत्यांच्या डोळ्यावर भगव्या दहशतवादाचा चष्मा चढला होता, न्यायालयाने आपल्या निकालपत्रातून या सर्वांच्या चष्म्याच्या काचाच फोडून टाकल्या. दसरा आणि दिवाळीला अजून दोन-तीन महिन्यांचा अवकाश आहे, पण न्यायालयाचा हा निर्णय म्हणजे देशात दिवाळीच्या आधीच दिवाळी साजरी करावी असा आहे. विशेष एनआयए न्यायालयाच्या न्यायाधीशांनी आपला निर्णय साध्या पेनाने लिहिला असला तरी तो सुवर्णाक्षरात नोंदवावा असा आहे, यात शंका नाही. सनातन काळापासून भगवा रंग हा आम्हाला त्यागाची, शौर्याची आणि बलिदानाची आठवण करून देणारा रंग आहे. भगवा झेंडा हा आम्हाला गुरुस्थानी आहे. मुघलांच्या हिरव्या निशाणाला खाली खेचत छत्रपती शिवाजी महाराजांनी भगव्या झेंड्याला समोर ठेवत हिंदवी स्वराज्याची स्थापना केली, हे आम्हाला कसे विसरता येईल?

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# काँग्रेसचा 'तमाशा'!

सोलापूरच्या काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी ऑपरेशन सिंदूरला 'तमाशा' म्हटले आहे. त्या म्हणाल्या, "सरकार सत्य लपवून फक्त माध्यमांमध्ये प्रशंसा मिळवत आहे. प्रत्यक्षात, ऑपरेशन सिंदूर हा एक तमाशा होता. ऑपरेशन सिंदूरमधून देशाला काय फायदा झाला? या कारवाईत किती दहशतवादी पकडले गेले? पाकिस्तानने भारताची किती विमाने पाडली? या कारवाईत झालेल्या चुकांसाठी कोण जबाबदार आहे?" असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. खरं तर सैन्याने याबाबत पत्रकार परिषद घेऊन अनेक बाबी स्पष्ट केल्या आहेत. कदाचित प्रणिती शिंदेंना भाषण लिहून देणाऱ्यांनी याबाबत माहिती मिळवलेली दिसत नाही. अर्थात प्रणिती शिंदे स्वत:च्या मनाने काही बोलत नाहीत. त्यांना त्यातलं किती कळतं हा संशोधनाचा विषय आहे. याचं कारण असं की "भगवा दहशतवाद" ही संकल्पना प्रणिती यांचे तीर्थरूप सुशीलकुमार शिंदे यांनी मांडली होती. हे काँग्रेसचं कारस्थान होतं अशी कबुली स्वत: शिंदेंनीच दिली आहे. हायकमांड आणि ज्येष्ठांनी सांगितल्यामुळे त्यांनी असे विधान केल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे ज्याप्रमाणे सुशीलकुमार शिंदे हे खाल्ल्या मिठाला जागणारे आहेत, त्याचप्रमाणे त्यांच्या कन्या देखील खाल्ल्या मिठाला जागणाऱ्या असू शकतात अशी शक्यता नाकारता येत नाही. म्हणूनच इथे स्पष्ट करावेसे वाटते की जरी प्रणिती यांनी ऑपरेशन सिंदूरला तमाशा म्हटले असले तरी प्रत्यक्षात काँग्रेसनेच तमाशा चालवलेला आहे, असं म्हणायला बराच वाव आहे.

नुकताच मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाचा निकाल लागला आणि सर्व हिंदू आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली. मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरण हे भारताच्या इतिहासात एक गंभीर वळण घेऊन आलेलं प्रकरण आहे, ज्यामध्ये केवळ निष्पाप लोकांचा मृत्यूच झाला नाही, तर हिंदू समाजावर "हिंदू दहशतवाद" नावाचा एक खोटा शिक्का मारण्याचा कट रचला गेला. या प्रकरणातून काँग्रेसने हिंदुत्वाला बदनाम करण्याचा एक योजनाबद्ध डाव आखला. २००८ मध्ये मालेगाव येथे झालेल्या बॉम्बस्फोटात सुरुवातीस मुस्लिम अतिरेक्यांवर संशय घेतला गेला होता. मात्र, एका कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी "प्रत्येक वेळी मुसलमानच कसा पकडला जातो?" असे प्रश्नचिन्ह निर्माण केले आणि जणू जादूची कांडी फिरवल्यासारखे मुस्लिम आरोपी गायब झाले आणि त्या जागी हिंदू आरोपी आले. विशेष म्हणजे या सर्व काळात राष्ट्रवादी काँग्रेसचा गृहमंत्री होता. शरद पवारांचं राजकारण रोमांचक आहे. त्यांनी कधीही मुख्यमंत्रिपदासाठी आग्रह धरला नाही, मात्र गृहमंत्री त्यांच्या पक्षाचा असेल यासाठी ते आग्रही असायचे. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असतानाही गृहमंत्रिपद त्यांनी स्वत:कडे ठेवून घेतलं होतं. त्यातूनच बार मालकांकडून १०० कोटींची वसुली, जिलेटिन कांड्याचा कांड, सुशांत-दिशा, मनसुख हिरेन असे अनेक संशयासद मृत्यू, सचिन वाझे, अनंत करमुसे अपहरण व मारहाण आणि इतर बरीच प्रकरणे समोर आली. लक्षात घ्या अत्याधुनिक युगात इतका



घोळ घातला गेला तर जेव्हा सोशल मीडिया वगैरे नव्हता तेव्हा काय काय घडलं असेल, याचा विचार करूनच अंगावर काटा येतो. तर मालेगाव स्फोट प्रकरणात काही दिवसांतच काँग्रेस सरकारच्या दबावाखाली एटीएसने एक वेगळेच कथानक तयार केले. या कथानकात साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर, लेफ्टनंट कर्नल पुरोहित यांच्यासारख्या व्यक्तींवर अतिरेकी असल्याचे आरोप ठेवण्यात आले. विशेष म्हणजे, या व्यक्तींना कोणताही ठोस पुरावा नसताना वर्षानुवर्षे तुरुंगात डांबून ठेवण्यात आले. त्यांना मानसिक आणि शारीरिक त्रास देण्यात आला.

'हिंदू दहशतवाद' ही संकल्पना काँग्रेसने केवळ मुस्लिम तुष्टीकरणासाठी आणि जिहादी दहशतवादाच्या वास्तवावरून जनतेचं लक्ष विचलित करण्यासाठी निर्माण केली असली तरी त्यांचा मूळ उद्देश मुस्लिम तुष्टीकरणातून निवडणूक जिंकणे असा होता. तत्कालीन गृहमंत्री पी. चिदंबरम्, सुशीलकुमार शिंदे आणि काँग्रेसचे काही नेते जाणीवपूर्वक हे कथानक जनतेसमोर मांडत होते. काँग्रेसच्या या भूमिकेमुळे संपूर्ण हिंदू समाजाला संशयाच्या छायेत आणण्याचा प्रयत्न झाला. मात्र अखेर सत्य जगासमोर आलेच. निवृत्त पोलिस अधिकारी मेहबूब मुजावर यांनी या प्रकरणावर प्रकाश टाकताना सांगितले की, एटीएसने खोटे पुरावे तयार करून काही आरोपींना अडकवले. त्यांनी स्पष्टपणे म्हटले की, काँग्रेस सरकारच्या आदेशावरून हे सर्व घडले. मुजावर यांच्या म्हणण्यानुसार, मालेगाव बॉम्बस्फोटानंतर सापडलेले काही खरे आरोपी सोडून दिले गेले आणि त्यांच्या जागी निर्दोष हिंदू व्यक्तींना अडकवले गेले. या खोट्या कथानकाचा सर्वांत घृणास्पद भाग म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांना या कटात अडकवण्याचा प्रयत्न होता. काँग्रेसच्या माध्यमांमार्फत असे दाखवले गेले की, मालेगाव स्फोटामागे काही संघटनांचा हात आहे. यामागचा उद्देश स्पष्ट होता, तो म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि संपूर्ण हिंदू राष्ट्रवादी विचारसरणीला दहशतवादाच्या छायेत आणणे. पण वेळ येताच कोर्टाने आणि तपास संस्थांनी या आरोपांना निराधार ठरवलं. खरंतर यासाठी मेहबूब मुजावर यांचे आभार मानायला हवे. मात्र या कटात सहभागी न झाल्याने मेहबूब यांनाही त्रास देण्यात आला, त्यांच्यावरही खोटे आरोप ठेवण्यात आले.

सप्टेंबरमध्ये मालेगाव स्फोट झाला आणि २००८ च्या नोव्हेंबरमध्ये आणखी एक भयानक घडली, ती म्हणजे मुंबई दहशतवादी हल्ला. यात हेमंत करकरे यांचा मृत्यू झाला. त्यांच्या हत्येचे आरोपही हिंदू समाजावर टाकण्यात आले. त्याहीपेक्षा भयंकर गोष्ट अशी की कसाब व त्याच्या साथीदारांनी केलेल्या जिहादी हल्ल्याचे खापर हिंदू समाजावर मारण्याचा प्रयत्न होणार होता. जर तुकाराम ओंबळे यांनी कसाबला जिवंत पकडलं नसतं तर ते सगळे अतिरेकी हिंदू होते असं दाखवण्याचा प्रयत्न झाला असता. या षडयंत्राचा भाग म्हणूनच हिंदूंवर करकरेंच्या हत्येचा आरोप टाकण्यात आला. भाजप नेते अवधूत वाघ यांनी एक महत्त्वाचे विधान केले आहे. वृत्तवाहिन्यांवरील चर्चेत ते म्हणाले की, "प्रज्ञा ठाकूर यांना पकडून संपूर्ण हिंदू संत समाज, मेजर उपाध्याय आणि कर्नल पुरोहित यांना पकडून संपूर्ण लष्कर आणि अभिनव भारतला गुंतवून स्वातंत्र्यवीर सावरकर आणि कट्टर हिंदुत्वनिष्ठ अशी सावरकरांची फौज या सर्वांना बदनाम करण्याचं कारस्थान जर कोणी रचलं असेल तर त्या माणसाचं नाव आहे शरदचंद्र पवार." म्हणजे काँग्रेस व त्यांच्या संस्कृतीतील लोकांना भारतीय समाज रचनाच मोडून पाडायची होती. हिंदू संतांना आरोपी बनवलं तर हिंदुत्वाचा पाया ढासळेल, लष्करातील लोकांना पकडलं तर भारतीय संरक्षण यंत्रणा कोलमडून पडेल आणि हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्त्यांना अडकवलं तर समाजरचना विस्कळीत होईल. या तिन्ही घटकांमुळे भारत देश सुरक्षित आणि सुस्थितीत आहे. या घटकांवर हल्ला चढवला तर भारतीय व्यवस्था ढासळेल. म्हणजे केवढं मोठं षडयंत्र होतं! हे केवळ निवडणूक जिंकण्यासाठी असेल तर हे पाशवी आहे.

या प्रकरणाबाबत एनआयए कोर्टाने सांगितले की, आरोपींविरुद्ध पुरावा अपुरा असून त्यांनी काहीही चुकीचे केलेले नाही. या निर्णयानंतर हे स्पष्ट झाले की, काँग्रेस सरकारने निव्वळ राजकीय हेतूने निर्दोष हिंदूंना अतिरेकी ठरवले होते. हा खरं तर भारतीय न्यायप्रणालीवरचा विश्वास डळमळीत करणारा प्रकार होता. देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी या प्रकरणावर भाष्य करताना म्हटले की, "हिंदू कधीही टेररिस्ट होऊ शकत नाही." हे विधान केवळ राजकीय नव्हे, तर ऐतिहासिक सत्य आहे. भारताच्या हजारो वर्षांच्या इतिहासात हिंदूंनी अन्यायाविरुद्ध लढा दिला, पण कधीही अतिरेकी मार्ग अवलंबला नाही. हिंदू क्रांतिकारक असतो, अतिरेकी नव्हे.

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**अनिल फेकरीकर**

# पोलिस पाटलांनाही आता बंदूक द्यावी?

गस्त हा शब्द पोलिस खात्यासाठी नवा नाही. आपल्या भागात कुठेही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिस समूहाने सरकारी वाहनाने गस्तीवर असतात. या काळात ते संशयास्पद हालचालींवर नजर ठेवतात अन् काही चुकीचे वाटल्यास त्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करतात. मात्र हीच कृती करताना पोलिस पाटील गावात एकटाच असतो. यामुळे आता त्यांच्याही सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर येऊ शकतो. त्यामुळे स्वसंरक्षणासाठी पोलिस पाटलांना बंदूक अर्थात रिव्हॉल्व्हर द्यायला हवी, असाही विचार पुढे आला आहे. काही गावांमध्ये पोलिस पाटलांवर जीवघेणे हल्ले झाले आहेत. तो भूतकाळ पाहता भविष्यकाळ चांगला व्हावा याकरिता रिव्हॉल्व्हर खूप काही साध्य करू शकते. संपूर्ण राज्याचा विचार करता पोलिस कर्मचाऱ्यांची संख्या २ लाख २९ हजार ९६२ एवढीच आहे. तर लोकसंख्या पाहता ती १२ कोटी ८६ लाख ५९ हजारांच्या वर आहे. आता एवढ्या मोठ्या लोकसंख्येला सांभाळणे दोन लाख कर्मचाऱ्यांना शक्य नाही. विशेष म्हणजे पोलिस फक्त शहरांवर लक्ष केंद्रित करतात, मात्र गावखेड्यांचे काय? तिथे तर गुन्हेगार धिंगाणा घालून गावकऱ्यांचे नुकसान करतात अन् कायद्यालाच आव्हान देतात. या स्थितीत राज्यातील ३८ हजारपेक्षा जास्त असलेल्या पोलिस पाटलांची मदत घेण्याचा विचार गृहमंत्रालय करीत आहे. नव्हे नागपूर जिल्ह्यातील सावनेर तालुक्यात अपर पोलिस अधीक्षक अनिल म्हस्के यांनी चक्क गावखेड्यात पोलिस पाटलांकडून गस्त सुरू करून नवा प्रयोग यशस्वी करून दाखविला. आता त्यांनी तो प्रयोग संपूर्ण नागपूर जिल्ह्यात सुरू केला आहे. हा प्रयोग खरोखरच चांगला आहे. पण



पोलिस पाटील जेव्हा गस्तीवर असतो तेव्हा त्याला त्याच्याही जीवाची भीती असते. त्याचा विचार करता त्यांना बंदूक अर्थात रिव्हॉल्व्हर देणे काळाची गरज असल्याची भूमिका पोलिस पाटील संघटना महाराष्ट्र राज्य प्रदेशाध्यक्ष दीपक पालीवाल यांनी मांडली आहे. तसे पाहता पोलिस भरतीनुसार पोलिस पाटलांची नियुक्ती सर्व नियम पाळून केली जाते. म्हणूनच की काय वर्तमानात पोलिस पाटलांना १५ हजार रुपये महिना मानधन दिले जाते. पूर्वी याच पोलिस पाटलांना केवळ २५ रुपये मानधन दिले जायचे. पण दीपक पालीवाल यांचा लढा चमत्कारिक ठरला. सुरुवातीला त्यांचे मानधन केवळ २५ रुपये होते. नंतर ते ३०० रुपये, ५०० रुपये, ८०० रुपये, ३ हजार रुपये, ६५०० रुपये आणि आता १५ हजारांच्या घरात पोहोचले आहे.

हा लढा सोपा नव्हता, याकरिता दीपक पालीवाल यांना घरावर तुळशीपत्र ठेवत अहोरात्र झटावे लागले. पोलिस पाटलांचा इतिहास जेव्हा केव्हा लिहिला जाईल तेव्हा दीपक पालीवाल यांच्या कार्याची नोंद सुवर्ण अक्षराने होईल, हे मात्र नक्की. आता प्रश्न हा आहे की, पोलिस पाटलांची गस्त खरोखरच लाभदायक ठरणार काय? तर त्याचे उत्तर नक्कीच हो असेच द्यावे लागेल. गावात दुपारी वृद्ध व्यक्ती सोडले तर सर्व जण शेतात पिकांच्या मशागतीसाठी जातात. यामुळे गावात कुणीही राहात नाही. मग काय हीच संधी साधत चोरांच्या टोळ्या फेरीवाल्यांच्या वेषात येऊन घरफोड्या करतात. त्यावर आळा बसावा म्हणून सकाळी ११ ते ६ या काळात पोलिस पाटलांना गस्त घालण्यास सांगितले आहे. शिवाय गावात येणाऱ्या प्रत्येक फेरीवाल्याचे छायाचित्र, आधारकार्ड पोलिस पाटलांनी जमा करून ठेवायचे. गावातील जाणाऱ्या आणि येणाऱ्या मार्गावर ग्रामपंचायतच्या मदतीने सीसीटीव्ही लावायचे असेही कार्य त्यांच्यावर सोपविण्यात आले आहे. पण फेरीवाल्यांकडून फोटो आणि आधार कार्ड मिळवणे सोपे नाही. अनेकदा ते नकार देतील किंवा वादविवाद करतील. अशावेळी पोलिस पाटलांनी नेमके करायचे काय? हाही मुद्दा तापदायक ठरेल. पण समजा पोलिस पाटलांच्या कंबरेला सरकारने दिलेली बंदूक दिसली तर धाकापोटी का असेना फेरीवाल्यांच्या रूपातील गुन्हेगारही गुपचूप फोटो काढू देतील. शिवाय काळानुरूप पोलिस पाटलांना खाकी वर्दी द्यायला हवी. शेवटी कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे हेच मोठे आव्हान प्रत्येक सरकारपुढे असते. ते आव्हान पोलिस पाटलांच्या मदतीने लीलया पेलता येणे शक्य आहे. महाराष्ट्रात सुमारे ४३ हजार ७२७ गावे आहेत. या सर्व गावांमध्ये पोलिस यंत्रणा जाऊ शकत नाही. अशावेळी पोलिस पाटील गृहमंत्रालयासाठी शांततादूत ठरू शकतात. नव्हे हे प्रत्यक्षात आले तर पोलिसांवरील ताण कमी होईल अन् गावागावात शांतताही नांदेल. याच शांततेत प्रगती दडलेली असते, नाही का?

९८८१७१७८५९

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# जनतेनेच वापरावा विवेक

नुकतेच लोकसभेत सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी ऑपरेशन सिंदूरला तमाशाची उपमा देऊन, स्वत:चा तमाशा करून घेतला. नेटकऱ्यांनी समाजमाध्यमांवर प्रणिती शिंदेंचा पुरता तमाशा उडवला. तसे तमाशे तर यांचे नेते राहुल गांधीदेखील सतत करत असतात. महाराष्ट्रातील यांचा सहकारी संजय राऊत नावाच्या गृहस्थांचा रोजचा तमाशा सुरू असतो. एवढंच कशाला प्रणिती शिंदेंचे वडील सुशीलकुमार शिंदेंनी मुख्यमंत्री असताना शेतकऱ्यांना वीज मोफत देतो सांगून, शेतकऱ्यांचा भावनांचा तमाशा मांडला होता. आणि हो... हिंदू, भगवा आतंकवाद म्हणून हिंदूंच्या भावनांचा तमाशा करणारेदेखील यांचेच पिताश्री होते, बरं का! त्यामुळे तमाशा आणि यांचा तसा जवळचा संबंध आहे. मुख्यमंत्री पदावर असताना वडील जसे दहशतवादासारख्या संवेदनशील विषयाचादेखील तमाशा करायचे, ते बघून कदाचित इतरही राज्यकर्ते असेच असंवेदनशील असतील आणि असाच तमाशा करत असतील, असा गैरसमज मॅडमला झाला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. हा कालांतराने पक्षाच्या वरिष्ठांच्या सांगण्यावरून भगवा दहशतवाद शब्द मी वापरला. मात्र, तो वापरायला नको होता. अशी उपरती त्यांच्या पिताश्रींना झाली. अशाच पद्धतीने वरिष्ठांच्या सांगण्यावरून प्रणितीने भारतीय सेनेच्या शौर्याचा, या भ्याड हल्ल्यात पती गमावलेल्या वीरपत्नींच्या कुंकवाचा, भारतीय अस्मितेचा अवमान केला खरा, मात्र त्यांनाही कालांतराने आपण चुकल्याची जाणीव होईल, अशी अपेक्षा करायला हरकत नाही.

आता उबाठा गटाकडे २० आमदार आहेत. तेदेखील चळवळी, आंदोलने वगैरे काही करताना दिसत नाही. सभागृह आणि सभागृहाबाहेर रस्त्यावर कुठेही यांचं अस्तित्व दिसत नाहीत. जनसुरक्षा विधेयकाला साधा विरोध वीसपैकी आदित्य ठाकरेंसह एकाही सदस्याने केला नाही. शेवटी पक्षप्रमुखाला स्वत:ला येऊन विरोध करत असल्याचा आवा आणावा लागला. मात्र, त्यांनीही सभागृहात उपस्थित असतानादेखील सभागृहात अधिकृत विरोध केला नाही. यांचे नेते संयुक्त चिकित्सा समितीत होते. तेथे यांचं कोणी ऐकले नसेल तर, भिन्नमतपत्रिका (डिसेंटिंग नोट) ते देऊ शकले असते, कायदा संमतीसाठी सभागृहात मांडला तेव्हा, मतदान (डिव्हिजन) मागू शकले असते. पण यापैकी कुठलाही संवैधानिक, न्यायिक मार्ग या लोकांनी पत्करला नाही. केवळ माध्यमांसमोर ता-ता थैय्या केला. करतो म्हटलं तर करण्यासारखं बरंच काही होतं. मात्र, इच्छाशक्ती नव्हती आणि इच्छाशक्तीच नसेल तर मग तुम्ही काहीही करू शकणार नाही हे वास्तव आहे. त्यामुळे केवळ राजकीय तमाशा करण्यापलीकडे दुसरा पर्याय उपलब्ध नसतो. नेमकं तेच आताचे विरोधक करत आहेत.

बरं अशा या राजकीय तमाशांमध्ये केवळ पुढारीच आहेत असे नाही. यात प्रसार माध्यमं आणि त्यांचे काही अतिउत्साही संपादक किंवा पत्रकार देखील हिरिरीने सहभागी होताना दिसतात. याचं ताज उदाहरण द्यायचं झालं तर, कृषिमंत्री माणिकराव कोकाटेंसह मंत्रिमंडळातील ८ नेत्यांची विकेट उडणार, असल्या संजय राऊतांनी पेरलेल्या तकलादू हवाहवाई बातमीला डोक्यावर घेणे होय. आपल्या शिल्लक सेनेचे नेते आणि कार्यकर्त्यांना सांभाळून ठेवणे किंवा त्यांच्या आशा पल्लवित ठेवण्यासाठी आणि सत्ताधाऱ्यांमध्ये अस्वस्थता पसरविण्यासाठी स्वत:च्या मालकीच्या वृत्तपत्रातून काहीही निराधार असे छापून आणायचा एकमेव धंदा उबाठा आणि त्यांच्या नेत्यांकडून चालला आहे. विशेषत: संजय राऊतांकडून. आता त्यांच्यावर परिस्थिती अशी आली आहे की, असा राजकीय तमाशा ते करण्यापलीकडे दुसरा पर्याय त्यांच्याकडे नाही, हे समजू शकतो आपण. पण माध्यमांनी आपलं भान का सोडलंय्... या अशा खोटारड्या लोकांचीच री ओढत आरडाओरडा करायला लागतो. काही काही तर त्यांच्याच घरी शोककळा पसरल्यागत मातम करायला लागतात. वैचारिकदृष्ट्या माणूस कुठेना कुठे जुळलेला असतो, इथपर्यंत ठीक आहे. मात्र, इतकं लाळचाटेपणा किंवा तळवे चाटण्याचा माध्यमांच्या प्रतिनिधींनी अलिकडे चालविलेला प्रकार म्हणजे कळसच म्हणावा लागेल. बरं शिट्टी वाजविली की पळत जाऊन तळी उचणाऱ्या माध्यमांनी आज महासंपादक बनविलेल्या या राऊतांची पत किती हे उद्धव ठाकरेंनी आधीच दाखवून दिली आहे. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाल्यावर त्यांनी वृत्तपत्राच्या संपादकपदाचा राजीनामा दिला आणि त्या जागी आपल्या पत्नीला, रश्मी ठाकरेंना संपादक बनविले. परत ठाकरे पायउतार झाल्यावर पुन्हा स्वत: संपादक झालेत. मात्र, राऊतांना कार्यकारी संपादकपदावरून संपादक बनविले नाही. कारण उद्धव ठाकरे सुद्धा राऊतांचं काय ते चांगल्यानं ओळखून आहेत. पण माध्यमांना अद्याप उमगलेलं दिसत नाही. सकाळी उठून फेकाफेकी केली, की माध्यमं लगेच उडू लागतात, अशी परिस्थिती झाली आहे. राऊतांच्या फेकाफेकीतली सत्यता पडताळण्याचे कष्ट घ्यायलादेखील कोणी तयार नाहीत. शेवटी सत्य तर लपत नाही ते पुढे आलं की, असे सांगीवांगीचे वृत्त चालविल्यानंतर तोंडावर आपटावे लागते एवढंच काय ते वाट्याला येतं. दिवस भरायच्या नादात हे लोकं भेटेल ते प्रसारित करतात. यामुळे यांचा दिवस निघतो. मात्र, अवघ्या माध्यमांच्या विश्वासार्हतेला कायमस्वरूपी धक्का बसतो. याचा विचार आज माध्यमं करायला तयार नाहीत. यावेळी राजकीय पक्षांनी, त्यांच्या नेत्यांनी आपल्या राजकीय अस्तित्वासाठी तमाशा चालविला असून, माध्यमं देखील या तमाशात आपला उत्स्फूर्त सहभाग दर्शविताना दिसत आहे. त्यामुळे आता राहुल गांधी जे विदेशात जाऊन आपल्या देशाचा तमाशा मांडण्याचा प्रयत्न करतात, संजय राऊत राज्यात तमाशाचा फड चालवतात, त्या फडात आता प्रणिती शिंदेंनी नव्याने प्रवेश केलाय्. माध्यमांनी तर आधीच याचा भाग होण्याचा बहुमान पटकावला आहे. या एकमेकांच्या साथीने दहशतवाद आणि नक्षलवादासारख्या राष्ट्रीय सुरक्षेच्यादृष्टीने अत्यंत संवेदनशील विषयासंदर्भात चालविलेल्या राजकीय तमाशावर आता राज्यातील जनतेने सद्सदविवेकाने विचार करण्याची गरज आहे.

९२७०३३३८८६

## मैत्री : एक सर्वांगसुंदर अनमोल नातं

मैत्री हे मानवी जीवनातील सर्वश्रेष्ठ व प्रत्येकाच्या जीवनात विशेष स्थान असणार नातं. माणूस हा समाजशील प्राणी आहे, तो एकटा राहू शकत नाही. मानवी मन हे असंख्य सुखद-दुःखद भावनांनी भरलेलं असतं व त्याला त्याच्या भावना व्यक्त करण्यासाठी कुणाचीतरी गरज असते आणि त्याची ही गरज एक खरा मित्रच पूर्ण करू शकतो कारण मित्रच आपलं अस हक्काचं ठिकाण आहे ज्याच्याजवळ आपण आपल्या भावना मनसोक्तपणे व्यक्त करू शकतो. जीवनाच्या वाटेवर आपल्याला बरेच व्यक्ती भेटतात पण प्रत्येकाशीच आपली मैत्री होत नाही. पण काही व्यक्ती अशा असतात ज्यांना पाहून पूर्वजन्मीचे काहीतरी ऋणानुबंध असल्यासारखे वाटते. त्यांच बोलणं, वागणं मनाला स्पर्श करतं. मग ओळख वाढते, बोलचाल वाढते, सहवास वाढतो, आचार-विचार, आवडी -निवडी जुळतात व एकमेकांवर विश्वास जडतो आणि उदयास येतं एक सर्वांगसुंदर अस मैत्रीचं नातं. मैत्री हे जीवनातील सर्वश्रेष्ठ अस नातं आहे कारण या नात्यांमध्ये कसलंच बंधन नसतं. ना वयाच, ना वर्णाचं, ना जातीचं, ना धर्माचं. लहान-मोठा, गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरुष, उच्च-नीच असा कुठलाच भेदभाव केला जात नाही असं रक्ताच्या नात्यापेक्षाही पलीकडलं नातं म्हणजे मैत्रीचं नातं कारण ज्या गोष्टी आपण आपले कुटुंबीय, नातेवाईक यांच्यासोबत व्यक्त करू शकत नाही त्या गोष्टी मात्र आपण आपल्या मित्रा सोबत बिनधास्तपणे व्यक्त करू शकतो. ज्याच्याजवळ मनातील भाव व्यक्त करताना संकोच वाटत नाही, ज्याच्याशी खोटे बोलावेसे वाटत नाही, ज्याच्याजवळ पाप पुण्याची कबुली देण्यास मन कचरत नाही, केलेल्या चुकांची कबुली द्यायला कमीपणा वाटत नाही, जो आपल्या सुखदुःखाशी एकरूप होऊ शकतो तोच खरा मित्र.

कार्यालयात दररोज सात आठ तास सोबत राहणारी व्यक्ती आपला मित्र होईलच असे नाही उलट महिन्यातून कधीकधी बोलणारी वर्षातून कधीतरी भेटणारी व्यक्ती सुद्धा आपला चांगला मित्र असू शकतो त्याचे कारण म्हणजे एकमेकांवरचा विश्वास. मोबाईलमुळे जवळ आलेल्या व मनाने दूर गेलेल्या आजच्या स्वार्थी व अत्यंत धावपळीच्या युगात प्रत्येकाला एका खऱ्या मित्राची नितांत गरज आहे, कारण आज आपण पाहतो की प्रत्येक जण हा कुठल्यातरी विवंचनेत आहे. कौटुंबिक, सामाजिक, कार्यालयीन, व्यावसायिक, आर्थिक इत्यादी समस्यांमध्ये पार गुंतून गेला आहे व आतल्या आत गुरफटला गेला आहे व यातूनच नैराश्यग्रस्त होऊन आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलण्याच्या निर्णयापर्यंत जात आहे त्यासाठी त्याच्या मनातील भावना, त्याच्या व्यथा समजून घ्यायला, योग्य-अयोग्य जसेच्या तसे सांगायला आरशाप्रमाणे खऱ्या मित्राचीच गरज असते. शेवटी जिथे सुख सांगायला शब्दांची गरज नसते, दुःख दाखवायला अश्रूंची गरज नसते, न सांगताच जिथे सर्व काही समजते तीच खरी मैत्री असते. ज्यांनी हे मैत्रीचं पवित्र नातं खऱ्या अर्थाने जाणलं, या मैत्रीच्या नात्याला नि:स्वार्थपणे जपलं आणि या नात्याचा आनंद घेऊन मित्रांसोबत जीवन जगलं अशा तमाम मित्रांना मैत्री दिनाच्या शुभेच्छा.

**राहुल भगवान पुरी**/यवतमाळ

## वाचक पत्रे

## मैत्री : मनाला जोडणारा एक धागा

'मैत्री' हा शब्द उच्चारताच मनात एक वेगळीच ऊब आणि जिव्हाळा दाटून येतो आणि चेहऱ्यावर हसू फुलते. प्रत्येकाच्या आयुष्यात काही अशा व्यक्ती असतात जे रक्ताचे नाते नसतानाही आपल्या मनाशी निखळ नाते जोडून राहतात. हेच असतं मैत्रीचं अद्वितीय बंधन. ३ ऑगस्टला फ्रेंडशिप डे निमित्ताने आपण प्रत्येकजण अशाच मित्रत्वाच्या नात्याला उजाळा देणार आहोत. मैत्री म्हणजे काय? मैत्री म्हणजे आधार. मैत्री म्हणजे मनमोकळेपणा. कोणतेही मुखवटे न घालता आपण जसे आहोत तसे आपल्याला स्वीकारणारी आणि समजून घेणारी माणसं म्हणजे मित्र. सुख-दुःखाची वाट एकत्र चालणं म्हणजे मैत्री. ज्याच्याशी बोलताना वेळ कधी सरतो हे कळत नाही आणि ज्याच्यासोबत गप्पा मारताना मन शांत होते तो खरा मित्र. आयुष्यात मैत्रीचं स्थान हे वयाच्या वेगवेगळ्या टप्प्यात वेगवेगळे असतं. बालपणीची मैत्री ही निरागस असते. चिखलात खेळणे, खाऊ वाटून खाणे ही सुरुवात असते आपल्यातल्या मैत्रीच्या भावनेची. तर तरुणपणीची मैत्री ही खंबीर असते. शिक्षण, परीक्षा, करीअरचा, कामाचा ताण यातून सावरणारा एक आधाराचा हात देणारा मित्र या वयात प्रत्येकाला असावा. अडचणीच्या काळात साथ देणारा, हसवणारा, समजून घेणारा तो तरुणपणीचाच मित्र असतो. आयुष्यात विविध जबाबदाऱ्या पेलताना व संसार सांभाळताना शरीर थकल्यावर उतारवयातही एखादा असा मित्र असावा. जो तुमच्या सोबत जुने दिवस आठवून व तुम्हाला आधार देऊन तुमचा एकटेपणा दूर करू शकतो, तो असतो प्रौढ वयातील समजूतदार मैत्र. मैत्रीचे अनमोल क्षण हे माणसाला वेळोवेळी आठवत असतात. रात्री उशिरापर्यंत केलेल्या गप्पा. दुःखात आलेले "मी आहे ना!" हे दोन शब्द. एकत्र केलेली धडपड, भांडणं आणि पुन्हा एकत्र येणं म्हणजे मैत्री.फ्रेंडशिप डे च्या दिवशी आपल्या मित्राला नुसतं रंगीत रिबीन बांधून फ्रेंडशिप डे साजरा करायचा नसतो. तर आपल्या मित्राला खरंच वेळ देऊन त्याच्या सुख-दुःखात सहभागी होऊन एक नवा विश्वास देणं हे फ्रेंडशिप डे च खरं सेलिब्रेशन आहे. मैत्री ही मनुष्याच्या जीवनात येणारी सर्वांत मोठी संपत्ती आहे. जी ना कुठे विकत मिळते, ना कोणाला मागून मिळते. जिच्यासाठी कधीकधी वेळ नाही, पण जिच्यासाठी मन मात्र नेहमी आहे ती मैत्री जन्मभर कायम राहते. मैत्री जपली पाहिजे, कारण ती वेळेने नाही तर मनाने जोडलेली असते आणि मन जोडणारी नातीच आपले आयुष्य समृद्ध करतात. सर्वांना मैत्रीदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**सुमेघ रामचंद्र वानरे**/९१३००२१३८७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## हरिभाईमध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती, लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

सोलापूर येथील हरीभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात लोकमान्य टिळक व साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची पुण्यतिथी व जयंती साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी ह. दे. कनिष्ठ महाविद्यालय प्राचार्य दीपा फाटक, पर्यवेक्षक शांतता कुंभार, पर्यवेक्षक सर्वगोड, पर्यवेक्षक नेवरे पर्यवेक्षक, राऊत पर्यवेक्षक शहाणे पर्यवेक्षक रणधीर त्याचबरोबर सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारीउपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती अलका जगताप यांनी तर मनोगत मंजिरी हरेहरे यांनी व्यक्त केले.








# शिक्षणाचा उपयोग नोकरीसाठी नव्हे तर देशाच्या उन्नतीसाठी करा














**सोलापूर: मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना पालवीच्या संस्थापिका मंगलताई शहा, शिवदारे महाविद्यालयाचे संस्थापक राजशेखर शिवदारे, प्राचार्य व स्टाफ. दुसऱ्या ओळीत प्राचार्य डॉ. विजय आठवले, प्रा. डॉ. भाग्येश देशमुख, विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचारी राजीव खपाले, डॉ. शिरीष बंडगर व नवनाथ ताटे, महाविद्यालयाचे कर्मचारी राजेंद्र गिड्डे, दत्ता भोसले व डॉ. रेवप्पा कोळी.**

### यांचा या पुरस्काराने झाला सन्मान

- **जीवनगौरव :** मंगलताई शहा, संस्थापिका पालवी शिक्षण संस्था पंढरपूर
- **महाविद्यालय :** राजशेखर शिवदारे, संस्थापक व्ही. जी. शिवदारे कॉलेज, सोलापूर.
- **प्राचार्य :** डॉ. विजय आठवले, वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी.
- **शिक्षक महाविद्यालय :** डॉ. भाग्येश देशमुख, वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी.
- **शिक्षकेत्तर विद्यापीठ**
  - **अधिकारी:** राजीव खपाले, लेखापाल.
  - **तृतीय श्रेणी :** डॉ. शिरीष बंडगर, वरिष्ठ लिपिक.
  - **चतुर्थ श्रेणी :** नवनाथ ताटे, चौकीदार.
- **शिक्षकेत्तर महाविद्यालय**
  - **तृतीय श्रेणी :** राजेंद्र गिड्डे, वरिष्ठ लिपिक, मारुतीराव हरिराव महाडिक कला व वाणिज्य महाविद्यालय, मोडनिंब.
  - **चतुर्थ श्रेणी :** दत्ता भोसले, ग्रंथालय परिचर, छत्रपती श्री शिवाजी रात्र महाविद्यालय आणि डॉ. रेवप्पा कोळी, प्रयोगशाळा परिचर, संगमेश्वर कॉलेज.

### डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे यांचे मत

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा जीवनगौरव पुरस्कार मंगलताई शहा यांना प्रदान!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

चॅट जीपीटी, एआयच्या धर्तीवर आज व्यावसायिक आणि कौशल्य शिक्षणाला महत्त्व असून त्यानुसार अध्यापकांनी आधुनिकतेची कास धरत विद्यार्थ्यांना शिक्षण द्यावे. शिक्षण व पदवीचा उपयोग केवळ नोकरीसाठी नव्हे तर देशाच्या उन्नतीसाठी आणि समृद्धतेसाठी व्हायला हवे, असे मत नॅशनल एज्युकेशन टेक्नॉलॉजी फोरम, नवी दिल्लीचे अध्यक्ष प्रा. डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे यांनी व्यक्त केले.

शुक्रवारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा २१ वा वर्धापन दिन समारंभ थाटात साजरा झाला. प्रारंभी सकाळी आठ वाजता कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. त्यानंतर सकाळी दहा वाजता विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार गोपीचंद पडळकर, एचएसएनसी मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. हेमलता बागला यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यापीठाचे प्र-कुलगुरु प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी प्रास्ताविक केले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे यांनी विद्यापीठाच्या प्रगतीचा आढावा घेतला. यावेळी विद्यापीठाचा यंदाचा प्रतिष्ठेचा व मानाचा जीवनगौरव पुरस्कार पंढरपूर येथील पालवी संस्थेच्या संस्थापिका मंगलताई शहा यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. रोख ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह, गौरवपत्र, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप होते. यावेळी विविध पुरस्कारांचेही वितरण करण्यात आले. यावेळी जीवन गौरव पुरस्कार मानपत्राचे वाचन सहायक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांनी केले.

यावेळी डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे म्हणाले की, सोलापूर विद्यापीठाला आज २१ वर्षे पूर्ण झाले, आता खऱ्या अर्थाने विद्यापीठाच्या विकासाचा प्रवास सुरू झाला आहे. गेल्या २१ वर्षातील विद्यापीठाची वाटचाल व प्रगती चांगली असून यापुढे विद्यापीठाने समाजाशी जोडून व समाजाच्या विकासासाठी आणि शेवटच्या घटकासाठी काम केले पाहिजे. उद्योजक पिढी निर्माण करण्याचे काम विद्यापीठाने केले पाहिजे. विकसित भारतासाठी सर्व नागरिकांना सोबत घेऊन आणि त्यांचा सहभाग घेऊन विकास साधला पाहिजे.

**विद्यापीठाने शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावे**

आमदार पडळकर म्हणाले की, सोलापूर विद्यापीठास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यात आले. यासाठी अनेकांनी आंदोलन केले. समाजाच्या मागणीनुसार शासनाने अहिल्यादेवी यांचे नाव विद्यापीठास दिले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आदर्श राज्यकारभार करून सबंध भारतभरघाट, बारवे निर्माण करीत अनेक हिंदू मंदिरांचा जीर्णोद्धार केला.त्या एक कुशल प्रशासक होत्या. त्यांचे अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, वास्तुशास्त्र आणि रसायनशास्त्रात मोठे योगदान आहे. आज अहिल्यादेवींच्या नावे सुरू असलेल्या विद्यापीठाने चांगली प्रगती करत आहे. यापुढेही शेवटच्या घटकापर्यंत या विद्यापीठाने पोहचले पाहिजे, अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

**स्थलांतर रोखण्यासाठी महत्त्वाची भूमिका**

कुलगुरू प्रा. महानवर म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे सर्वंकष व लोककल्याणकारी प्रशासनाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आज आपल्या या विद्यापीठाने कारभार करीत आहे. गेला २१ वर्षात पुण्यश्लोक आहल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने उच्च शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले असून स्थलांतर रोखण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. आज सर्व क्षेत्रात विद्यापीठाची कामगिरी उल्लेखनीय आहे. अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्प विद्यापीठाने हाती घेतले आहे. त्यात कौशल विकासाचे कोर्सेस, पंढरपूर येथील आंतरराष्ट्रीय वारकरी संशोधन केंद्र, तृतीयपंथी सेवा सुविधा केंद्र, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी केंद्रांचा समावेश असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

**विद्यापीठाचे प्रकल्प खूप चांगले**

कुलगुरू डॉ. बागला म्हणाल्या की, सोलापूरच्या विद्यापीठाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव मिळाले, ही खूप मोठी प्रेरणा आहे. लोककल्याणकारी राणी अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य खूप मोठे. विद्यापीठासाठी गुणवत्तापर्ण शिक्षण, चांगल्या सेवा सुविधा या फार म हत्त्वाच्या आहेत. विद्यापीठाचे प्रकल्प खूप चांगले असून वाटचाल चांगली असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी जीवनगौरव पुरस्कार प्राप्त मंगलताई शहा यांनी विद्यापीठाच्या या सन्मानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या कार्यक्रमात विद्यापीठ संकेतस्थळावरील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासन केंद्राच्या वेबपेज लिंकचे अनावरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. तेजस्विनी कांबळे व प्रा. श्रुती देवळे यांनी केले.

# मानवी संरक्षण देवता : माता पोशम्मादेवी

देवी पोशम्मा ही एक मातृदेवी आहे. जिची प्रामुख्याने तेलंगणा आणि आंध्र प्रदेशातील लोक पूजा करतात. ती सर्व प्रकारच्या आजारांपासून लोकांना वाचवते आणि त्यांना त्यांच्या शत्रूंपासून वाचवते आणि त्यांच्या जीवनात सर्व समृद्धी देते. देवी पोशम्मा ही एक मानवी संरक्षक देवता आहे आणि तिला ग्रामदेवता मानले जाते.

देवी पोशम्मा यांना समर्पित सर्वात महत्त्वाचा उत्सव म्हणजे जुलै-ऑगस्ट महिन्यात साजरा केला जाणारा बोनालू सण. पोशम्मा ही देवी कालीचे एक रूप मानले जाते. असे म्हटले जाते की, जर लोक तिला नाकारतील किंवा नापसंत करतील तर ती त्यांच्यासाठी समस्या निर्माण करेल आणि तिच्या आज्ञाभंग करणाऱ्यांना विविध रोग देईल. परंतु पवित्र माता कधीही असे करणार नाही. खरं तर, ती लोकांच्या चुका सुधारेल आणि त्यांना जाणीव करून देईल की, ती त्यांची दिव्य आई आहे. आदिलाबाद जिल्ह्यात, पोशम्माला गज्जेलम्मा असे म्हणतात. पोशम्माची मूर्ती बारीक लाकडापासून बनवली जाते आणि कडुलिंबाच्या झाडाजवळ ठेवली जाते. सहसा तिला पिवळ्या रंगाचे कपडे घातले जातात. भक्त तिच्या लहान मूर्ती बनवतात आणि मंदिरात ठेवतात. तिचे पती महामुनी हे जंगलातील सर्व प्राणी, पक्षी, लहान कीटक, मुंग्या आणि झाडांचे रक्षक देवता आहेत. गावोगावी बोनाला पांडुगा आणि पोचम्मा पांडुगा हा उत्सव साजरा केला जातो. साधारणपणे लोक रविवारी तिची पूजा करतात. भक्त पूजा आणि 'अभिषेक' करतात आणि तिला फुलांनी सजवतात आणि देवीला फळे आणि खाद्यपदार्थ जसे की सुंदळ, मिश्रित तांदूळ अर्पण करतात आणि पूजा झाल्यानंतर पूजा करणाऱ्यांना वाटतात. जरी तिला आवडत नाही, तरी या मंदिरात दैवी आईला प्रसन्न करण्यासाठी पशुबळी देखील दिला जातो.माता पोशम्मा आपल्या जीवनाच्या प्रत्येक वळणावर आपल्यासोबत येतील आणि आपली कायमची रक्षक असतील. आपल्या जन्मापासून, आपल्या मृत्यूपर्यंत, ती आपल्या जीवनाच्या प्रत्येक क्षणात आपल्यासोबत असेल आणि आपल्याला अधिक धैर्य, शक्ती, उत्साह, ज्ञान आणि शहाणपण देईल. ती आपले भयानक आजार बरे करेल आणि मागील जन्मात केलेली पापे कमी करेल आणि आपल्याला बाहेरील जगात मुक्तपणे चालण्यास भाग पाडेल आणि शेवटी तिच्यावरील आपल्या शुद्ध भक्तीच्या आधारे आपल्याला मोक्ष देईल.

नितीन पेंटर
मो. ९५६११११११०१





सोलापुरात श्री मरिआई व पोशम्मा देवस्थानाची स्थापना कै. हणमंतराव बसप्पा पेंटर ह्यांनी जवळपास १०० वर्षांपूर्वी केली.त्यावेळी बेगम पेठ,पेंटर चौकात बहुतांश पद्मशाली समाजाचे कुटुंब ह्या भागात मोठ्या प्रमाणात वास्तव्यास होते. कालांतराने काही कारणास्तव बऱ्याच कुटूंबांनी इथून स्थलांतर केल्याने आता फक्त आषाढ महिन्यात नैवेद्य व देवीच्या दर्शनास मोठ्या प्रमाणात सर्व जाती समाजातील भक्तगणांची गर्दी येथे भक्तिमय वातावरणात पहावयास मिळते. अनेकांची मनोकामना येथे पुर्ण झाल्याने जागृत देवस्थान देखील म्हटलं जातं. गेल्याच वर्षी या मंदिरात श्री.मरिआई व पोशम्मा मातेचे प्राण-प्रतिष्ठापना व जीर्णोद्धार अतिशय सुंदर पद्धतीने भक्तगण व मित्र मंडळी ह्यांच्या यथाशक्ती देणगीतून उभारण्यात आले आहे. यंदाच्या आषाढी सणात नव्याने उभारलेल्या मंदिरात दर्शनास व पाहण्यास आलेला भाविकाला कौतुकास्पदाची थाप देण्यास मोह आवरत नाही.

सद्या महाराष्ट्रामध्ये प्रामुख्याने सोलापूर शहरात इतर समाजासह पद्मशाली समाज मोठ्या प्रमाणात असल्याने मरीआई पोशम्मा हा उत्सव मोठया प्रमाणात साजरा केला जातो. आषाढ महिन्यात ठिकठिकाणी या देवीला नैवेद्य दिले जातात. मरीआई, महाराष्ट्रात पूजली जाणारी एक लोकदेवी आहे, जिला रोगराई, विशेषतः साथीच्या रोगांपासून संरक्षण करणारी देवी मानले जाते. मरीआईला संतुष्ट करण्यासाठी तिची पूजा केली जाते आणि तिच्या उपासनेमुळे गावावरील रोगराईचे संकट दूर होते, अशी लोकांची श्रद्धा आहे. देवी पोशम्मा ही एक मातृदेवी आहे, जिची प्रामुख्याने तेलंगणा आणि आंध्र प्रदेशातील लोक पूजा करतात. ती सर्व प्रकारच्या आजारांपासून लोकांना वाचवते आणि त्यांना त्यांच्या शत्रूंपासून वाचवते आणि त्यांच्या जीवनात सर्व समृद्धी देते अशी श्रद्धा आहे. ही एक दक्षिण भारतीय देवी आहेत, आषाढ महिन्यात, पावसाळ्यामुळे होणारे रोग आणि साथीचे आजार टाळण्यासाठी त्यांची विशेष पूजा केली जाते. पोशम्मा देवीला आरोग्य आणि समृद्धीची देवी मानले जाते. आषाढ महिन्यात तेलुगू समाजात पावसाळ्यामुळे होणाऱ्या आजारांपासून संरक्षण मिळावे यासाठी त्यांची पूजा केली जाते.




सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


## श्रीमद्भागवत ग्रंथ म्हणजे परिपूर्ण ग्रंथ होय : हभप डॉ. जयवंत बोधले महाराज

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. १ ऑगस्ट-

श्रीमद्भागवत हा परिपूर्ण ग्रंथ आहे. तत्वज्ञानाच्या दृष्टीने यासाठी ३ गोष्टी महत्वाच्या आहेत. अपूर्ण, पूर्ण आणि परिपूर्ण होय. यामध्ये 'अपूर्ण' म्हणजे ज्याच्याकडे ज्ञान नाही असा; 'पूर्ण' म्हणजे ज्याच्याकडे ज्ञान आहे असा आणि 'परिपूर्ण' म्हणजे असलेले ज्ञान जगाला देण्याचे सामर्थ्य ज्यांच्याकडे आहे असा.भागवत ग्रंथ हा संपूर्ण विश्वाला ज्ञान देणारा ग्रंथ आहे म्हणून श्रीमद्भागवत कथा ही परिपूर्ण आहे, असे निरुपणकार श्रीगुरु डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी सांगितले. ते आज ७ व्या दिवशीच्या श्रीमद्भागवत कथा चिंतन या विषयावर निरुपण करीत होते. सुतमुनी आणि शौनक ऋषी या दोघांमध्ये संवाद सुरु आहे. सुतमुनी सांगतात की, भागवत कथा हे 'कथासार' आहे. सर्व कथांचे सार म्हणजे भागवत होय तसेच सर्व कथांमध्ये श्रेष्ठ कथा म्हणजे भागवत कथा होय. भक्ती, ज्ञान आणि वैराग्याने निर्माण होणारा विवेक कशाने वाढेल? त्या संबंधात विवेक कशाला म्हणावे? संत ज्ञानेश्वर महाराजांनी हरिपाठात सांगितले आहे- 'सारासार विचार हरिपाठ।' अर्थात सार आणि असार ज्याला कळले तो विवेक समजावा. थोडक्यात चांगलं काय आणि वाईट काय? हे ज्याला कळले तो विवेक होय. त्याचप्रमाणे, तात्विक दृष्टीने वैराग्य म्हणजे इहलोकापासून परलोकातपर्यंत मनलेल्या अनुकूल भोगाच्या त्यागाच्या भूमिकेस वैराग्य असे म्हणतात. यासाठी, डॉ. जयवंत महाराज उदाहरण देतात की, छत्रपती शिवाजी महाराजांनी पाठविलेला सोन्याचा नजराणा तुकाराम महाराज नको म्हणतात हे खरे वैराग्य होय. शौनक ऋषी सुतमुनींना म्हणतात- आता आम्हाला श्रीमद्भागवत कथासार सांगा आणि विवेक कशाने वाढेल ते सांगा. डॉ जयवंत महाराज स्पष्ट करतात, मी कोण आहे? याचा विचार करणे हा खरा विवेक होय. हा विवेकानेच आत्मानुभूती येत असते. पुढे या भागवत कथेत देवर्षी नारद मुनी संचार करत करत बद्रीनाथाला जातात. तेथे त्यांची सनतकुमार यांच्याशी भेट होते. त्या ठिकाणी सनतकुमारांनी नारदांना विचारले, नारदजी, तुम्ही सर्व गोष्टीतून मुक्त असून, ही तुमच्या चेह-यावर चिंता दिसून येतेय..! असे का? काय झाले आहे? तेव्हा, नारदमुनी म्हणाले, मी पृथ्वीवर जेव्हा विहार करण्यास आलो तेव्हा मी फिरत फिरत साळीकडे पाहत होतो. सर्वत्र अधर्म दिसतोय, उपद्रवी माणसे आहेत, फसवणूक आणि छल-कपटीचा व्यवहार चालू आहे. संत म्हणून घेणारे सुध्दा पाखंडी दिसून आले. येथे कन्येचा विक्रय केला जातो. पती-पत्नीत कलह आहेत. हिंदू संस्कृतीचे महत्त्व राहिले नाही. नारद अशा प्रश्नांनी द्विदावस्थेत होते. पण एकेठिकाणी एक तरुण स्त्री आहे व वृद्ध दोन पुत्र आहेत हे पाहून नवल वाटले .ती स्त्री म्हणजे भक्ती होय व ते दोन पुत्र म्हणजे ज्ञान व वैराग्य होय. नारदांनी इथे भक्तीचे महात्म्य गायले आहे व या दोन पुत्रांना जागे करण्याचा प्रयत्न करीत आहेत पण हे दोन जागे होत नाहीत. तेव्हा नारदांना चिंता वाटू लागली की, हे जागे कसे होतील. तेव्हा आकाशवाणी झाली, नारदा तुम्हाला एक साधन करावे लागेल. तुम्हाला संत शिरोमणी भेटतील. ते तुम्हाला साधन सांगतील. तेव्हा, बद्रीनाथाला पोहोचल्यावर सनत कुमारांना भेटून नारदांना संतांना भेटल्याचा आनंद झाला. तेव्हा, सनत् कुमार सांगतात, तुम्ही 'अनुष्ठानपूर्वक श्रीमद्भागवत कथेचे आयोजन करावं.' या पुढील निरुपण श्रीगुरु डॉ. जयवंत महाराज बोधले उद्याच्या सत्रात करतील. ही कथा ऐकताना मंदिरात निरव शांतता होती. श्रोत्यांना आता उद्याच्या प्रवचनाच्या सत्रात कथेत काय होते, याची उत्सुकता लागून राहिली आहे.


श्रावणमास प्रवचनमाला
भाग - ७

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शनिवार | दिनविशेष - |
| दि. २ ऑगस्ट २०२५ | अश्वत्थ मारुती पूजन. |
| विक्रम संवत् २०८२ | श्रावण शनिवार. |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - श्रावण | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. अष्टमी (०७.२२) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - विशाखा (३०.३४) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - शुक्ल (३०.२३) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बव (०७.२२) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** जीवनसाथीच्या सहकार्याने कौटुंबिक समस्या दूर होतील. फायदेशीर चर्चा घडून येई. भोग-विलास प्रवृत्तीत वाढ होईल. व्यापार चांगला चालेल.

**वृषभ :** सहनशिलता कमी होऊ देऊ नका. आर्थिक अडचणी येऊ शकतील. व्यापार, नौकरीम धील स्थिती मध्यम राहील.

**मिथुन:** अविवाहितांना लग्नाचे प्रस्ताव येतील. कामकाजाचे क्षेत्र विस्तारीत होईल. व्यापाराकरिता आजचा दिवस शुभ जाईल.

**कर्क :** विश्वासदर्शक वातावरण राहील. स्वतःच्या प्रयत्नाने सम ाजात मान मिळेल.

**सिंह :** प्रतिष्ठित व्यक्तींच्या उदारपणामुळे आपली कार्यक्षमता वाढणार आहे. कामकाजात सुधारणा होईल.

**कन्या :** व्यापार चांगला चालेल. कार्यक्षेत्रात नवीन कामाची योजनेमुळे फायदा होईल. मेहनतीचे उचीत फळ मिळेल.

**तुळ :** नवीन कामाची आखणी कराल. फायदेशीर बातम्या ऐकण्यास मिळतील. जुना रोग उदभवण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक :** साहित्य वाचनाची गोडी वाढणार आहे.आधिकारी लोकांशी नवीन संबंध जुळतील. चैनीच्या वस्तू घेण्याकडे आपला ओढा राहील. रोजगारात प्रगती होईल. खर्चावर नियंत्रण राखा.

**धनु :** आपली कार्यकुशलता व इतरांच्या सहयोगाने कामात यश मिळेल. आपले विचार योग्य असतील.

**मकर :** नातेवाईकाशी असलेले संबंध मर्यादित ठेवा. मुलांच्या प्रकृतीत सुधारणा होईल. विरायधीन असलेले कामे पार पडतील.

**कुंभ :** लोकांशी संपर्क वाढवून आपण आपल्या योजना पूर्णत्वास न्याल. राजकीय लोकांपासून फायदा होईल. व्यापारात नवीन संबंध प्रस्तापित होतील.

**मीन :** रचनात्मक कार्यात प्रगती होईल. मुलांच्या इच्छा पूर्ण होतील. फायद्याच्या संधी मिळतील. मित्रांची मदत मिळेल. व्यवहारात नम्रता व सहनशिलता आवश्यक आहे.

# आई हा कुटुंबाचा कणा : डॉ. चिडगुपकर

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १ ऑगस्ट-



आई हा कुटुंबाचा कणा आहे. ती केवळ कुटुंब वाढवत नाही तर त्याचे आधारस्तंभही असते. त्यामुळे तिचे आरोग्य टिकवणे अत्यंत महत्त्वाचे आहे, आईच्या आहारात प्रोटीनयुक्त अन्नपदार्थ असणे गरजेचे आहे. आहारातील मोठा भाग प्रोटिन्सनी भरलेला असावा. यासाठी डाळी, मोड आलेली कडधान्ये आणि हिरव्या पालेभाज्यांचा आहारात समावेश केला पाहिजे. सर्वांनी आरोग्यदायी आहार घ्यावा, बाळासाठी केवळ आणि केवळ आईचे दूधच योग्य असून, कृत्रिम अन्नपदार्थ किंवा तयार दूध देणे टाळावे. बाळाच्या पहिल्या सहा महिन्यांत केवळ स्तनपानच आवश्यक असून ते बाळाच्या आरोग्यासाठी अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन स्त्रीरोग व प्रसूती शास्त्र तज्ञ डॉ. मीनल चिडगुपकर यांनी केले.

त्या रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर इलाईट, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा, सोलापूर महानगरपालिका साबळे नागरी आरोग्य केंद्र, एकात्मिक बालविकास नागरिक प्रकल्प केंद्र क्र. १ व डॉ. चिडगुपकर हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक स्तनपान जनजागृती सप्ताह निमित्त गरोदर महिला व स्तनदा मातांना प्रोटीन पावडर वाटप कार्यक्रमात बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर हे होते. कार्यक्रमाचे उद्घाटन रोटरी ई क्लबचे अध्यक्ष बालमुकुंद राठी यांच्या हस्ते रोपाला पाणी देऊन करण्यात आले. यावेळी फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन.बी. तेली, कार्यकारी सदस्या प्रा. डॉ. विजया महाजन, डॉ. राजीव प्रधान, कॅन्सर सर्जन डॉ. अवधूत डांगे, डॉ. सारिका नरळे,दीपमालिका राठी, पी.एच. एन. भूमिका माने, संदीप कुलकर्णी, अर्पिता डोईजोडे, मोनिका तोष्णीवाल, पायल तापडिया, सीमा धुताडा, राणी सोनाली उपस्थित होते. अध्यक्षीय समारोप करताना डॉ. श्रीकांत येळेगावकर स्वागत डॉ. अवधूत डांगे यांनी केले. प्रास्ताविक सुत्रस्त्र गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन वीरेंद्र परदेशी यांनी केले तर आभार डॉ. विजया महाजन यांनी मानले.



## बहुजन समाज पार्टीच्या वतीने अण्णाभाऊ साठेंना अभिवादन

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १ ऑगस्ट-

बहुजन समाज पार्टीच्या वतीने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर व साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून अण्णाभाऊ साठे यांच्या जन्मगावी वाटेगाव,सांगली येथे बहुजन समाज पार्टी आयोजित जंयती समारोहास रवाना झाले. यावेळी जिल्हा अध्यक्ष बबलू गायकवाड,शहर अध्यक्ष देवा उघडे, मुस्लिम भाईचारा प्रदेश संयोजक रशीद सरदार, जिल्हा कार्यालयीन सचिव शिलवंत काळे,शहर प्रभारी सुहास सुरवसे, शहर युवक अध्यक्ष अमर साळवे, अक्कलकोट अध्यक्ष विठ्ठल आरेनवरू, सोलापूर शहर उत्तर महासचिव जालिंदर मसलखांब, नागनाथ गायकवाड, प्रमोद राऊत, अंबादास तुपसाखरे उपस्थित होते.

## मधमाशी संवर्धन कार्यशाळेत १५० जणांचा सहभाग

### युगंधर फाऊंडेशनच्या वतीने आयोजन

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १ ऑगस्ट-

युगंधर फाउंडेशनच्या माध्यमातून आणि CBRTI पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने मधमाशी पालन आणि मधमाशी संवर्धनासाठी एक दिवसीय जाणीव जागृती कार्यक्रम दि. १ ऑगस्ट रोजी शिवाजी नाईट महाविद्यालय आयोजित करण्यात येणार आले होते. त्याकरिता सोलापूर शहर आणि परिसरातील १५० विद्यार्थी आणि नागरिकांनी यांनी सहभाग नोंदविला अशी माहिती युगंधर फाऊंडेशनच्या अध्यक्ष आणि सीबीआरटीआय पुणे यांच्या मास्टर ट्रेनर प्रा.रेश्मा माने यांनी दिली.



पर्यावरण संवर्धनासाठी मधमाशी वाचविणे आणि जास्तीत जास्त शाश्वत आणि सेंद्रिय शेती कडे शेतकऱ्यांनी वळावे कमीत कमी कीटकनाशक वापर करावा असे आवाहन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्राणीशास्त्र अभ्यासक डॉ सिद्धार्थ तळभंडारे यांनी केले यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शिवाजी नाईट कॉलेज चे प्राचार्य डॉ. अरुण मित्रगोत्री उपस्थित होते.

तसेच १५०विद्यार्थी आणि प्राध्यापक यांनी सहभाग नोंदविला हा उपक्रम घेण्यास शिवाजी कॉलेज चे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ युवराज सुरवसे यांनी केले सहकार्य केले. सदर कार्यशाळा मोफत घेण्यात आली होती. कार्यशाळेत मधमाशी पालन आणि भविष्यातील संधी मधमाशी संवर्धनासाठी उपाययोजना यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. सोलापूर शहर आणि जिल्हात अशा कार्यशाळा जास्तीत जास्त घेऊन मधमाशी संवर्धन आणि मधमाशी पालन करण्यास तरुणांनी सेवाभावी संस्थानी, शेतकरी गटांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन युगंधर फाऊंडेशन च्या अध्यक्ष प्रा. रेश्मा माने यांनी केले. सूत्रसंचालन युगंधर फाऊंडेशन च्या मा सुप्रिया माने यांनी केले तर आभार राहुल लोंढे यांनी मानले.

## शेतीच्या वादातून दोघांना मारहाण

सोलापूर, दि. १ ऑगस्ट-

शेतीच्या वादातून महिलेसह दोघांना मारहाण करण्यात आली. ही मारहाण गुरुवारी सकाळी अकराच्या सुमारास मंगळवेढा तालुक्यातील रेवेवाडी येथे झाली. अमोल शंकर लवटे (वय २३), विमल शंकर लवटे (वय ४२ , रा. रेवेवाडी (ता. मंगळवेढा) असे मारहाण झालेल्या दोघांची नावे आहेत. अमोल आणि विमल या गुरुवारी सकाळी अकराच्या सुमारास त्यांच्या राहत्या घराजवळ होते. त्यावेळी नारायण लवटे, सागर लवटे व सुमन लवटे यांनी दगड, कु-हाडीचा दांडयाने मारहाण केली. यात विमल यांच्या डोक्याला जखम झाली तर अमोल याच्या सर्वांगास मुकामार लागल्याने ते दोघे स्वत: शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



## नूतन उपशिक्षणाधिकारी श्रीधर भोसले यांची सलगर जि.प.शाळेला भेट

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १ ऑगस्ट-

जिल्हा परिषद सोलापूर मध्ये नव्याने रुजू झालेले उपशिक्षणाधिकारी भोसले यांनी आपल्या कामकाजाची सुरुवात मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या स्पर्धात्मक उपक्रमात तालुका स्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा सलगरमध्ये भेट देत केली. मुख्याध्यापक दत्तात्रय पोतदार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या शाळेच्या कामकाजाची पाहणी श्रीधर भोसले यांनी केली. मुख्याध्यापक पोतदार यांनी ८० लाखांपर्यंत CSR फंडाच्या मार्फत शाळेत ३५ संगणक संच असलेले वातानुकूलित संगणक कक्ष तसेच वातानुकूलित प्रयोगशाळा, परसबाग निर्मिती आणि त्यातील QR CODE, प्रत्येक वर्गात असणारी साऊंड सिस्टीम, बोअरवेल, ड्रीप सिस्टीम, शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत स्कूल बॅग, वह्या, कंपास यांचे वाटप तसेच डिजिटल करण्यात आलेल्या वर्गांचे निरीक्षण भोसले यांनी यावेळी केले.

## पानमंगरूळ येथील तरुणाचा विहीरीत पडून मृत्यू

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १ ऑगस्ट-

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुंभारी परिसरातील विहीरीत पडून तरुण मृत्यू झाला. हा प्रकार गुरुवारी दुपारी १.३० च्या सुमारास उघडकीस आला.

अग्निशमन विभागाच्या मदतीने तरुणाला विहीरीतून बाहेर काढण्यात आले. यावेळी विहीरीच्या परिसरात बघ्यांची मोठी गर्दी जमली होती. हा तरुण अक्कलकोट तालुक्यातील पानमंगरूळ येथील आहे. आकाश काशिनाथ कंगार (वय २४, रा. पानमंगरूळ ता. अ.कोट) असे मृत तरुणाचे नाव आहे. गुरुवारी दुपारी १.३० च्या सुमारास कुंभारी परिसरातील मुजावर वस्ती येथील मौला मुजावर यांच्या शेतातील विहीरीमधील पाण्यात आकाश हा बेशुद्ध अवस्थेत मिळून आला. त्यास अग्निशमन दलाच्या मदतीने बाहेर काढण्यात आले.

वळसंग पोलीस ठाण्यातील हवालदार मोरे यांनी दुपारी २.३५ वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे. त्याच्या पश्चात पत्नी, वडील असा परिवार आहे.



## माजी आमदार दिलीप माने यांच्या वाढदिवसानिमित्त कुमठे महाविद्यालयात वृक्षारोपण

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १ ऑगस्ट-

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन माजी आमदार दिलीपराव माने यांच्या वाढदिवसाच्या निमित्त कुमठे प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये वृक्षारोपण करण्यात आले.

पोलीस दलात कार्यरत असलेले कनिष्ठ महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री परशुराम लांबतुरे यांच्या हस्ते वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित केला. कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य जयसिंग गायकवाड, पर्यवेक्षक वसंत गुंगे, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रमुख संजय जाधव वृक्षप्रेमी नारायण कदम, कोळी इतर सर्व शिक्षक कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी परशुराम लांबतुरे यांनी झाडाचे आपल्या आयुष्यातील महत्व विषद केले. प्राचार्य जयसिंग गायकवाड विद्यार्थ्यांना एक पेड माँ के नाम या उपक्रमाची माहिती सांगितली. सूत्रसंचालन श्री दीपक शिंदे व आभार विष्णू थोरात यांनी केले.



## आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषदेत अभिवादन

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १ ऑगस्ट-

जिल्हा परिषद मध्ये साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती जिल्हा परिषदेमध्ये साजरी करण्यात आली. याप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या हस्ते साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करणेत आले. याप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदिप कोहिनकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्र) स्मिता पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे,समाज कल्याण अधिकारी सुलोचना सोनवणे, राज्य उपाध्यक्ष गिरीष जाधव, कर्मचारी महासंघाचे राज्य उपाध्यक्ष दिनेश बनसोडे, कास्ट्राईब संघटनेचे अध्यक्ष अरुण क्षीरसागर, प्रशासन अधिकारी अविनाश गोडसे, सहा लेखाधिकारी उमाकांत राजगुरु, प्रशासन अधिकारी सचिन सोनकांबळे, विस्तार अधिकारी मनोज म्हेत्रे, संतोष जाधव, राम दास गुरव, भीमाशंकर कोळी, शंकर चलवदे, सुशीत चाबुकस्वार, मकरंद बनसोडे, प्रणेश ओव्हाळ उपस्थित होते.

# परदेशातील अभ्यासक्रमासाठी 'ऑर्किड'च्या १६ विद्यार्थ्यांचा प्रवेश

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १ ऑगस्ट-

जागतिक शिक्षणाच्या दिशेने सोलापूरमधील विद्यार्थ्यांनी भक्कम पाऊल टाकले आहे. प्रज्ञा निकेतन एज्युकेशन सोसायटी, पुणे संचलित नागेश करजगी ऑर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी येथील स्टडी एब्रॉड सेलच्या मार्गदर्शनामुळे मागील दोन वर्षात १६ विद्यार्थ्यांनी अमेरिका, जर्मनी, फ्रान्स, आयर्लंड, युके आणि ऑस्ट्रेलिया येथील नामांकित विद्यापीठांमध्ये पदव्युत्तर (एम.एस.) शिक्षणासाठी व तत्सम अभ्यासक्रमांसाठी यशस्वी प्रवेश मिळवला आहे.

सन २०२४ मध्ये ७ विद्यार्थी आणि २०२५ मध्ये ९ विद्यार्थ्यांनी या यशस्वी प्रवेशांची नोंद केली. या वर्षी मेकॅनिकल, सिव्हील, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजि., आर्टिफिशिअल इंटेलिजीन्स अँड डाटा सायन्स व कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग या शाखांमधून एकूण ९ विद्यार्थ्यांनी आर. डब्ल्यू.टी.एच. आखन (जर्मनी), अमेरिकेतील मिशिगन विद्यापीठ, आर्यलॅंडमधील डी.सी.यु. डब्लीन, फ्रान्समधील आय. एस.ई.पी. पॅरिस, ऑस्ट्रेलिया येथील वेस्टर्न ऑस्ट्रेलिया विद्यापीठ आणि न्यूकॅस्टेल विद्यापीठ यांसारख्या आंतरराष्ट्रीय विद्यापीठांत प्रवेश मिळवून पुढील शिक्षणासाठी प्रस्थान ठेवले आहे.

या यशासाठी उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास एस. मेतन, प्रा. प्रिया चिमनचोडे, समाधान पाटील, हरीबा पांगळे, राम भोसले, प्रमोद लिगाडे यांनी परिश्रम घेतले. सर्व विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. बी. के. सोनगे, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास एस. मेतन, उपप्राचार्य डॉ. व्ही. के. पत्की यांनी अभिनंदन केले.



**आजपर्यंत ७८ पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी परदेशात शिक्षण घेतले**



ऑर्किड कॉलेजमधील स्टडी अब्रॉड सेल परदेशात उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक व्यासपीठ आहे. या सेलद्वारे विद्यार्थ्यांना युनिव्हर्सिटी शॉर्टलिस्टिंग, मानक कार्यप्रणाली आणि शिफारस पत्र तयार करणे, आंतरराष्ट्रीय इंग्रजी भाषा चाचणी प्रणाली/पदवीधर रेकॉर्ड परीक्षा मार्गदर्शन, व्हिसा प्रक्रिया, शिष्यवृत्तीची माहिती, मॉक इंटरव्ह्यू अशा विविध टप्प्यांवर सुसंगत मदत दिली जाते. यामुळे आजपर्यंत ७८ पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी या सेलमधून परदेशात शिक्षण घेतले आहे.

-डॉ. श्रीनिवास मेतन,
स्टडी अॅब्रॉड सेल प्रमुख व फॉरेन युनिव्हर्सिटी इन्चार्ज

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


# मोहोळमध्ये लम्पीचा शिरकाव; दोन जनावरे दगावली

## ४७ जनावरांना बाधा; ३८ जनावरे झाली बरी

**तभा वृत्तसेवा,**
**वाळूज, दि. ३१ जुलै-**

मोहोळ तालुक्यात लम्पीचा शिरकाव झाला असून लम्पीमुळे तालुक्यात वाळूजमधील देशी गायीसह दोन जनावरे दगावली आहेत. तालुक्यात ४७ बाधित जनावरांपैकी ३८ जनावरे लसीकरणामुळे व इतर उपचारामुळे बरी झाली आहेत. संसर्ग रोखण्यासाठी लसीकरण मोहिमेला गती देण्यात आली असून सर्व शेतकरी व पशुपालकांनी त्वरित लसीकरण करून घेण्याचे आवाहन पशुधन अधिकारी डॉ. कैलास चव्हाण यांनी केले आहे. अशी माहिती, पंचायत समितीचे दिली.

लम्पी त्वचा रोग हा गोवंश व म्हैस वर्गातील जनावरांना होणारा विषाणूजन्य, वेगाने पसरणारा संसर्गजन्य आजार आहे. या रोगाचा कीटकांपासून प्रसार होतो. सध्या तालुक्यातील पशुपालक चिंतेत आहेत. एका शेतकऱ्याकडे किमान ८ते १० गाई आहेत. चांगल्या दुभत्या गाईची किंमत एक लाख रुपये आहे. लम्पी रोगाने शिरकाव केल्याने शेतकरी चिंतेत आहेत. लम्पीमुळे सोलापूर जिल्हा नियंत्रित क्षेत्र म्हणून प्रभारी जिल्हाधिकारी कुलदीप जंगम यांनी घोषित केला असल्याचे श्री. चव्हाण यांनी सांगितले. जनावरांचा आठवडा बाजार, बैलांच्या शर्यती व जनावरांची वाहतूक करावयाची असेल तर २ दिवसापूर्वीचे प्रमाणपत्र पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून 'गोटपॉक्स' लसीकरण झाल्याचे घेणे बंधनकारक आहे. तसेच बाधित जनावरांच्या संपर्कातील वैरण, गवत, शव, कातडी आदी नियंत्रण कक्षातून बाहेर नेण्यास बंदी घातली आहे.

**मोहोळ तालुक्यातील सद्य:स्थिती:**
लसीकरण झालेली जनावरे : ६९ हजार १००, बाधित जनावरे : ४७, बरी झालेली जनावरे : ३८, मृत्यू झालेली जनावरे :०२, उपचार सुरू असलेली जनावरे : ०७

तालुक्यात बहुतांश जनावरांचे लसीकरण करण्यात आले आहे. जनावरांच्या गोठ्यात फवारणी करून गोचिड निर्मूलन करण्यासाठी दवाखान्यात औषधे उपलब्ध आहेत. शेतकऱ्यांनी घाबरून न जाता नजीकच्या दवाखान्यात बाधित जनावरांवर उपचार करून घ्यावेत.
- डॉ. कैलास चव्हाण,
पशुधन अधिकारी, पं.स. मोहोळ

# महत्वाचे...



## कम्युनिस्ट पक्ष, आयटक कामगार केंद्रातर्फे अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

**बार्शी, दि. २ ऑगस्ट-**

भारतीय कम्युनिस्ट पक्ष व आयटक कामगार केंद्र यांच्या संयुक्तवतीने आज १ ऑगस्ट रोजी बार्शी येथील पुतळा पार्कमधील कॉम्रेड शाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला कॉ. प्रमोद मंडलिक यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन १०५ व्या जयंतीनिमित्ताने अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या जय जयकाराच्या घोषणा देऊन त्यांना लाल सलाम करण्यात आला. यावेळी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे कॉ. तानाजी ठोंबरे, प्रमोद मंडलिक, प्रविण मस्तुद, किसन मुळे, अनिरुद्ध नखाते, बालाजी शितोळे, भारत भोसले, आनंद गुरव, आनंद धोत्रे, भारत चव्हाण, भारत पवार, सुरेश शितोळे आदी उपस्थित होते. तसेच बार्शीत विविध राजकीय पक्ष, संस्था व संघटनाच्यावतीने पुतळा पार्क येथील शाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.



## कर्मयोगी इंस्टिट्यूटच्या विद्यार्थ्याची बृहन्मुंबई महानगरपालिकेत निवड

**पंढरपूर,दि.१ ऑगस्ट-**

कर्मयोगी इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी शेळवे येथील स्थापत्य अभियांत्रिकी शाखेतील माजी विद्यार्थी पाराप्पा तुकाराम गुटूकडे या विद्यार्थ्याची बृहन्मुंबई महानगरपालिका येथे दुय्यम अभियंता (स्थापत्य) पदावर निवड झाली आहे अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. पाटील यांनी दिली. पाराप्पा गुटूकडे हे मूळचे हुलजंती गावाचे असून त्यांचे अभियांत्रिकीचे शिक्षण शेळवे येथील कर्मयोगी इंस्टिट्यूटमधील सिव्हिल इंजिनियरिंग विभागामध्ये पूर्ण झाले. त्यांना मिळालेल्या यशाबद्दल महाविद्यालयामध्ये त्यांचा नुकताच गौरव करण्यात आला. श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस पी पाटील, कर्मयोगी पॉलिटेक्निक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ ए बी कणसे, रजीस्ट्रार श्री. जी डी वाळके, उपप्राचार्य प्रा. जे एल मुडेगावकर, शैक्षणिक अधिष्ठाता प्रा.राहुल पांचाळ, प्रा. मोहसिन शेख, विभागप्रमुख प्रा. अनिल बाबर, डॉ. एस एम लंबे, डॉ. एस व्ही एकलारकर, प्रा.दिपक भोसले, प्रा. अभिनंदन देशमाने तसेच सर्व प्राध्यापकांनी गुटूकडे यांच्या निवडीसाठी अभिनंदन केले.



## मनसेच्या वतीने अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांना अभिवादन

**पंढरपूर, दि.१ ऑगस्ट-**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी पंढरपूर येथील मनसे कार्यालयात संयुक्तरित्या साजरी करण्यात आली. याप्रसंगी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन मनसे नेते दिलीप धोत्रे, आमदार अभिजीत पाटील यांच्या हस्ते करून मनसेच्या वतीने अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी आमदार अभिजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या वतीने करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी मनसे तालुकाध्यक्ष शशिकांत पाटील, अनिल बागल, संजय बंदपट्टे, संतोष कांबळे, दत्ता भोसले, ॲड. पराग जहागीरदार उपस्थित होते.



## मनोज जरांगे-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त १०३ जणांचे रक्तदान

**बार्शी, दि. १ ऑगस्ट-**

मराठा समाजाचा आरक्षणाचा लढा ताकतीने लढणारे संघर्ष योद्धा मनोज जरंगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त वानेवाडी या ठिकाणी रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले. यावेळी १०३ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी आनंद काशीद यांनी मनोगत व्यक्त केले. शिबीर यशस्वी करण्याकरिता कालिदास यादव, बालाजी सटाले, समाधान यादव, दत्ता गात यांच्यासह गाताचेवाडी परिसरातील सर्व समाज बांधवांनी परिश्रम घेतले.

# माढयात अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि.१ ऑगस्ट-**



मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळ,एबीएस मंडळ, वादळ ग्रुप यांच्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांकडून अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले तसेच आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे चौकाच्या अनावरण करण्यात आले. तसेच आद्यक्रांतीगुरु लहुजी वस्ताद साळवे यांच्या चौकात बसवण्यात आलेल्या हाय मास्ट दिव्याचे उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी माढा नगरपंचायतच्या नगराध्यक्षा ॲड.मीनल साठे, उपनगराध्यक्षा कल्पना जगदाळे, संत कुर्मदास सहकारी साखर कारखान्याचे संचालक दादासाहेब साठे मा. जि.प.सदस्य झुंजार नाना भांगे, मा. ग्रा.स. गुरुराज कानडे, नगरसेवक शहाजी साठे, सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी बंडगर, नगरसेवक आजिनाथ माळी, अरुण कदम, नाना साठे, भारत खंडागळे, सलीम पिंजारी, अशोक जानराव, अशोक माने, मा.नगराध्यक्ष गंगाराम पवार, किरण पवार, कुंदन पवार, गणेश पवार, दत्ता पवार, दिनेश गाडेकर, विकास साठे, डॉ. विकास मस्के, शिवाजी जगदाळे, सुधीर लंकेश्वर, गणेश मोरे, रामेश्वर पवार, निखिल पवार, सचिन साबळे, बापू साबळे, सचिन बगाडे, समर्थ लोखंडे, रणजित देवकुळे, अरविंद कदम, प्रविण पवार, आण्णा पवार उपस्थित होते.

माढ्यातील शिवाजीनगर, पवार प्लॉट येथे देखील अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. तसेच मोरया सोशल फाउंडेशन माढा यांच्या वतीने लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. जयंतीचे औचित्य साधून नवयुग शिक्षण प्रसारक मंडळ संचालित आश्रम शाळेस अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य संग्रहातील फकिरा, वारणेचा वाघ, कृष्णाकाठच्या कथा अशा विविध कादंबऱ्या येथील ग्रंथालयास भेट देऊन उपक्रम घेण्यात आला. त्याप्रसंगी आश्रम शाळेचे अध्यक्ष महेश हरहरे, प्रभाकर जाधव, रामहरी वहिल, भिवाजी जगदाळे औदुंबर वाकावकर, अजिंक्य काटे, प्रमोद जाधव, रवींद्र कोल्हे, प्रभू जगदाळे, बाबुराव जगदाळे उपस्थित होते.

## व्यापारी प्रतिष्ठान गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी रोहन कालेकर

**तभा वृतसेवा,**
**पिलीव दि १ ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे यंदाच्या गणेशोत्सवापासून नव्यानेच सुरू झालेल्या व्यापारी प्रतिष्ठान गणेशोत्सवाच्या २०२५ च्या गणेशोत्सवासाठी पदाधिकाऱ्यांच्या निवडी उत्साहात व आनंदी वातावरणात सर्वोनुमते करण्यात आली.

यामध्ये अध्यक्षपदी रोहन कालेकर, उपाध्यक्षपदी सद्दाम काझी, खजिनदार पदी गट्टु आर्वे, सचिवपदी अमीर सय्यद, मिरवणूक प्रमुखपदी अजय खलीपे यांच्या निवडी करणयात आल्या. यावेळी परेश डिगोळे, सचिन वाघमारे, कपील कोळी, शशिकांत महामुनी, सचिन आवताडे यांच्या सह मंडळाचे सदस्य व हितचिंतक मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते. यंदा मंडळाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्याचा निर्धार बैठकीत घेण्यात आला.

# सांगोला लायन्स क्लब समाजसेवेतील प्रकाशपर्व

## सुनील सुतार : पदग्रहण सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १ ऑगस्ट-**



सांगोला लायन्स क्लबचे माजी प्रांतपाल प्रा. प्रबुद्धचंद्र झपके यांच्यामुळे सांगोल्यात व लायन वर्ष २०२४-२५ मध्ये समाजाच्या हितासाठी झालेले मौलिक कार्य म्हणजे समाजसेवेतील प्रकाशपर्व आहे, असे प्रतिपादन माजी प्रांतपाल सुनील सुतार यांनी केले. सांगोला विद्यामंदिर येथे लायन्स क्लब ऑफ सांगोला वर्ष २०२५-२६ नूतन पदाधिकारी शपथविधी व पदग्रहण समारंभ प्रसंगी पदप्रधान अधिकारी म्हणून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी प्रांतपाल प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, रिजन चेअरमन ॲड.श्रीनिवास कटकुर, झोन चेअरमन सोमशेखर भोगडे, सांगोला लायन्स क्लबचे अध्यक्ष उन्मेष आटपाडीकर, सचिव अजिंक्य झपके, खजिनदार नरेंद्र होनराव उपस्थित होते. याप्रसंगी नूतन अध्यक्ष प्रा.नवनाथ बंडगर, सचिव सुर्यकांत कांबळे, खजिनदार मंगेश म्हमाणे व संचालक मंडळास पदग्रहणाची शपथ दिली. यावेळी प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांनी लायन्समध्ये कार्यतत्परता दाखवली तर आपल्या कार्यामध्ये स्वर्ग निर्माण करता येईल. झोकून देऊन काम करा व समासेवेची उत्तुंग परंपरा कायम ठेवा असे सांगत एका गोष्टीच्या माध्यमातून मौलिक प्रबोधन केले. यावेळी ड.श्रीनिवास कटकुर, सोमशेखर भोगडे, प्रा.नवनाथ बंडगर यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी कॅबिनेट ऑफिसर उत्तम बनकर, गिरीश नष्टे, संचालक संजीव शिंदे, सुहास होनराव, शीलाकाकी झपके, प्रा.अमर गुळमिरे, डॉ.शैलेश डोंबे, अच्युत फुले, प्रदीप चोथे, हरिदास कांबळे, प्राचार्य अमोल गायकवाड, डॉ.निकिता देशमुख, कुरुंदवाडचे विजय जमदग्नी, सोलापूरचे चंद्रकांत यादव, स्वामीनाथ कलशेट्टी, यतिन शहा, बंडगर, कांबळे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात ध्वजवंदनाने झाली. प्रशांत रायचुरे यांनी वाचन केले. सचिवांचा अहवाल प्रा.प्रसाद खडतरे यांनी सादर केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उन्मेष आटपाडीकर, सूत्रसंचालन प्रा.शिवशंकर तटाळे यांनी केले. आभार सूर्यकांत कांबळे यांनी मानले.



## बार्शीत वीरशैव वधू-वर परिचय मेळावा

### अनुरूप वधू-वर सूचक केंद्राचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २ ऑगस्ट-**

सोलापूरच्या अनुरूप वधु-वर सुचक केंद्राच्या वतीने रविवारी घेण्यात आलेल्या वीरशैव लिंगायत व जंगम समाजातील सर्व पोटजातींच्या वधू-वरांचा परिचय मेळावा उत्साहात संपन्न झाला.

बार्शी येथील मोरया फंक्शन हॉल येथे हा मेळावा झाला. मेळाव्यात शंभरपेक्षा अधिक वधू-वरांनी नोंदणी केली. केंद्राचा हा ५० वा मेळावा होता. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार घालून करण्यात आली. अध्यक्षस्थानी बार्शी मर्चंट असोसिएशनचे अध्यक्ष बाबासाहेब कथले, तर प्रमुख पाहुणे म्हणून बार्शी नगरपालिकेचे विरोधी पक्षनेते नागेश अक्कलकोटे व माजी नगरसेवक पिंटू माळगे उपस्थित होते. अनुरूप स्थळांच्या शोधासाठीची धावपळ थांबावी, अनाठाई खर्च व वेळेची बचत व्हावी. यासाठी वधू-वरांनी मेळाव्यात उपस्थिती दाखवावी तसेच वीरशैव लिंगायत समाजातील सर्व पोट जातीने एकत्र येऊन पोट जातीत विवाह करणे गरजेचे असल्याचे मत अध्यक्ष कथले यांनी मांडले. श्री. अक्कलकोट यांनी समाजातील वधू- वर कुटुंबाचा संवाद कमी होत असल्याने मेळावे घेणे काळाची गरज असल्याचे सांगितले. कार्यक्रमात उपस्थित वधू-वरांचा परिचय करून देण्यात आला. उपस्थितांना अल्पोपहार व चहापाण्याची व्यवस्था करण्यात आली. भूषण रानडे यांनी सूत्रसंचालन केले. एस. एम. गणाचार्य यांनी आभार मानले.



## हन्नूरच्या प्रशालेत अकरावीच्या विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

**अक्कलकोट, दि. १ ऑगस्ट-**

महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्य. व उच्च माध्यमिक प्रशाला, हन्नूर येथे इ. ११ वी च्या नवोगत विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव उत्साही वातावरणात झाला. प्राचार्य अशोक साखरे यांच्या हस्ते संस्थापक अध्यक्ष कै. पंचप्पा कल्याणशेट्टी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सर्व नवोगत विद्यार्थी- विद्यार्थिनींचे गुलाबपुष्प व गोड भेट देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी प्राचार्य अशोक साखरे यांनी सर्व नवोगत विद्यार्थ्यांचे संस्थेच्या व महाविद्यालयाच्यावतीने स्वागत करुन शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी पर्यवेक्षक ज्ञानदेव शिंदे, सांस्कृतिक विभाग प्रमुख अप्पासाहेब काळे, जेष्ठ शिक्षक सरदार मत्तेखाने, शशिकांतअंकलगे, शिक्षिका मृदुलादेवी स्वामी, स्वप्नाली जमदाडे, कलाशिक्षक राजेंद्र यंदे, अब्दुलअझीझ मुल्ला उपस्थित होते. प्रा. काशीनाथ पाटील यांनी सुत्रसंचालन केले. प्रा. रवींद्र कालीबत्ते यांनी आभार मानले. संस्थेचे अध्यक्ष व आमदार सचिन कल्याणशेट्टी, जेष्ठ संचालक व मार्गदर्शक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्रशालेचे माजी प्राचार्य व आधारस्तंभ सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, हन्नूरचे उपसरपंच व युवा नेते सागर कल्याणशेट्टी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, सीईओ रुपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख पूनम कोकळगी यांनी अभिनंदन केले.

## विद्यापीठाच्या परीक्षेत सोजर फार्मसीच्या विद्यार्थ्यांचे यश

**बार्शी, दि. १ ऑगस्ट-**

यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सोजर कॉलेज ऑफ फार्मसीचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे अंतर्गत घेण्यात आलेले अंतिम वर्ष परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून महाविद्यालयाचा निकाल ९५.५२ टक्के लागला आहे. या परीक्षेस अंतिम वर्षातील ६७ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ५० विद्यार्थी विशेष प्राविण्यसह तर १४ विद्यार्थी प्रथम श्रेणीत पास झाले. यामध्ये प्रथम क्रमांक माने ऐश्वर्या (SGP-८.७३), द्वितीय क्रमांक विभागून कांबळे अमोघ सिद्ध, बारंगुळे पल्लवी, झाडके प्रीती, माळी समाधान (SGP- ८.५५), तृतीय क्रमांक जगताप हर्षदा, राऊत गायत्री, पवार प्रियंका, नरखेडकर सलोनी, कांबळे साक्षी (SGP- ८.३६) यांनी पटकावला. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल प्राचार्य डॉ. सुजित करपे यांनी सर्व मार्गदर्शक प्राध्यापक वृंद व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. महाविद्यालयाच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अरुण बारबोले व सचिवा कल्पना बारबोले यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# श्री वेंकटेश्वर उत्सवाची पालखी व महाप्रसादाने सांगता

## अक्कलकोटमध्ये गवंडी समाजातील गुणवंतांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १ ऑगस्ट-**



लातूर व निलंगा येथील भजन व दिंडी मंडळाच्या सहाय्याने तसेच वाजंत्रीसह दिंडी व पालखी मिरवणूकीने येथील गवंडी समाजाच्या श्री वेंकटेश्वर देवस्थानच्या ८४ व्या वर्धापन दिनानिमित्तच्या उत्सवाची सांगता झाली. यामध्ये मोठ्या श्रद्धेने व भक्तिभावाने भाविक सहभागी झाले होते.

मिरवणूक सकाळी १० वाजता बुधवार पेठेतील मंदिरातून निघाली. कारंजा चौक, मौलाली गल्ली, आझाद गल्ली, डबरे गल्ली, देशमुख गल्ली, नवश्या मारुती मार्गे मेन रोड, फत्तेसिंह चौक, सेंट्रल चौक, कापड बाजार, कारंजा चौक, विजय चौक, बस स्टॅन्ड समोरून हसापुर रोड, खासबाग, हन्नूर चौक, बुधवार पेठ येथील मंदिरात दुपारी २ वाजता पालखीचे आगमन होऊन मंदिरास पालखी प्रदक्षिणा करून पालखी सोहळ्याची सांगता झाली. दरम्यान आज श्रावण शु.अष्टमी रोजी पहाटे ५ वाजता पारंपरिक पद्धतीने देवस्थानचे पुजारी पवन देसाई यांनी काकडआरती केली. सकाळी ६ ते ७ या वेळेत पारंपरिक पद्धतीने श्रीना तुपाचा अभिषेक करण्यात आला. तदनंतर सकाळी ७ वाजल्यापासून मंदिर दर्शनाकरीता खुले करण्यात आले. उत्सवानिमित्त सकाळी १० वाजता श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथमेश इंगळे यांचे हस्ते श्रींची आरती करून पालखी मिरवणुकीचा शुभारंभ करण्यात आला. या पालखी मिरवणुकीत वाजंत्री, भजन, दिंडी इत्यादींचा सहभाग होता. तत्पूर्वी पालखी पूजनास व आरतीस उपस्थित असलेले सोलापूर गवंडी समाजचे अध्यक्ष नागनाथ माशाळकर, अक्कलकोट एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन तथा मा.नगराध्यक्ष बसलिंगप्पा खेडगी, प्रथमेश इंगळे आदीसह मान्यवरांचा सत्कार देवस्थानचे अध्यक्ष चंद्रकांत गवंडी, विश्वस्त श्रीमंत गवंडी, सचिव अप्पाशा गवंडी, विश्वस्त श्रीशैल गवंडी, श्रीमंत चेंडके यांचे हस्ते करण्यात आला. याप्रसंगी जिल्हा न्यायालयात कार्यरत श्रीनिवास गवंडी, पोलीस भरतीबद्दल अजय गवंडी, आयटीआयचे लिपीक बसलिंगप्पा खेडगी, बारावीची नंदीनी बहिरेवार (७७ टक्के), वैष्णवी गवंडी (७५ टक्के ) यांचा सत्कार करण्यात आला. दुपारी २ वाजता सर्व भाविक व सेवेकऱ्यांना भोजन महाप्रसाद देण्यात आला. यावेळी श्रीकांत गवंडी, राजू गवंडी, सतीश राजापूरे, प्रकाश भंडारी, सुनील गवंडी, भीमाशंकर गवंडी, अशोक गवंडी, सुनील गवंडी, गोकुळ गवंडी आदींसह सर्व समाजबांधव व भाविकभक्त उपस्थित होते. अमोल गवंडी, यलप्पा गवंडी, काशिनाथ राजापूरे, दौलप्पा गवंडी, परमेश्वर गवंडी, संतोष पेठकर, इरण्णा गवंडी, संतोष माने, सुधाकर गायकवाड, महांतेश गवंडी, परतरेड्डी गवंडी, राजू राजापूरे, अमरदीप साखरे, देविदास गवंडी, विजय गवंडी, विजयकुमार गुमटे, श्रीनिवास बहिरेवार, संतोष शाली, रमेश डोणुरे, खाजप्पा झंपले, दर्शन घाटगे, आदीत्य गवंडी, संतोष जमगे, शिवानंद कार्ले, राकेश गवंडी, राहुल गवंडी, राजेंद्र गवंडी, सन्मुख गवंडी, हेमंत गवंडी, वेंकटेश गवंडी , गोकुळ गवंडी, देविदास गोबरे, मल्लिकार्जुन गवंडी, डॉ.मल्लिनाथ गवंडी, वेंकट राजापुरे, श्रीशैल राजापुरे, काशिनाथ गवंडी आदींसह समाज बांधवानी परिश्रम घेतले.



## सहयोग ब्राह्मण संघातर्फे लो.टिळकांना आदरांजली

### जुळे सोलापूरच्या टिळक विद्यापीठात पुतळ्यास अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ ऑगस्ट-**

येथील सहयोग ब्राह्मण सेवा संघाच्या वतीने आज दि. १ ऑगस्ट रोजी जुळे सोलापूरच्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील लोकमान्य टिळकांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी संघाचे अध्यक्ष श्रीकांत कुलकर्णी यांनी स्वातंत्र्य लढ्यातील टिळकांचे योगदान या विषयांवर आपले विचार व्यक्त केले. यावेळी कार्यकारणी सदस्य प्रा. शुभदा देशपांडे, प्रा. किशोरी भट, आरती अरगडे, प्रकाश दिवाणजी प्रा, अवधूत काटीकर, कोषाध्यक्ष वसंत वळसंगकर, वैभव कुलकर्णी आदी उपस्थित होते.

## महत्त्वाचे



### जिल्हा परीषद कर्मचारी पतसंस्थेच्या संचालकपदी रोहित घुले यांची निवड

**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांची सहकारी पतसंस्था नं.१. सोलापूरच्या संचालक मंडळाच्या सभेत स्व. विवेकानंद लिंगराज यांच्या अपघाती निधनाने रिकामी झालेल्या रिक्त जागेवर रोहित घुले यांची निवड केली. सर्वसाधारण गटातील रिक्त जागा अध्यासी अधिकारी व सहाय्यक उपनिबंधक गावडे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या संचालक मंडळाची सभा स्व. विवेकानंद लिंगराज सभागृह मध्ये संपन्न झाली. यावेळी सर्वसाधारण एका जागेसाठी रोहित घुले यांचा एकमेव अर्ज आल्याने बिनविरोध निवड जाहीर केली.`यावेळी मार्गदर्शक दयानंद परिचारक, पंडित भोसले, प्रकाश शेटे, बी टी मोहिते, अशोक भोसले, व्ही आर गरड, व्ही डी नवले तसेच संस्थेचे चेअरमन डॉ. एस.पी. माने, व्हाईस चेअरमन एस एन कुंभार, तसेच संचालक व्ही बी पाटील, एस आर तांबोळी, एस एस कलशेट्टी, व्ही एम घेरडे, व्ही व्ही घोगरे, जी एम मारडकर, एस डी म्हमाणे, टी ए मुतवल्ली, एस एच राठोड, सी ए वाघमारे, . एम एस शिंदे, तज्ञ संचालक एस एन देशमुख, एन बी शिंदे आदी उपस्थित होते.

### ब्राह्मण महासंघातर्फे गुरुकुल स्किल डेव्हलपमेंट सेंटर सुरु

**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ पुणे च्या वतीने शैक्षणिक गुणवत्ता वाढावी व त्याचा उपयोग उत्तम नोकरी व व्यवसाय करण्यास व्हावा यासाठी 'गुरुकुल' स्किल सेंटर नुकतेच सुरु करण्यात आले. सम ाजातील मुलांना/विद्यार्थ्यांना मोफत करिअर मेंटॉरशिप, व्यावसायिक मार्गदर्शन अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या वतीने करण्यात येणार असल्याचे पुणे जिल्हाध्यक्ष मंदार रेडे यांनी सांगितले आहे. तसेच विविध आवश्यक असे ऑनलाइन आणि ऑफलाइन प्रशिक्षण देऊन त्यांना सक्षम करण्यासाठी प्रयत्न करणार आहोत. स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी ब्राह्मण महिला, युवती यांच्यासाठी मोफत सर्टिफिकेट कोर्सेसचे आयोजन करण्यात येणार आहे असे मंदार रेडे यांनी सांगितले आहे.या उपक्रमांतर्गत दि. १ ऑगस्ट पासून णडऊ व अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या संयुक्त विद्यमाने पहिली लरींलह सुरु करण्यात आली ज्यामध्ये महाराष्ट्रातून सुमारे २८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. हा कोर्स पूर्ण झाल्यावर नोकरीची हमी देण्यात आली आहे. सुरेश कुलकर्णी व यामिनी मठकरी यांनी याचे आयोजन केले आहे. आगामी काही दिवसात महासंघाकडून मोफत लेीपिळलरींळेप ेज्ञळश्रश्र , शिीपरश्रळीं डेव्हलोपमेंट , महिलांसाठी ब्युटी पार्लर कोर्सेस , कॉम्पुटर कोर्सेस घेण्यात येणार आहेत व त्याद्वारे नोकरी व स्वतःच्या पायावर व्यवसाय उभारायला, आत्मनिर्भर होण्यासाठी मदत होणार आहे. अनेक प्रतिष्ठित उद्योजक मंडळी या उपक्रमासाठी मार्गदर्शन करणार आहेत.



### पंढरपूर 'सिंहगड' मध्ये ६० तासांचे सॉप्टस्कीलचे प्रशिक्षण

**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

पंढरपूर सिंहगड महाविद्यालयामध्ये अंतिम वर्षात शिकत असणा-या सर्व शाखेतील विद्यार्थ्यांसाठी दहा दिवसांचे कॅम्पस प्लेसमेंट तयारीकरीता आवश्यक असणा-सा सॉप्टस्कीलचे प्रशिक्षण नुकतेच झाल्याची माहिती उपप्राचार्य डॉ. स्वानंद कुलकर्णी यांनी दिली. अल्पावधीतच पंढरपूर सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाने कॅम्पस प्लेसमेंट क्षेत्रामध्ये महत्वाचा ठसा उमटवला आहे. या अनुषंगाने २०२६ मध्ये पासआऊट होणा-या विदयार्थी वर्गासाठी चंद्रशेखर आचार्य यांचे ६० तासांचे अत्यंत महत्वाचे सॉप्टस्कीलचे प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये विदयार्थ्यांना ग्रुप डिस्कशन, रिझ्यूम बिल्डींग, म ॉक इंटरव्ह्यू, लिंकडिन प्रोफाईल, इंग्लीश ग्रामर, व्हर्सेंट टेस्ट इ. आवश्यक असणा-या कौशल्याचे सखोल मार्गदर्शन करण्यात आले. पंढरपूर सिंहगड महाविदयालयाचा भर विदयार्थ्यांमध्ये कौशल्य विकसीत करण्यावर असतो. नुकतेच कॉग्नीझंट या बहूराष्ट्रीय सॉप्टवेअर कंपनीने प्रिप्लेसमेंट टॉक अंतिम वर्षात शिकणा-या विदयार्थ्यांसाठी सिंहगड महाविदयालयामध्ये आयोजित करण्यात आले होते. या कंपनीचे कॅम्पस प्लेसमेंट परिक्षा ऑगस्टच्या पहिल्या आठवडयामध्ये आयोजित करण्यात आलेली आहे. यासाठी सॉप्टस्कीलच्या प्रशिक्षणाचा विदयार्थ्यांना बहूमूल्य फायदा होणार आहे. सोलापूर जिल्हयामध्ये अभियांत्रिकीच्या विदयार्थ्यांसाठी कॉग्नीझंट ही कंपनी कॅम्पस प्लेसमेंटसाठी फक्त सिंहगड महाविदयालयातील विदयार्थ्यांसाठीच ऑगस्ट महिन्यात उपलब्ध झालेली आहे. हे प्रशिक्षण यशस्वी होणेसाठी महाविदयालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांनी परिश्रम घेतले.

### बार्शीचे उपविभागीय पोलीस अधिकारी नालकुल यांची बदली

**बार्शी, दि. १ ऑगस्ट-**

बार्शी उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून कार्यरत असलेले जालिंदर नालकुल यांची बदली रायगड जिल्ह्यातील पेण येथे करण्यात आली आहे. ते आता पेण उपविभागीय पोलीस अधिकारी या पदाचा कार्यभार स्वीकारणार आहेत. बार्शी उपविभागासाठी नवीन उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून अशोक सायकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ते लवकरच पदभार स्वीकारुन कार्यरत होणार आहेत.

# कासेगाव येथे लाखो रूपयांचा अवैध खतसाठा जप्त

### जिल्हास्तरीय पथकांकडून धडक कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सोलापूर यांना दि. ३०.०७.२०२५ रोजी मिळालेल्या गोपनीय माहिती नुसार मे महालक्ष्मी फर्टीलायझर्स एल एल पी कासेगाव, ता. पंढरपूर येथे अवैधरित्या खत उत्पादन व विक्री केली जात असल्याबाबत माहिती मिळाली. त्यानुसार जिल्हा परिषद सोलापूर तथा जिल्हास्तरीय भरारी पथकाकडून धाड टाकून केलेल्या कारवाईत लाखोंचा अवैध खतसाठा आढळून आल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी एका पत्रकान्वये दिली.

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली हरिदास हावळे, कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर तथा जिल्हास्तरीय भरारी पथक प्रमुख तसेच पथकातील सदस्य सावंत, कृषी अधिकारी (गुण नियंत्रण) माळशिरस, बोंगे, कृषी अधिकारी (गुण नियंत्रण) मंगळवेढा व सुमित यलमार, कृषी अधिकारी (गुण नियंत्रण) पंढरपूर यांनी दि. ३१. ०७.२०२५ च्या अनुषंगाने रात्री ०९.०० वाजता तपासणी करून स्थळ पंचनामा केला.

त्यावेळी खालीलप्रमाणे त्रुटी व खत नियंत्रण आदेश १९८५ व अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ मधील तरतुदींचे उल्लघंन केल्याचे दिसून आले. यामध्ये खत उत्पादन करण्यासाठी आवश्यक असलेले कच्चा मालाच्या खरेदी करण्याबाबतचे परवाना अधिकारी तथा कृषि संचालक (निविष्ठा व गुनि) कृषि आयुक्त कार्यालय, म. राज्य पुणे यांचेकडील खत आवंटन मंजुरीचे विहित आदेश नसताना तसेच केंद्र शासनाच्या आयएफएमएस प्रणालीवरील आयडीनुसार खत खरेदी न करता अन्य अवैध मार्गाचा अवलंब करून व खत नियंत्रण आदेश तरतुदींचा भंग करून संशयित मिश्र खताचे वितरण व विक्री करणे, इतरत्र उत्पादन केलेला माल दुसऱ्या विक्रेत्याच्या बॅग मध्ये भरून अवैधरित्या भरून विक्री करणे, कोणत्याही प्रकारची खरेदी, विक्री, उत्पादन, वितरण व व्यवस्थापनविषयक अभिलेखाच्या अद्ययावत नोंदी न ठेवणे, उत्पादन करण्यासाठी आवश्यक असलेली स्वतःची यंत्रसामुग्री बंद असताना इतरत्र उत्पादित केलेला माल गोदामात आणून उतराई करताना दिसून येणे व सदर माल परत स्वतःच्या व अन्य विक्रेत्यांच्या परवान्यानुसार केलेल्या बॅगमध्ये भरताना व सिलिंग करताना दिसून येणे आदी विविध त्रुटी आढळून आल्या.





**शेतकरी अन् शासनाची फसवणूक :** अवैधरित्या तयार मालाच्या पुनर्भरण केलेल्या १०:२०:२० या ग्रेडच्या ३०९ गोण्या, १८: १८:१० या ग्रेडच्या १०२ गोण्या, २०:२०:०० या ग्रेडच्या २१६ गोण्या आणि १८:१८:१० या ग्रेडच्या ९२ गोण्या अशा प्रति गोणी ५० किलोग्रॅम वजनाच्या एकूण ७१९ गोण्या व त्यावर दर्शिवलेल्यानुसार एकूण किंमत ११ लक्ष ३३ हजार ८५० रुपयांचा साठा आढळून येणे तसेच, कोणताही मजकूर न छापलेल्या आणि बाहेरून आणून उतराई केलेल्या अंदाजे प्रति गोणी ५० किलोग्रॅम वजनाच्या ७०७ गोण्या आढळून आल्या असून, विक्री बंद आदेश देण्यात आला आहे. अशा रीतीने अवैधरित्या वितरक व विक्रेते यांचे मार्फत विक्री करून शेतकरी व शासनाची फसवणूक केली आहे.

**कंपनीविरोधात पंढरपूर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल**

प्रथमदर्शिनी पाहता खत आदेशाचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आले व अत्यावश्यक वस्तु अधिनियमाचेही उल्लंघन केले असून, संशयित बनावट व बोगस खत शेतकऱ्यास वितरीत करून शेतकऱ्याची व शासनाची फसवणूक करत असल्यामुळे जिल्हास्तरीय भरारी पथकाचे आदेशानुसार सुमित यलमार, कृषी अधिकारी (गुण नियंत्रण) पंढरपूर यांनी मे. महालक्ष्मी फर्टीलायझर्स एलएलपी उ/० विठ्ठल खत कारखाना, सांगोला रोड, विसावा स्टॉप, कासेगाव, ता. पंढरपूर या कंपनीचे साळुंखे व जाधव यांच्या विरुद्ध एफआयआर क्र. ०६११ दि. ०१ ऑगस्ट २०२५ रोजी पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील कायदेशीर कारवाई पोलीस करत आहेत.

**– शुक्राचार्य भोसले, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी**



## बार्शीत रॅपिड ॲक्शन फोर्सचा रुट मार्च

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १ ऑगस्ट-**

आगामी सण-उत्सव व निवडणुका शांततेत व सुरळीत पार पडाव्यात, नागरिकांमध्ये सुरक्षिततेचा विश्वास निर्माण व्हावा आणि संभाव्य सामाजिक अस्थिरता, धार्मिक व जातीय संघर्ष उद्भवल्यास तत्काळ व प्रभावी कारवाई करता यावी, यासाठी रॅपिड क्शन फोर्सच्या बटालियनसह भव्य रुट मार्च शहरातील प्रमुख मार्गांवर काढण्यात आला.

सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर तसेच बार्शी उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल यांच्या मार्गदर्शनाखाली हा रुट मार्च आयोजित करण्यात आला. या रुट मार्चमध्ये रॅपिड क्शन फोर्स, हकीमपेटा, सिकंदराबाद, तेलंगणा येथून आलेल्या सहाय्यक पोलीस अधीक्षक ए. सरस्वती, पोलीस निरीक्षक डी. एस. मस्कर, भगवंत पारीश यांच्यासह ३५ पोलीस अंमलदार तसेच बार्शी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक समीर ढोरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रदीप झालटे, पोलीस उपनिरीक्षक महेश गळगटे, बार्शी शहर पोलीस ठाण्याचे २५ पोलीस अंमलदार आणि सोलापूर ग्रामीण हेडक्कार्टरमधील रॉयल कंट्रोल पोलीस फोर्सचे अंमलदार सहभागी झाले होते.



### वैरागवाडीत शेतीच्या वादातून दोघांना मारहाण

**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

शेतीच्या वादातून मोहोळ तालुक्यातील वैरागवाडी येथे दोघांना मारहाण करून जखमी केले. ही मारहाण गुरुवारी सायंकाळी पाचच्या सुमारास झाली. इंदुमती बाबूराव ढेकळे (वय ४५) व सौदागर बाबूराव ढेकळे (वय २५, दोघे रा. वैरागवाडी ता. मोहोळ) अशी मारहाण झालेल्याची नावे आहेत. गुरुवारी सायंकाळी पाचच्या सुमारास इंदुमती व सौदागर यांची गणेश अर्जुन ढेकळे व इतरांशी शेतीच्या कारणातून तक्रार झाली होती. त्यावरून चिडलेल्या गणेश ढेकळे व इतरांनी काठीने व लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात इंदुमती व सौदागर यांना सर्वांगास मुकामार लागल्याने मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून रात्री ८.३० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## खासदार मोहिते-पाटील यांचे मौसम विभागाला निवेदन

**• पर्यावरण आणि हवामान बदलाच्या परिणामांबाबत चर्चा**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.१ ऑगस्ट -**

माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी नवी दिल्ली येथे भारतीय मौसम विज्ञान विभागाचे महासंचालक मृत्युंजय मोहपात्रा यांची भेट घेऊन मतदारसंघातील पर्यावरण आणि हवामान बदलाच्या तीव्र परिणामांबाबत चर्चा केली. सह्याद्री पर्वतरांगात असणाऱ्या माण, खटाव, कोरेगाव, फलटण, माळशिरस आणि सांगोला या तालुक्यांमध्ये होणाऱ्या हवामान बदलाचा कृषी, मृदा, जलस्रोत आणि जैवविविधतेवर गंभीर परिणाम होत असल्याचे सांगितले.



खासदार मोहिते-पाटील यांनी या समस्येच्या अभ्यासासाठी भारतीय मौसम विज्ञान विभागाकडून जलसंरक्षण,मृदासंवर्धन तसेच वनीकरणासंबंधी विशेष संशोधन अभ्यास करण्याची मागणी केली. यासंदर्भात त्यांनी महासंचालकांना निवेदन सादर केले. या निवेदनात माढा मतदारसंघातील शेतकऱ्यांना हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांचा सामना करण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोनातून उपाययोजना सुचवण्यात यावे म्हणून सांगितले. हवामान बदलामुळे आमच्या भागातील शेती आणि जलस्रोतांवर मोठा परिणाम होत आहे. पावसाचे प्रमाणषजलवायु परिवर्तन बदलले आहे, ज्याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर आणि जैवविविधतेवर होतो. मौसम विभागाच्या तज्ज्ञांच्या सहकार्याने, हवामान बदलाच्या समस्येवर उपाययोजना करू शकतो, असे खासदार मोहिते-पाटील यांनी सांगितले. महासंचालक मृत्युंजय मोहपात्रा यांनी या विषयावर सकारात्मक प्रतिसाद देत हवामान बदलाच्या परिणामांचा अभ्यास करण्यासाठी संशोधन करण्यात येईल असे सांगितले.

## ई- निविदेबाबत आज होणार जबाब नोंदणी

### दर्शनरांगेतील बॅरिकेटिंग कामाची चौकशी; समितीच्या अहवालाची प्रतिक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१ ऑगस्ट -**

दर्शनरांगेतील बॅरिकेटिंग कामाच्या ई- निविदेबाबत संबंधित व्यक्तींचा लेखी जबाब नोंदवित सविस्तर चौकशी करण्यात आली. तथापि, पुरूषोत्तम सग्गम सग्गम यांनी विधीज्ञामार्फत लेखी अर्ज देऊन एक दिवसाची मुदत मागणी केली आहे. त्यानुसार त्यांना मुदतवाढ देऊन, त्यांचा उद्या दि.२ ऑगस्ट रोजी जबाब नोंदविण्यात येणार आहे. तदनंतर लेखी अहवाल तयार करून मुख्य सभेत सादर करण्यात येणार असल्याची माहिती चौकशी समितीच्या अध्यक्षा ॲड.माधवी निगडे यांनी दिली.



दर्शनरांगेतील बॅरिकेटिंग कामाच्या ई-निविदेबाबत सोलापूरच्या पुरुषोत्तम सग्गम यांची आर्थिक फसवणूक प्रकरणी खुलासा व चौकशी करण्यासाठी मंदिर समितीच्या २३ जुलै २०२५ रोजीच्या सभेतील ठराव क्र. ०१ (१) अन्वये मंदिर समितीच्या सदस्या ॲड. माधवी निगडे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. या समितीमध्ये शकुंतलाताई नडगिरे, डॉ.दिनेशकुमार कदम, संभाजी शिंदे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांचा सदस्य पदावर समावेश करण्यात आला होता. या समितीने सदर प्रकरणाबाबत खुलासा व चौकशी करण्यासाठी दि.०१ ऑगस्ट रोजी संबंधितांचे जाब-जबाब घेतले असून, लवकरच लेखी अहवाल मंदिर समितीच्या आगामी मुख्य सभेत सादर करण्यात येणार आहे. यावेळी चौकशी समितीचे सदस्य, प्रभारी व्यवस्थापक तथा लेखा अधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख दादा नलवडे उपस्थित होते.

# फताटेवाडीचे सरपंच राठोड, उपसरपंच जाधव अपात्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ ऑगष्ट -**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील फताटेवाडीचे सरपंच हरिश्चंद्र राठोड, उपसरपंच आर. व्ही. जाधव यांच्यावर विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी अपात्रतेची कारवाई केली आहे. त्यामुळे पुढील सहा वर्षे त्यांना निवडणुक लढविता येणार नसल्याचे निर्णय देण्यात आला आहे.

**चार कोटी अपहार प्रकरणी विभागीय आयुक्तांचा निर्णय**

फताटेवाडी ग्रामपंचायतीमध्ये ४ कोटी ४२ लाख ९१ हजार रूपयाचा अपहार झाल्याप्रकरणी मार्च २०२५ रोजी सरपंच, उपसरपंच यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. हा अपहार झाल्याची तक्रार विनोद चव्हाण या तक्रारदारांनी विभागीय आयुक्त यांच्याकडे केली होती. त्या तक्रारीच्या अनुषगाने झेडपीचे बांधकाम




दोनचे तत्कालीन कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी यांनी १० फेब्रुवारी २०२५ रोजी चौकशी करून अहवाल सादर केला होता. त्या चौकशीअंती फताटेवाडी ग्रामपंचायतीमध्ये संहिता आर्थिक अपहार, अनियमितता लेखा नियमाचे उल्लघंन आदी स्वरूपाने गैरकाम काज झाल्याने सरपंच राठोड, उपसरपंच जाधव हे जबाबदार आहेत. त्यांच्यावरील कार्यवाहीसाठी झेडपी सीईओ विभागीय कार्यालयास पत्र पाठविले होते. त्यानंतर विभागीय आयुक्त यांच्याकडे २२ मे २०२५ ते २२ जुलै पर्यंत जवळपास सहा वेळा सुनावणी होऊन कामकाज पूर्ण झाल्यानंतर अपात्रतेची कारवाई विभागीय आयुक्त यांनी केली आहे. दरम्यान फताटेवाडी सरपंच, उपसरपंच यांचा कालावधी २३ फेब्रुवारी २०२१ ते २२ फेब्रुवारी २०२६ पर्यंत आहे. परंतु आणखी सात महिन्याचा कालावधी पूर्वीच अपात्रतेची कारवाईचा दणका विभागीय आयुक्त यांनी दिला आहे.

**सीईओंच्या अहवालातील हे आहेत २० सारांश मुद्दे**

तांत्रिक मान्यता न घेणे, एकाच कामावर दोन वेळा खर्च करणे, दुबार मूल्यांकन करणे, मूल्यांकनापूर्वी खर्च करणे, रोखीने खर्च करणे, एका कामासाठी दोन यंत्रणा असणे, लेखा संहिता नियम २०११ चे पालन न करणे, वैयक्तिक योजनेसाठी मान्यता न घेणे, १५ वित्त आयोगाचे नियम ५१ चे पालन न करणे, व्यक्ती, संस्था, ठेकेदार यांचे नावे निविदा देयके अदा न करणे, एकाच ठेकेदारांना अनेक कामे देणे, सिमेंट रस्त्याच्या कामात अनियमितता, मोजमाप वही न लिहिणे, काँक्रीटीकरणावर डांबरीकरण करणे, रस्ता, गटार कामाचे तुकडे पाडणे, ग्रामपंचतीच्या हद्दीबाहेर कामे करणे, साहित्य खरेदीमध्ये जीईएमचा वापर न करणे यासह २० मुद्यांची नोंद केली आहे.

विभागीय आयुक्त यांनी फताटेवाडी सरपंच व उपसरपंच यांच्यावर अपात्रतेची कारवाई केली आहे. त्या अनुषगांने कारवाई केली जाणार आहे.

**– सूर्यकांत भुजबळ,**
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
ग्रामपंचायत विभाग

## महत्वाचे...



## लोकमान्य टिळक स्मृतिदिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे अभिवादन

**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा आज स्मृतिदिनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पार्टीच्या वतीने जेष्ठ नेते श्रीनिवास कोंडी, माजी परिवहन सभापती आनंद मुस्तारे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर भाई बागवान माजी नगरसेवक श्रीनिवास कोंडी माजी परिवहन सभापती आनंद मुस्तारे ज्येष्ठ नेते हेमंत काका चौधरी जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले, अल्पसंख्यांक राष्ट्रीय सरचिटणीस फारुक मटके, सेवादल अध्यक्ष प्रकाश जाधव, अल्पसंख्यांक अध्यक्ष अमीर शेख, व्हीजेएनटी अध्यक्ष रुपेश भोसले, सांस्कृतिक विभाग अध्यक्ष आशुतोष नाटकर, ओबीसी सेलचे अध्यक्ष अनिल छत्रबंद, ओबीसी कार्याध्यक्ष आयुब शेख, विधानसभा अध्यक्ष अलमेराज आबाजीराजे, रिक्षा संघटना अध्यक्ष महिपती पवार, दत्तात्रय बनसोडे, युवक उपाध्यक्ष यशराज डोळसे, सुरेखा घाडगे उपस्थित होते



## शहा कोठारी प्रशालेत साहित्यरत्न साठे जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धा

**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

संन्मती ज्ञान प्रसारक मंडळ संचलित श्री. नवलबाई फुलचंद शहा कोठारी प्रशालेत लोकमान्य टिळक पुण्यतिथी व साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. प्रिया उपाध्ये व बसवंत पाटील यांच्या हस्ते प्रतिमापूजन केले. इयत्ता ५ वी ते ७ वी व ८ वी ते १० वी या दोन गटात विद्यार्थी वक्तृत्व स्पर्धेत सहभागी होऊन साठे व टिळकांचे कार्य व प्रमुख पाहुणे श्री. पाटील यांनी टिळकांचे विचार आपल्या मनोगतातून सांगितले. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रशालेतील एस.पी. माणिकशेटे, वाय. के. भांदुर्गे, एम.बी. जमादार, टी. एम. पवार यांनी काम पाहिले. सौ. उपाध्ये यांनी साठे यांचे कार्य आपल्या मनोगतातून सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ए. एस. माने यांनी तर साबा ओ.पी. यांनी आभार मानले.

## मोटारसायकल आणून द्या म्हणाल्याने दोघांना मारहाण

**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

तुम्ही आमची मोटारसायकल नेली होती, ती आणून द्या असे म्हणाल्याने मोहोळ तालुक्यातील पोखरापूर येथे दोघांना मारहाण करून जखमी केले. ही मारहाण गुरुवारी रात्री आठच्या सुमारास झाली. अभिजित लालचंद्र शिंदे (वय १७) व लालचंद्र व्यंकट शिंदे (वय ४५, रा. पोखरापूर ता मोहोळ) अशी मारहाण झालेल्यांची नावे आहेत. गुरुवारी रात्री आठच्या सुमारास यातील अभिजित व लालचंद्र या दोघांनी निशांत शिंदे, सोनाली शिंदे व इतर एक यांना आमची मोटारसायकल घेऊन गेला होता, ती आणून द्या असे म्हणाले. त्यावर चिडलेल्या निशांतसह इतर दोघांनी अभिजित व लालचंद्र यांना कोयत्याने तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात डोक्याला आणि सर्वांगास मुकामार लागल्याने मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून नातेवाईकांनी शुक्रवारी रात्री १२.३० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



# ६५ उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

राज्यातील ६५ सहायक पोलीस आयुक्त, उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या बदल्यांचे आदेश महाराष्ट्र शासनाचे सहसचिव वेंकटेश भट यांनी दिले आहेत.

सोलापूर ग्रामीण पोलीस दलातील पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय) विजयालक्ष्मी कुर्री यांची पुणे शहरात सहायक पोलीस आयुक्त म्हणून, बार्शीचे उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल यांची रायगड जिल्ह्यातील पेण चे उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून, पंढरपूरचे उपविभागीय पोलिस अधिकारी अर्जुन भोसले यांची पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागात अपर पोलीस अधीक्षक म्हणून, मंगळवेढ्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रांत गायकवाड यांची इचलकरंजी उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून, सोलापूर पोलीस प्रशिक्षण केंद्रातील पोलीस उपाधीक्षक अशोक साईकर यांची ग्रामीण पोलीस दलातील बार्शी विभागीय पोलिस अधिकारी म्हणून बदली झाली आहे. तर महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनीच्या पोलीस उपअधीक्षक आरती बनसोडे या सोलापूर पोलीस प्रशिक्षण केंद्र पोलीस उपअधीक्षक म्हणून येत आहेत.

**सोलापूर ग्रामीण पोलिस दलातील १५ अधिकाऱ्यांच्या अंतर्गत बदल्या**

सोलापूर ग्रामीण जिल्हा पोलिस दलातील १५ अधिकाऱ्यांच्या जिल्हाअंतर्गत बदल्या करण्याचे आदेश पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी दिले आहेत. तसेच ३२ पोलिस कर्मचाऱ्यांच्या विनंती बदल्यादेखील करण्यात आल्या आहेत.सोलापूर ग्रामीण जिल्हास्तरीय पोलिस आस्थापना मंडळाची बैठक गुरुवारी पोलिस अधिक्षक यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. त्यामध्ये पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी यांच्या बदल्या करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. तसेच कौटुंबिक अडचण असल्याने विनंती बदलीसाठी अर्ज केलेल्या ३२ कर्मचाऱ्यांचे विनंतीवरून बदली करण्याचा निर्णय आस्थापना मंडळाने घेतला.

**बदली झालेले अधिकारी पुढीलप्रमाणे (कंसात कोठून ते कोठे)**

सपोनि मनोज श्रीधर अभंग (सोलापूर तालुका ते करमाळा), भारत वाघे (पंढरपूर शहर ते सांगोला), सुधीर टेंगले (नियंत्रण कक्ष ते अकलुज), भिमगोंडा पाटील (नियंत्रण कक्ष ते स्थानिक गुन्हे शाखा), पोउपनि धनाजी ओमासे (नातेपुते ते सुरक्षा शाखा), महमंदशरीफ शेख (जिल्हा वाहतूक ते माढा), राजेश जाधव (नियंत्रण कक्ष ते सोलापूर तालुका), सागर पाटील (वळसंग ते सांगोला), प्रशांत मदने (करमाळा ते टेंभुर्णी), आकाश शेळके (वेळापूर ते मोहोळ), रेवणसिध्द काळे (अनै.मा.वा.प्र.कक्ष ते मोहोळ), रमेश ओहाळ (मोहोळ ते जिल्हा वाहतूक), अमितकुमार करपे (अक्कलकोट उत्तर ते सायबर), विशाल कदम (नियंत्रण कक्ष ते अकलुज), स्नेहलता सुपे (नियंत्रण कक्ष ते सोलापूर तालुका), नवनाथर पाटील (नियंत्रण कक्ष ते मोहोळ).

## बोरामणी येथे रॅपिड ॲक्शन फोर्सचा रूट मार्च

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

आगामी सण-उत्सव व निवडणुका शांततेत व सुरळीत पार पडाव्यात, नागरिकांमध्ये सुरक्षिततेचा विश्वास निर्माण व्हावा आणि संभाव्य सामाजिक अस्थिरता, धार्मिक व जातीय संघर्ष उद्भवल्यास तत्काळ व प्रभावी कारवाई करता यावी, यासाठी रॅपिड ॲक्शन फोर्सच्या बटालियनसह सोलापूर तालुका पोलिसांच्यावतीने बोरामणी येथे रुट मार्च काढण्यात आला.

सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर तसेच बार्शी उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल यांच्या मार्गदर्शनाखाली हा रुट मार्च आयोजित करण्यात आला.

या रुट मार्चमध्ये रॅपिड ॲक्शन फोर्स, हकीमपेठ, सिकंदराबाद, तेलंगणा येथून आलेल्या सहाय्यक पोलीस अधीक्षक ए. सरस्वती, सोलापूर तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी राहुल देशपांडे, सहायक पोलिस निरीक्षक सोम नाथ कदम, सहायक पोलीस निरीक्षक सुधीर टेकाळे, पोलीस उपनिरीक्षक फैयाज बागवान, पोलीस हवालदार क्षीरसागर, यादव व पोलीस मुख्यालय, सोलापूर ग्रामीण येथील स्ट्रायिंग फोर्स मधील अंमलदार यांनी सहभाग घेतला.



## 'मेहता' मध्ये लो. टिळक, अण्णाभाऊ साठे यांना आदरांजली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

जुळे सोलापूर येथील के.वि.म न्या.मेहता प्राथमिक शाळेत लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती साजरी करण्यात आली. मोनेश्वर विद्यालयाचे सहशिक्षिका महादेव कागदे व मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांच्या हस्ते टिळक व साठे यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.

मयुरी दुरगकर यांनी प्रमुख अतिथीचा परिचय करून दिला. विद्यार्थ्यांनी टिळक व साठे यांच्या जीवनातील प्रसंग गोष्टीद्वारे सांगितले.

शिक्षकांतर्फे संतोषी बिरादार यांनी मनोगत व्यक्त केले. अथर्व माने याने टिळकांची व पृथ्वी शिंदे याने साठे यांची वेशभूषा अतिशय हुबेहुब साकारली. सूत्रसंचालन सुजाता यादव यांनी केले. भारती शिंदे यांनी आभार मानले.

## ठोकळ प्रशालेत वारी तारांगण उपक्रम



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला व कनिष्ठ म हाविद्यालय सोलापूर व पोलाद स्टील डिजिटल व्हॅन यांच्या माध्यमातून आयोजित वारी तारांगण आणि चंद्रयान-३ या उपक्रमात दीड हजार विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या, विद्यार्थ्यांना चिकित्सक वृत्ती जागृत करण्यासाठी, विज्ञान विषयातील जिज्ञासा वाढवण्यासाठी, सूक्ष्म निरीक्षण करण्याच्या हेतूने, आणि विश्व म्हणजे काय आणि विश्वातील असणारे ग्रह तारे यांची माहिती व्हावी यासाठी या उपक्रमाचे श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय आणि पोलाद स्टील डिजिटल व्हॅन यांच्यामार्फत आयोजन केले होते. उपक्रम यशस्वी होण्यासाठी पूनम चव्हाण, गायकवाड व्ही.एस., युसूफ शेख आदींनी परिश्रम घेतले. या उपक्रमाबद्दल संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा श्रीमती निर्मलाताई ठोकळ, संस्थेचे अध्यक्ष विपिन ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ, सचिव भिकाजी गाजरे, संचालिका शिल्पा ठोकळ यांच्यासह कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य गाजरे डी. डी. यांनी अभिनंदन केले.

## बेशुध्द अवस्थेत आढळलेल्या महिलेचा मृत्यू

**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

रेल्वे स्टेशनपासून काही अंतरावर असलेल्या अमेय अपार्टमेंटच्या दुस-या मजल्यावरील घरात बेशुध्द अवस्थेत आढळून आलेल्या महिलेचा उपचारापूर्वी मृत्यू झाला. हा प्रकार शुक्रवारी सकाळी दहाच्या सुमारास उघडकीस आला. विजया शंकराव पालव (वय ७०, रा. अमेय अपार्टमेंट) असे मृत पावलेल्या महिलेचे नाव आहे. अमेय अपार्टमेंट या इमारतीच्या दुस-या मजल्यावरील फ्लॅट नंबर ९ मध्ये विजया या सकाळी दहाच्या सुमारास बेशुध्द अवस्थेत आढळून आल्या. त्यांना हवालदार लांबतुरे यांनी सकाळी ११.१० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच त्या मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## सराईत गुन्हेगार डीके येरवड्यात स्थानबध्द; चालू वर्षातील आयुक्तांची १५वी कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

सोलापूर शहर परिसरातील सराईत गुन्हेगार डीके बंडगर यास पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी एम पीडीएअंतर्गत येरवडा कारागृहात स्थानबध्द करण्याचे आदेश दिले. चालू वर्षात पोलिस आयुक्तांची ही १५ वी कारवाई आहे.



सिध्दनाथ उर्फ डेक्या उर्फ ढेप्या उर्फ डीके गंगाधर बंडगर (वय २१, रा. मड्डी वस्ती, भवानी पेठ, सोलापूर) असे येरवडा कारागृहात स्थानबध्द करण्यात आलेल्या सराईत गुन्हेगाराचेनाव आहे. सिध्दनाथबंडगरयाच्याविरुध्द मागील काही वर्षापासून सातत्याने चाकू, गुप्ती, लोखंडी रॉड, काठ्या यासारख्या घातक शस्त्राने दुखापत करणे, घरफोडी करणे, मोटारसायकल चोरी करणे, जबरी चोरी करणे, बेकायदेशीर जमाव जमवणे, दगडफेक करणे यासारखे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. बंडगर याच्याविरुध्द एकूण १० गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांची नोंद विविध पोलिस ठाण्यात करण्यात आली असून त्याच्या गुन्हेगारी कारवायांमुळे सामान्य नागरीकांमध्ये दहशत आहे. त्यामुळे डीकेविरूध्द सन २०२३ व २०२५ मध्ये प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. तरी-ही डीकेच्या वर्तनात कोणताच बदल झाला नाही. त्यामुळे डीकेच्या गुन्हेगारी कारवायांवर आळा घालण्यासाठी जोडभावी पेठ पोलिसांकडून एमपीडीएअंतर्गत कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव पोलिस आयुक्तांकडे पाठविण्यात आला होता. त्यास पोलिस आयुक्तांनी मंजुरी देत डीके यास येरवडा कारागृहात स्थानबध्द करण्याचे आदेश दिले. त्यानुसार जोडभावी पेठ पोलिसांचे एक पथक डीके यास घेऊन येरवडा कारागृहाकडे रवाना झाले आहे.

ही कारवाई पोलिस उपायुक्त डॉ. अश्विनी पाटील, विजय कबाडे, सहायक आयुक्त राजन माने, प्रताप पोमण, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे, सुरज मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक तुकाराम घाडगे, हवालदार विनायक संगमवार, सुदीप शिंदे, अक्षय जाधव, विशाल नवले यांनी केली.



## कार्यसिद्धीसाठी मानसिक स्थिती चांगली असणे गरजेचे : जिल्हा न्यायाधीश मनोज शर्मा

**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

न्यायालयीन कामकाज करत असताना ताण-तणाव असतो, सध्याच्या धावपळीमध्ये आपली मानसिकस्थिती तसेच आरोग्य चांगले असणे अत्यंत गरजेचे आहे, जर आपले आरोग्य चांगले असेल तर आपण आपले कार्य हे व्यवस्थितपणे पार पाडू शकतो. त्याकरीता वेळोवेळी आरोग्य तपासणी करणे खूप गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्रमुख जिल्हा न्यायाधीश मनोज शर्मा यांनी केले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, धर्मादाय उपआयुक्त कार्यालय, सोलापूर वकिल संघ आणि कुंभारी येथील अश्विनी ग्रामीण मेडिकल कॉलेज हॉस्पीटल ॲण्ड रिसर्च सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण येथे आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी न्यायाधीश शर्मा बोलत होते. या शिबीराचे उद्घाटन प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष मनोज शर्मा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा न्यायाधीश आर. जे. कटारिया, उपधर्मादाय आयुक्त ईश्वर सुर्यवंशी, सोलापूर वकिल संघाचे अध्यक्ष बाबासाहेब जाधव, स्त्रीरोग तज्ञ डॉ. वृंदा चौधरी आदी उपस्थित होते. सदर आरोग्य तपासणी शिबीरामध्ये जिल्हा न्यायालयातील न्यायिक अधिकारी, न्यायालयीन कर्मचारी, विधीज्ञ यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. हे आरोग्य तपासणी शिबीर यशस्वी करण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सर्व कर्मचारी, विधीज्ञ संघ यांनी सहकार्य केले.

# मंगळसूत्र चोरणाऱ्या ईराण्यास अटक

### शहर गुन्हे शाखेची कारवाई; पाच तोळ्याचे मंगळसूत्र जप्त



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

शहरातील रेल्वे स्टेशन येथील महात्मा गांधी पुतळ्याजवळ थांबलेल्या वृध्द महिलेच्या गळ्यातील ५ तोळ्याचे मंगळसूत्र धुम स्टाईलने जबरदस्तीने चोरून नेणाऱ्या ईराण्यास शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक करून त्याच्याकडून ५ तोळ्याचे मंगळसूत्र जप्त केले. अटक केलेल्या ईराण्याची टोळी असून या टोळीतील ३ जण अद्यापही फरार आहेत. या टोळीने महाराष्ट्र व उत्तर प्रदेशात चैन स्नॅचिंगचे गुन्हे केल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे.

अलिराजा उर्फ अलिरजाक उर्फ लल्ला शेखू बेग (ईराणी) (वय ३१, रा. शिवाजी नगर, टी पी एस रोड, परळी, जि. बीड) असे अटक करण्यात आलेल्या गुन्हेगाराचे नाव आहे. याबाबत मीरा एस शिवाजी उबाळे (वय ६३, रा. फस्ट मेन थर्ड कॉर्स, बसवलिंगाप्पा नगर, विद्यारण्यापुरा, बेंगलोर, कर्नाटक) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मीरा उबाळे या कुटुंबासह तुळजापूर येथे देवदर्शनासाठी आल्या होत्या. देवदर्शन आटोपून २७ जुलै रोजी दुपारी बेंगलोरकडे परत जाण्यासाठी त्या सोलापूर रेल्वे स्टेशनजवळील महात्मा गांधी पुतळ्याजवळ आल्या असता दुचाकीवरून आलेल्या दोन चोरट्यांनी उबाळे यांच्या गळ्यातील ५ तोळ्याचे मंगळसूत्र जबरदस्तीने हिसका मारून चोरून नेले होते. गुन्हा दाखल झाल्यानंतर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी घटनास्थळ तसेच आजूबाजूच्या परिसरातील मार्गावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या चित्रीकरणाची पाहणी करून तांत्रिक माहिती मिळविली. हा गुन्हा पोलिसांच्या रेकॉर्डवरील चैन स्नॅचर अलिराजा बेग याने केला असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले. अलिराजा याचा म ाग काढताना तो लातूर शहरातील सम्राट चौकातील महाराष्ट्र टायर्स या दुकानात येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यावरुन पोलिसांनी लातूर येथे जाऊन दुकानात सापळा लावून अलिराजा बेग यास ताब्यात घेतले. त्याच्याकडे करण्यात आलेल्या चौकशीदरम्यान त्याने साथीदारांच्या मदतीने हा गुन्हा केल्याचे सांगितले. पोलिसांनी त्याच्याकडून ५ तोळ्याचे मंगळसूत्र हस्तगत केले असून इतर आरोपींचा पोलिस शोध घेत आहेत.

ही कारवाई पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त डॉ. अश्विनी पाटील, सहायक आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक शैलेश खेडकर, पोलिस हवालदार संदीप जावळे, विनोद रजपूत, राजकुमार पवार, इम्रान जमादार, उमेश पवार, सिध्दाराम देशमुख, अजय गुंड, सतीश काटे, बाळासाहेब काटे, सायबर पोलिस ठाण्याकडील प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड यांनी केली.

## पाणी भरताना बसला विजेचा धक्का

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ ऑगस्ट -**

पाण्याच्या पाईपलाईनला विद्युत मोटार लावताना महिलेला विजेचा धक्का बसला. ही घटना वळसंग येथे शुक्रवार एक ऑगस्ट रोजी पहाटे चारच्या सुमारास घडली.

तब्बसुम सैफन पटेल (वय ४०, रा. वळसंग ता द सोलापूर) असे विजेचा धक्का बसलेल्या महिलेचे नाव आहे. शुक्रवारी पहाटेच्या सुमारास सार्वजनिक नळाला पिण्याचे पाणी सोडण्यात आले होते. ते भरण्यासाठी पाईपला विद्युत मोटार लावत असताना तब्बसुम यांना विजेचा धक्का बसला. वळसंग येथील सरकारी दवाखाना येथे उपचार करून दुपारी ३.१५ च्या सुमारास पती सैफन याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## ब्यागेहळ्ळीत तरुणाचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर :** अज्ञात कारणाने तरुणाने पिकावर फवारणीचे औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील ब्यागेहळ्ळी येथे शुक्रवारी मध्यरात्री २.३० च्या सुमारास घडली. प्रेम मल्लू जाधव (वय १९) असे तरुणाचे नाव आहे. शुक्रवारी मध्यरात्रीच्या सुमारास प्रेम याने अज्ञात कारणातून पिकावर फवारणीचे औषध प्राशन केले. यात त्याला त्रास होऊ लागल्याने सकाळी सातच्या सुमारास चुलता दिपक जाधव याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## निधन वार्ता...

### सुभाष सुरवसे

**अक्कलकोट, दि. १ ऑगस्ट**



तालुक्यातील बोरगाव दे. येथील सुभाष कृष्णाराव सुरवसे (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने उपचारादरम्यान निधन झाले. बोरगाव आणि परिसरात वारकरी संप्रदाय आणि भजन कीर्तनाची संस्कृती जपण्यात त्यांनी आयुष्यभर पुढाकार घेतला. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. बोरगावचे माजी सरपंच विलास सुरवसे यांचे ते बंधू होत.

### अविधाबाई फुरडे

**बार्शी, दि. १ ऑगस्ट-**



कांदलगाव ग्रामपंचायतचे सदस्य कैलास शाहू फुरडे यांच्या मातोश्री अविधाबाई (अविधा आक्का) शाहू फुरडे (वय ७६) यांचे अल्पशा आजाराने गुरुवारी रात्री निधन झाले आहे. नवले वस्ती कांदलगाव येथे त्यांच्या शेतात सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# श्रेयश नर्सिंग होम तात्पुरत्या स्वरूपात सील

### पालिका आरोग्य अधिकारी डॉ. माने यांनी केली कारवाई

### महापालिका प्रसुतीगृहातील रुग्ण पळविण्याचे रॅकेट प्रकरण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

महापालिकेच्या आशा वर्कर्सना पैशाचे आमिष दाखवून महापालिकेच्या प्रसूतीगृहातील रुग्ण खाजगी रुग्णालयात पळविले तसेच बॉम्बे नर्सिंग होम अॅक्ट खाली आढळलेल्या विविध त्रुटीमुळे अखेर नवी पेठेतील श्रेयस नर्सिंग होम तात्पुरत्या स्वरूपात सील करण्यात आले आहे. महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी पथकासह ही कारवाई केली.

सोलापूर महापालिकेच्या प्रसूतिगृहांमध्ये तपासणीसाठी येणाऱ्या महिलांना प्रसूतीसाठी खासगी रुग्णालयात वळविण्याचा प्रकार आशा वर्कर्स कडून होत असल्याचे उघडकीस आला आहे. पैशाचे आमिष दाखवून आशा वर्कर्सकडून हे काम करून घेतले जात होते. याप्रकरणी नवी पेठेतील श्रेयश नर्सिंग होमचे डॉ. सुमित सुरवसे आणि डॉ. श्रद्धा सुरवसे यांना रुग्णालयाचा परवाना(लायसन) रद्द करण्याची नोटीस बजावण्यात आली होती. चार दिवसात



त्याचा खुलासा देण्याची सूचना केली होती.

दरम्यान, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार आणि उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी ही सील करण्याची कारवाई केली. या कारवाई संदर्भात अधिक माहिती देताना आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने म्हणाल्या, महापालिकेच्या आशा वर्कर्सना आमिष दाखवून महापालिका प्रसूतीगृहातील रुग्ण श्रेयश नर्सिंग होम मध्ये आणले जात होते. या दवाखान्यातील रजिस्टर तपासण्यात आले. यासंदर्भात कायदे तज्ज्ञाचा सल्लाही घेण्यात आला. दरम्यान, या रुग्णालयात अनैतिक प्रॅक्टिस होत होती. पैशाचे आमिष दाखवून रुग्ण वळवण्यात आले. त्यास अनेक आशा वर्करनी मदत केली. याप्रकरणी श्रेयश नर्सिंग होमचे डॉ. सुमित सुरवसे यांना नोटीस देण्यात आली होती. या नोटिसीला उत्तर देण्यासाठी डॉक्टर सुरवसे यांनी वाढीव कालावधी मागितला मात्र ही बाब गंभीर आहे. महाराष्ट्र शासनाने या प्रकरणी चौकशीचे आदेश दिले आहेत. त्या अंतर्गत डॉ. सुरवसे यांना फोन करून सकाळी बोलावण्यात आले होते. दरम्यान, संध्याकाळी ही त्यांच्या हॉस्पिटलमध्ये ते उपस्थित नव्हते. एकंदरीत या डॉक्टरांना या प्रकरणाचे गांभीर्य दिसून येत नाही. त्यामुळे महापालिकेचे आरोग्य पथक आज सायंकाळी श्रेयश नर्सिंग होममध्ये दाखल झाले. त्यावेळीही डॉक्टर सुरवसे यांना येण्याचे आवाहन करण्यात आले मात्र त्यांनी प्रतिसाद दिला नाही. ते आले नाहीत. श्रेयश नर्सिंग होम मध्ये बॉम्बे नर्सिंग ॲक्ट तसेच पीसीपीएनडीटी ॲक्टचे उल्लंघन झाल्याचे दिसून आले. अनेक त्रुटी आढळून आल्या आहेत. यामुळे श्रेयश नर्सिंग होम तात्पुरत्या स्वरूपात सील करण्यात आले आहे. संबंधित डॉक्टरांनी प्रतिसाद न दिल्यास कायमस्वरूपी हे हॉस्पिटल सील करण्यात येणार असल्याचे आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी स्पष्ट केले.

### भविष्यात अशा गंभीर घटना घडू नयेत म्हणून कारवाई : डॉ. माने

महापालिकेतील आशा वर्कर्सना आमिष देऊन अशाप्रकारे खाजगी रुग्णालयात प्रस्तुतीसाठीचे रुग्ण वळविण्यात आले. यामुळे महापालिकेतील प्रसूतीगृहात मिळणाऱ्या शासकीय योजनांचा लाभ संबंधित महिला रुग्णांना मिळू शकला नाही. त्यांचे आर्थिक नुकसान झाले. खाजगी रुग्णालयात या योजना उपलब्ध नसतात. अशा गंभीर घटना भविष्यात घडू नयेत. यामुळे ही कारवाई करण्यात आली आहे, असे आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी सांगितले.

### या गंभीर प्रकाराकडे दुर्लक्ष का झाले? डॉक्टरांना बजावल्या नोटीसा

महापालिका प्रसूतीगृहातील रुग्ण खाजगी रुग्णालयात पळविण्याचे गंभीर प्रकरण घडत असताना याकडे दुर्लक्ष का झाले? या संदर्भात महापालिकेतील प्रसूतीगृहातील सर्व वैद्यकीय अधिकारी, प्रसुतीतज्ञ असे सुमारे ७० डॉक्टर्स आणि नर्सेसना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. तसेच याप्रकरणी ४९ आशा वर्कर्सना २४ तासात खुलासा करण्याची नोटीस दिली आहे. यापुढेही महापालिका दवाखान्यातून रुग्ण इतरत्र पाठविल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येणार आहे, असे आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी स्पष्ट केले.

### त्या गरोदर माता प्रसूती योजनांपासून वंचित : डॉ. कोरे

पैशाच्या अमिषातून आशा वर्कर कडून चुकीच्या गोष्टी घडल्या आहेत. यामुळे महापालिका प्रसुतीगृहात गरोदर मातांना शासकीय प्रसूती योजनांचे फायदे मिळतात. खाजगी रुग्णालयात शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही. त्यामुळे त्या गरोदर मातांना या योजनांपासून वंचित राहावे लागले, असे डॉ. ज्योत्स्ना कोरे यांनी सांगितले.

# भीमा नदीसह उजनी धरणातील जलप्रदूषण रोखा



### खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांची केंद्रीय प्रदूषण मंडळ अध्यक्षांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १ ऑगस्ट -**

भीमा नदीतील वाढत्या जलप्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचे चेअरमन वीर विक्रम यादव यांची नवी दिल्ली येथे भेट घेत निवेदन दिले. या बैठकीदरम्यान त्यांनी नदीप्रदूषणामुळे निर्माण झालेल्या पर्यावरणीय आणि जनस्वास्थ्याशी संबंधित गंभीर समस्यांवर सविस्तर चर्चा केली. याशिवाय, उजनी धरण व सोलापूर परिसरात दूषित जल वापरामुळे उद्भवणाऱ्या आरोग्याच्या समस्या, तसेच त्यावर तात्काळ प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याची मागणी केली. खासदार मोहिते पाटील यांनी सादर केलेल्या निवेदनात, भीमा नदीत घरगुती व औद्योगिक सांडपाण्याचा थेट विसर्ग होत असल्याने मानव आरोग्य, शेती, पशुधन आणि पर्यावरणावर होणाऱ्या गंभीर दुष्परिणामांबाबत लक्ष वेधले. त्यांनी पुणे, पिंपरी-चिंचवड, चाकण आणि सोलापूर येथील सांडपाणी शुद्धीकरण केंद्रे (डढझ) पूर्ण क्षमतेने कार्यक्षम आहेत की नाही, यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. तसेच, औद्योगिक प्रदुषित जल तपासणीची कार्यप्रणाली, जलप्रदूषण करणाऱ्या उद्योगांवर कारवाई करावी याचबरोबर सुरक्षेच्या दृष्टीकोनातून नदीच्या जलगुणवत्तेच्या अहवाल सार्वजनिक उपलब्ध करावा यासंदर्भात उझउइ कडून स्पष्ट व सविस्तर माहितीची मागणी केली. या चर्चेच्या पार्श्वभूमीवर चेअरमन वीर विक्रम यादव यांनी या समस्येची गंभीर दखल घेतली असून, येत्या जानेवारी २०२६ मध्ये भीमा नदी व उजनी धरणातील जल प्रदूषणाबाबत केंद्रीय प्रदूषण मंडळाचे तज्ञांकडून पाहणी चाचणी करून समस्येच्या निराकरणासाठी ठोस पावले उचलली जातील असे सांगितले.






# श्री विठ्ठल कारखान्यावर वृक्षारोपणासह १५५ जणांचे रक्तदान

### आ. अभिजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१ ऑगस्ट -**

श्री विठ्ठल सह. साखर कारखान्याचे चेअरमन आमदार अभिजीत (आबा) पाटील यांचे ४२ व्या वाढदिवसानिमित्त कारखाना कार्यस्थळावर वृक्षारोपणासह १५५ जणांनी रक्तदान केले. रक्तदान शिबीराचे उद्धाटन बालरोग तज्ञ डॉ. श्रीकांत देवकते यांच्या हस्ते झाले. वन परिक्षेत्र अधिकारी शितल चाटे, तालुका कृषी अधिकारी सुर्यकांत मोरे व सहाय्यक कृषी अधिकारी सागर भोसले, कारखान्याचे संचालक यांचे हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

कारखान्याचे संचालक तुकाराम मस्के यांनी कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्तविक केले. सदर प्रसंगी पंढरपूरचे बालरोग तज्ञ, डॉ. श्रीकांत देवकते म्हणाले की, संकटे आली तेंव्हाच अवतार घेतला जातो. श्री विठ्ठल कारखाना संकटात असताना आमदार अभिजीत (आबा) पाटील यांनी कारखाना वाचवून शेतकरी सभासद व कर्मचाऱ्यांना जीवदान दिले व थोड्याच कालावधीमध्ये सर्वांना आपलेसे करून अपार कष्ट घेवून माढा विधानसभा मतदार संघाचे आमदार होऊन विधानसभा गाजवित आहेत. संकटाला तोंड देवून अडचणीतून मार्ग काढणेची फार मोठी क्षमता आमदार पाटील यांचेमध्ये आहे, आभार प्रदर्शन करताना कारखान्याचे जनरल मॅनेजर डी.आर.गायकवाड म्हणाले की, सत्कार समितीचे वतीने कारखान्याचे चेअरमन, आमदार अभिजीत (आबा) पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजपयोगी कार्यक्रम साजरे केले जातात. रक्तदान ही एक सेवा असून, त्यामुळे जास्तीत जास्त लोकांचे प्राण वाचतात यासाठी कर्मचारी यांनी रक्तदान करावे, असे आवाहन करुन उपस्थित सर्वांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कारखान्याचे लिगल ऑफिसर ओमकार अवधुत यांनी केले. सदर कार्यक्रमास अक्षय ब्लड बँकेचे जनसंपर्क अधिकारी अजय रुपनर व पंढरपूर ब्लड बँकेचे जनसंवर्क अधिकारी शुभम घोंगे, कारखान्याचे संचालक सुरेश भुसे, सचिन वाघाटे, प्रविण कोळेकर, सिध्देश्वर बंडगर, दशरथ जाधव, अशोक तोंडले, विठ्ठल रणदिवे, महेश खटके, दिपक सदाबसे व कारखान्याचे कार्यकारी संचालक आर.बी.पाटील, सर्व अधिकारी, कर्मचारी, कार्यकर्ते, सभासद, ठेकेदार उपस्थित होते.

## क्रीडा

### महत्त्वाचे...

#### धावण्याच्या राष्ट्रीय स्पर्धेत साईश्वर व श्रद्धा गुंटूक यांना रौप्य

**सोलापूर, दि. १ ऑगस्ट**

स्पोर्ट्स अथोरिटी ऑफ तेलंगाणा, हैदराबाद डिस्ट्रिक्ट ॲथलेटिक असोसिएशन व उस्मानिया युनिव्हर्सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या स्पर्धेत येथील साईश्वर व श्रद्धा गुंटूक भाऊ- बहिणींनी यांनी रौप्य पदक पटकाविले ही स्पर्धा अवेअरनेस ऑन स्पोर्ट्स वर आधारित या इंटरनॅशनल स्पर्धेत साईश्वर व श्रद्धाने खुल्या पुरुष गटात ५ किलोमीटरमध्ये तर खुल्या महिला गटात श्रद्धाने ही कामगिरी केली. ही स्पर्धा हैदराबाद येथील उस्मानिया युनिव्हर्सिटी येथील सिंथेटीक ट्रॅकवर झाली.या स्पर्धेत १८९० स्पर्धक सहभागी होते. त्यांचे सोलापूर अथलॅटिक असोसिएशनचे अध्यक्ष सुरेश पवार यांनी अभिनंदन केले. साईश्वर व श्रद्धा यांना सिनियर ऑलिम्पियन केशवराज सिंह व क्रीडा प्रशिक्षक कृष्णा कोळी यांचे मार्गदर्शिन लाभले. त्यांचे स्वामी विवेकानंद प्रशालेचे प्राचार्य अंबादास पांढरे, प्राचार्य चिदानंद माळी यांनी अभिनंदन केले.



#### जिल्हा क्रिकेट निवड चाचणी ६ व ७ ऑगस्टला

**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

जिल्ह्याचे १४ वर्षांखालील संघ निवडण्यासाठी ६ व ७ ऑगस्ट रोजी इंदिरा गांधी स्टेडियम येथे सकाळी ९ ते १ व दुपारी २ ते ५-३० वाजेपर्यंत निवड चाचणी होणार आहे. निवड चाचणी अगोदर सर्व खेळाडूंनी आपले खेळाडू रजिस्टर कार्ड आणि चाचणी शुल्काची पावती येताना घेऊन येणे, असे जिल्हा क्रिकेट संघटनचे संयुक्त सचिव चंद्रकांत रेम्बर्सु यांनी कळविले आहे. या चाचणीसाठी १ सप्टेंबर २०११ नंतर जन्मलेले खेळाडू पात्र आहेत. ही चाचणी निवड चाचणी चेअरमन राजेंद्र गोटे, सत्यजित जाधव, विक्रांत पवार, डॉ. महेश ढेंबरे व राजू रंगाम करणार आहेत.

# अजित भारद्धाज, तुलसी सिद्धाराजू यांना दुहेरी मुकुट

### आयटीएफ एमटी ४०० वर्ल्ड मास्टर्स टेनिस अजिंक्यपद स्पर्धा

### भूषण चंद्र, वेंकटचलम स्वामीनाथन, श्रीकांत पारेख यांना विजेतेपद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ ऑगस्ट -**

सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटना यांच्या वतीने आयोजित व आयटीफ, एआयटीए, एमएसएलटीए यांच्या मान्यतेखाली झालेल्या एमएसएलटीए एसडीएलटीए आयटीएफ एमटी ४०० वर्ल्ड मास्टर्स टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत अजित भारद्वाज, तुलसी सिद्धाराजू यांनी एकेरी व दुहेरी या गटात विजेतेपद पटकावत दुहेरी मुकुट संपादन केला.

भूषण चंद्र, वेंकटचलम स्वामीनाथन, श्रीकांत पारेख यांनी विजेतेपद पटकावले. एमएसएलटीए टेनिस सेंटर आणि इलीसीएम




क्लब जामश्री कॉम्प्लेक्स सिद्धेश्वर पेठ येथ झालेल्या या स्पर्धेत ६० वर्षांवरील पुरुष एकेरीत अंतिम फेरीत अव्वल मानांकित भूषण चंद्र याने सहाव्या मानांकित दीपंकर चक्रवर्तीचा ६-२, ६-२ असा पराभव केला.

६५ वर्षांवरील पुरुष एकेरीत अंतिम फेरीत अव्वल मानांकित अजित भारद्वाजने प्रमोद दिक्षितचा टायब्रेकमध्ये ७-६(३), ७-६(३) असा पराभव करून विजेतेपदाचा पटकाविले. याच गटात दुहेरीत अंतिम सामन्यात अव्वल मानांकित अजित भारद्वाज व राकेश कोहली या जोडीने दुसऱ्या मानांकित ओपी दिक्षित व प्रमोद दिक्षित यांचा ६-३, १-६, १०-६ असा पराभव केला.

७० वर्षांवरील पुरुष एकेरीत अंतिम फेरीत दुसऱ्या मानांकित तुलसी सिद्धाराजू याने अव्वल मानांकित जॉर्ज थॉमस पुथुपारंबिलचा ६-४, ४-६, १०-१ असा सुपर टायब्रेकमध्ये पराभव करून विजेतेपदाला गवसणी घातली. दुहेरीत याच गटात अंतिम फेरीत ताहिर अली व तुलसी सिद्धाराजू यांनी जॉर्ज थॉमस पुथुपरंबिल व एसजेएस रंधावा या अव्वल मानांकित जोडीचा ६-३, ६-३ असा पराभव करून विजेतेपद मिळवले. ७५ वर्षांवरील पुरुष एकेरीत अंतिम फेरीत अव्वल मानांकित वेंकटचलम स्वामीनाथन याने अव्वल मानांकित गोविंद कुमारचा ६-२, ५-७, १०-६ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. दुहेरीत अंतिम लढतीत अव्वल मानांकित गोविंद कुमार व धवल पटेल या जोडीने श्रीकांत पारेख व अनंता तातावर्ती यांचा ७-६(४), ७-५ असा पराभव करून विजेतेपद मिळवले.

८० वर्षांवरील पुरुष एकेरीत अंतिम फेरीत श्रीकांत पारेख याने जनार्दन कांबळेचा ६-१, ६-२ असा सहज पराभव करून विजेतेपदावर नाव कोरले. पारितोषिके माजी सनदी अधिकारी मीणा प्रभुदयाल, सचिव संरक्षण भारत सरकार यांच्या हस्ते देण्यात आली.यावेळी स्पर्धा संचालक रामा राव डोसा, संयोजन सचिव राजीव देसाई आणि आयटीएफ सुपरवायझर वैशाली शेकटकर आदी उपस्थित होते.



# सोलापूरच्या १० खेळाडूची राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

बेंगलोर येथे चार ते आठ ऑगस्ट यादरम्यान होणाऱ्या सब ज्युनिअर राष्ट्रीय ड्रायव्हिंग स्पर्धेसाठी व ५१ वी जूनियर राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेसाठी १० खेळाडूंची निवड झाली. त्यांचा महानगरपालिकेचे उपायुक्त रवी पवार यांनी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी सोलापूर शहर जिल्हा क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाचे अध्यक्ष दशरथ गुरव, प्रशिक्षक श्रीकांत शेटे, व्हॉलिबॉलचे आंतरराष्ट्रीय पंच अनिल गिराम, अविनाश अंधारे व श्री. तिलोटिया इत्यादी उपस्थित होते

**निवडलेले खेळाडू**

**मुली :** श्रावणी सूर्यवंशी, अपूर्व अंधारे, वंशिका चुंगीवडियार, रिया वदूल, मनस्वी सावंत, त्रिवेणी खांडेकर.

**मुले :** संकेत लिगाडे, रणवीर खाडे, वेदांत बांदल, अंश तिलोटिया.

# जिल्हा योगासन स्पर्धेत मेहता माध्यमिक शाळेस २१ पदके

**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

कै.वि.मो. मेहता माध्यमिक शाळने जिल्हा योगासन स्पर्धेत २५ पैकी १६ विद्यार्थ्यांनी ५ सुवर्ण, १० रौप्य व ६ ब्राँझ अशी २१ पदकांची कमाई केली. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना योगशिक्षिका प्रतिमा स्वामी



यांचे मार्गदर्शन लाभले. तीन विद्यार्थ्यांची व योगशिक्षिका स्वामी यांची राज्य स्पर्धेसाठी निवड झाली. शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन व मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

**कामगिरी केलेले खेळाडू**

**सब ज्युनिअर ग्रुप :** संहिता गद्रे (ट्रॅडिशनल, सुवर्ण व आर्टिस्टिक सिंगल, ब्राँझ), अनुष्का झाकणे (बॅक बेंड, ब्राँझ), दुर्वा जाधव (बॅक बेंड, रौप्य), अंजली मणुरे (फॉरवर्ड बैंड, रौप्य), वैष्णवी दाशाळ व साक्षी लांडगे (रिदमिक पेअर, ब्राँझ), साक्षी लांडगे व विद्या गुरव (रिदमिक पेअर, रौप्य), गौरी पोळ व समृद्धी जाधव (रिदमिक पेयर, उत्तेजनार्थ), समर्थ कुरे व असदअली शेख- आर्टिस्टिक पेयर, रौप्य), राजवर्धन बिराजदार व ऋतुराज शिंदे (रिदमिक पेअर, रौप्य), कपिल बिराजदार व सिद्धेश्वर बिराजदार (रिदमिक पेअर, ब्राँझ).

**ज्युनिअर ग्रुप :** वेदांत दाशाळ (बॅक बेंड व रिदमिक पेयर, सुवर्ण), गुरुकिरण कुरे (रिदमिक पेयर, सुवर्ण व सुपाईन रौप्य)

**खुला गट :** प्रतिमा स्वामी (फॉरवर्ड बेंड, रौप्य व सुपाईन, सुवर्ण)

# खेळाडूंच्या मातांचा गौरव हा अभिमानास्पद उपक्रम

### राजेश पटवर्धन यांचे प्रतिपादन, क्रीडा भारतीच्या वतीने खेळाडूंच्या मातांचा गौरव



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

खेळाडूंच्या विकासामध्ये त्यांच्या आई-वडिलांचा अतिशय मोठा वाटा असतो. अनेक गोष्टींचा त्याकरिता आपल्या मुलांचे क्रीडा करिअर कसे यशस्वी ठरेल याच्या विचार करत असते. अशा मातांचा जिजामाता पुरस्कार देऊन गौरव करणे ही अतिशय अभिमानास्पद गोष्ट आहे. त्याबद्दल मी क्रीडा भारती संस्थेचे मनः पूर्वक अभिनंदन करतो असे शिक्षण प्रसारक मंडळीच्या सोलापूर विभागाचे अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनी सांगितले.

क्रीडा भारती संस्थेतर्फे येथील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पदक विजेत्या खेळाडूंच्या मातांचा पटवर्धन व क्रीडा भारतीचे अखिल भारतीय कोश प्रमुख मिलिंद डांगे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या समारंभामध्ये दांडपट्टा खेळाडू भावना गड्डम हिची आई दुर्गा लक्ष्मी, पोलव्हॉल्टपटू नागम्मा बजे हिची आई शिवलीला, व्हॉलीबॉलपटू शिवाजी कुंभार हिची आई सुरेखा, मॅरेथॉन धावपटू डॉ. सत्यजित व डॉ. अभिजीत वाघचवरे यांची आई शीला, लाठीकाठी खेळाडू सोनाक्षी माडे हिची आई सरस्वती, कबड्डीपटू अनिकेत माने याची आई महानंदा, अरुण राठोड याची आई सोनुबाई, तिरंदाजीपटू तनिष्का ठोकळ हिची आई डॉ. सुकेशनी यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. यावेळी डांगे यांनी सांगितले की क्रीडा भारती तर्फे दरवर्षी हा उपक्रम साजरा केला जात असून या उपक्रमाबरोबरच अनेक खेळाडूंच्या हितकारक उपक्रम आयोजित केले जातात आणि त्याला खेळाडू आणि त्यांच्या पालकांचा अतिशय भरघोस प्रतिसाद मिळत असतो. खेळामुळेच समृद्ध जीवन घडू शकते त्यामुळे प्रत्येकाने खेळामध्ये भाग घेतलाच पाहिजे. या समारंभास ज्ञानेश्वर म्याकल, भक्तराज जाधव, प्रतीक तडवळकर, ओंकार दाते हे उपस्थित होते. श्री उपाध्ये यांनी प्रास्ताविक केले. सुधीर देव यांनी आभार मानले. डॉ. उज्ज्वल मालजी यांनी सूत्रसंचालन केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### बार्शीत कुरेशी जमात अन् शेतकऱ्यांचा मूक मोर्चा

**बार्शी, दि.१ ऑगस्ट-**

बार्शी तालुका कुरेशी जमात आणि स्थानिक शेतकऱ्यांनी गोरक्षकांकडून होणारा त्रास, कुरेशी समाजावरील अन्याय आणि बार्शी नगरपालिकेच्या कत्तलखाना व्यवस्थापनातील त्रुटींविरोधात तहसीलदार कार्यालयावर मूक मोर्चा काढला. बार्शी तालुका कुरेशी जमातचे अध्यक्ष अकबर हाजी मुश्ताक सौदागर आणि सचिव तकीम शुकूर सौदागर यांच्या नेतृत्वाखाली निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात कुरेशी जमात आणि शेतकऱ्यांनी खालील मागण्या मांडल्या आहेत. गोरक्षकांचा त्रास थांबवा, कुरेशी समाजावर होणारे अन्याय आणि त्यांच्याविरुद्ध दाखल होणाऱ्या पोलीस केसेस थांबवाव्या. जोपर्यंत न्याय मिळत नाही, तोपर्यंत बार्शी शहर आणि तालुक्यातील कुरेशी समाज जनावरांची खरेदी-विक्री बंद ठेवणार आहे. बार्शीत कत्तलखाना मंजूर असूनही नगरपालिकेच्या चुकीच्या व्यवस्थापनामुळे कुरेशी समाजावर उपासमरीची वेळ आली आहे. शेतकऱ्यांच्या भाकड जनावरांसाठी शासनाने अनुदान द्यावे, जेणेकरुन त्यांचे आर्थिक नुकसान टळेल. व्यवसाय बंदमुळे कुरेशी समाजावर आलेल्या आर्थिक संकटाला तोंड देण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात. निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की, मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार न झाल्यास आणि लवकर न्याय मिळाला नाही तर तीव्र आंदोलन केले जाईल.

### क्रीडा ज्ञान परीक्षा नियोजनासाठी क्रीडा भारतीची आज बैठक

**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

क्रीडा भारती सोलापूरचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांची एकत्रित बैठक क्रीडा ज्ञान परीक्षा नियोजनसाठी शनिवार २ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६.०० ते ७.३० या वेळेत नवी पेठेतील शिवस्मारक येथे आयोजित केली आहे. तरी सर्वांनी वेळेवर उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा भारतीचे अध्यक्ष डॉ. विलास हरपाळे व उपाध्यक्ष अरुण उपाध्ये यांनी केले आहे.

# शासन योजना यशस्वीतेसाठी महसूलचे प्रयत्न महत्वाचे

## मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ ऑगस्ट -**

महसूल विभागाच्या विविध सेवा व योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवून त्यांचा लाभ नागरिकांना मिळावा यासाठी १ ते ७ ऑगस्ट दरम्यान जिल्ह्यात विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. महसूल विभागातील सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी शासनाच्या योजना सर्वसामान्य पर्यंत पोहोचतील यासाठी अत्यंत काटेकोरपणे नियोजन करून त्याची अंमलबजावणी करावी असे आवाहन प्रभारी जिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केले.

जिल्हा प्रशासनाच्या वतीने 'महसूल सप्ताह २०२५' चा भव्य शुभारंभ आज श्री शिवछत्रपती रंगभवन येथे झाला. प्रभारी जिल्हाधिकारी श्री कुलदीप जंगम यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमास पोलीस आयुक्त श्री एम. राजकुमार, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उपजिल्हाधिकारी निवडणूक गणेश निराळे, उपजिल्हाधिकारी सुमित शिंदे, उपविभागीय प्रांताधिकारी सचिन इथापे, प्रांताधिकारी सदाशिव पडदुणे, अकलूज प्रांताधिकारी विजया पांगारकर, कुर्डुवाडी प्रांताधिकारी जयश्री आवाड, तहसीलदार निलेश पाटील, संजय भोसले, मदन जाधव, श्रीकांत पाटील, शिल्पा पाटील, शिल्पा ओसवाल यांच्यासह महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपजिल्हाधिकारी गणेश निराळे यांनी प्रास्ताविक केले. अमित माळी यांनी आभार मानले.



### पोलीस आयुक्तांचे विशेष मनोगत

पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी महसूल कर्मचाऱ्यांना शुभेच्छा देताना सांगितले की, शासनाचे कोणतेही महत्त्वाचे काम असो, त्याची जबाबदारी सर्वप्रथम महसूल विभागावरच असते. त्यांच्या कार्यक्षमतेमुळेच प्रशासन सुरळीत चालते.

### जनजागृती आणि विश्वासवृद्धीसाठी विशेष मोहिम

प्रभारी जिल्हाधिकारी श्री. जंगम यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात सांगितले की, महसूल विभागाच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे, शासनाच्या कामकाजाबाबत विश्वास वाढवणे आणि योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे हा महसूल सप्ताह साजरा करण्यामागचा मुख्य उद्देश आहे.

### महसूल कर्मचाऱ्यांचा गौरव

महसूल दिनानिमित्त २०२४-२५ मध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ५६ अधिकारी व कर्मचाऱ्यांचा प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. याशिवाय कार्यरत कर्मचाऱ्यांच्या १०वी व १२वीच्या गुणवंत पाल्यांचा देखील गौरव करण्यात आला. श्री जंगम यांनी महसूल कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करत त्यांच्या कार्याची प्रशंसा केली.

### सप्ताहभर उपक्रमांची मालिका

महसूल सप्ताहात जिल्ह्यात विविध जनजागृती मोहिमा, योजनांचे लाभ वितरण, माहिती सत्रे, कार्यशाळा आणि नागरिक संवाद कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. महसूल विभागाच्या कार्यपद्धतीबाबत पारदर्शकता आणि जनसंपर्क वाढवण्यावर भर दिला जाणार आहे.

# 'हिंदू आतंकवाद'च्या खोट्या षडयंत्राचा भांडाफोड

## षडयंत्र रचणाऱ्यांना कठोर शिक्षेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ ऑगस्ट -**

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात राष्ट्रीय अन्वेषण यंत्रणेच्या (NI) न्यायालयाने आज सर्व आरोपींना निर्दोष मुक्त केल्यामुळे अखेर 'हिंदु आतंकवाद' वा 'भगवा दहशतवाद' या नावाने रचलेले घृणास्पद काँग्रेसी षड्यंत्र उघडे पडले आहे. या षडयंत्र रचणाऱ्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते रमेश शिंदे यांनी केली आहे.

केवळ हिंदू असल्यामुळे राष्ट्रनिष्ठ साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर, कर्नल पुरोहित, मेजर उपाध्याय, सुधाकर चतुर्वेदी, समीर कुलकर्णी आणि अजय राहिरकर यांच्यासारख्या अनेक राष्ट्रप्रेमी व्यक्तींना अकारण वर्षानुवर्षे तुरुंगात डांबले. त्यांचा अमानुष मानसिक आणि शारीरिक छळ केला गेला. हा केवळ त्यांच्या विरोधातील अन्याय नव्हे, तर संपूर्ण हिंदू समाजाला बदनाम करण्याचा मोठा विखारी कट होता. त्यामुळे ही केस आता बंद करून चालणार नाही; हिंदूंना आतंकवादी ठरवण्याचे षड्यंत्र रचणाऱ्यांवर कठोर शिक्षा झालीच पाहिजे, अशी मागणी श्री. शिंदे यांनी मालेगाव बॉबस्फोटप्रकरणी न्यायालयाने दिलेल्या निकालानंतर केली आहे. ते पुढे म्हणाले की, मालेगाव प्रकरणात 'हिंदु आतंकवाद' या शब्दाचा वापर करणारे तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी नंतर ती चूक असल्याचे जाहीरपणे कबूल केले; पण त्यांनी तो शब्द कोणाच्या सांगण्यावरून वापरला? हिंदूंना बदनाम करण्यामागे कोणाचे षड्यंत्र होते ? त्या सूत्रधारांवरही कारवाई झाली पाहिजे. काँग्रेसचे नेते राहूल गांधी यांनी मध्यंतरी 'या देशात हिंदू दहशतवाद ही पाकिस्तानातील लष्करी इस्लामी आतंकवादापेक्षा मोठी समस्या आहे' असे विधान अमेरिकेच्या राजदूतासमोर केल्याचे विकिलिक्स केबलने उघड केले होते. हिंदू समाजावर दहशतवादाचा खोटा शिक्का मारणारे, राष्ट्रनिष्ठ व्यक्तींना यात अडकवणारे आणि तपासाच्या नावाखाली अन्याय करणारे सगळे दोषी शोधून त्यांना कठोर शिक्षा देणे हाच न्याय आहे.

# चला देवदर्शनाला जावू; साखरेवाडीच्या महिलांची निघाली टूर



### दिलीप माने यांच्या इच्छा व संकल्पनेला बळ मिळावे

दिलीप माने यांच्यावर तालुक्यातील जनतेची प्रंचड निष्ठा,प्रेम असून त्याचा वाढदिवस कार्यकर्ते वेगवेगळे उपक्रम राबवून साजरे करतात, त्यांच्या इच्छा, संकल्पनेला बळ मिळावे अशी प्रार्थना ग्रामदैवत सिध्देश्वर चरणी करत असून त्यांचा वाढदिवस व श्रावणमास हा दुधशर्करा योग असुन हा देवदर्शन सोहळा झिम्मा फुगडी,गाण्याने अधिक आनंदमयी करा असे सरपंच परिषद सोलापूर जिल्हा महिला अध्यक्षा कविता घोडके पाटील यांनी सांगितले.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. १ ऑगष्ट -**

माजी आमदार व श्री सिध्देश्वर कृषी उत्पन्न बाजार समितिचे सभापती दिलीप माने यांच्या वाढदिवस व श्रावणमासाचे औचित्य साधून साखरेवाडी येथील ५८ महिलांचा देवदर्शन सोहळा घडवून आणला असून दिलीप माने यांच्या संकल्पनेला अधिक बळ मिळावे अशी देवाचे चरणी मागणी केली असल्याचे उपसरपंच रेवणसिध्द (पप्पू) साखरे यांनी सांगितले. श्रावणमास निमित्त देवदर्शनाला ट्रिप काढण्याची इच्छा साखरेवाडी येथील महिलांनी व्यक्त केली.

त्यांच्या भावनांचा आदर करत ५८ महिला एसटी महामंडळाचे लालपरीमध्ये रामलिंग, बोदले महाराज, सिध्देश्वर,यमाई देवी या ठिकाणी देवदर्शन करुन आल्या. साखरेवाडी येथील नागनाथ मंदीर समोर बसची रेवती साखरे, सरपंच परिषद सोलापूर जिल्हा महिला अध्यक्षा कविता घोडके पाटील यांच्या हस्ते पुजा करण्यात आली.

माने परिवाराचे साखरे परिवारावर असलेल्या कुटुंबीय छत्रामुळे आम्ही वाटचाल करु शकलो.गावच्या विकास कामांसाठी त्यांनी गावावर विषेश लक्ष दिले.त्यांचा वाढदिवस गावातील महिलांच्या देवदर्शनाने साजरा करुन त्यांना सामाजिक कामास बळ व संकल्पनेस शुभेच्छा देण्यासाठी साखरेवाडी येथील महिलांना देवदर्शन सोहळा घडवून आणल्याचे उपसरपंच साखरे यांनी सांगितले


**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGE MY OID NAME FROM **RAJESH JAYAWANT RAUT** TO NEW NAME AS **RAJESH JAYWANT RAUT** HENCE FOR THIS DIRECTION IN FUTURE.

OID NAME -
**RAJESH JAYAWANT RAUT**
NEW NAME -
**RAJESH JAYWANT RAUT**

ADDRESS - 2553, RAUT PLOT, BARSHI TAL : BARSHI, DIST : SOLAPUR MAHARASHTRA PIN - 413401
MO. 9730038385
**Affidavit No. - 01972/2025**
**Date : 01/08/2025**

**जामश्री रिअलटी लिमिटेड**

सीआयएन: L17111PN1907PLC000258
नोंदणीकृत कार्यालय: फतेहचंद दमाणी नगर, स्टेशन रोड, सोलापूर, महाराष्ट्र - ४१३ ००१
इमेल आयडी: jammill1907@gmail.com

**सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक मंगळवार दि. १२ ऑगस्ट २०२५ रोजी ६०१-बी, ६वा मजला, मोतीमहल, १९५ जे. टी. रोड, चर्चगेट, मुंबई ४०००२० येथे दुपारी १२.३० वाजता (भाप्रवे) इतर गोष्टीसह ३० जुन २०२५ रोजी संपलेल्या पहिल्या तिमाही च्या कालावधी करीताचा कंपनीचे अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष ग्राह्य धरण्यासाठी आणि संमत करण्यासाठी घेण्यात येणार आहे.

तारीख : ०१.०८.२०२५
ठिकाण : सोलापूर

जामश्री रिअलटी लिमिटेड करिता
सही/-
राजेश दमाणी
संयुक्त व्यवस्थापकीय संचालक

**Classifieds**

**भरतीविषयक**

सिक्युरिटी गार्ड भरती चालू आहे. महिला व पुरुष ८ व १२ तासांसाठी सोलापूर शहर व MIDC योग्य पगार दिला जाईल. मो. ९७३६१२७९९९

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

**आज** रात्रौ ९.३० वा. स्मृति मंदिरात **हास्याची धुवांधार बरसात**

ज्येष्ठ अभिनेते पद्मश्री **अशोक सराफ** यांनी गौरविलेले कौटुंबिक धमाल कॉमेडी

प्रसाद खांडेकर सादर करीत आहे
व्ही आर प्रॉडक्शन प्रकाशित
प्राजक्ता प्रॉडक्शन्स आणि सोहम निर्मित
महाराष्ट्र शासनाच्या अनुदानास पात्र नाटक

लेखक दिग्दर्शक
प्रसाद महादेव खांडेकर

**हास्य जत्रा फेम कलाकार**
प्रसाद खांडेकर, नम्रता संभेराव, ओंकार राऊत, प्रथमेश शिवलकर, भक्ती देसाई, भाग्यश्री मिलिंद





**थेट तुमच्या घरातून**
निर्मिती: प्रसाद खांडेकर, सचिन कदम
सूत्रधार: गोट्या सावंत

फोन बुकिंग संपर्क : शिवाजी उपरे 9623004299

तिकिट विक्री bookmyshow आणि नाट्यगृहावर सुरु


## लवाद न्यायाधिकरण

**(लवाद - ॲड. अजित एम. देशमुख, एम. ए. मराठी, एम.ए (एम.सी. जे). एम कॉम, एल.एल.बी)**

**एकल लवाद न्यायालय**

**लोकमंगल मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटी लि. सोलापूर**

**प्लॉट नं. ९४/६६, मित्रनगर, रब्बी रिसर्च सेंटरचे मागे, शेळगी, सोलापूर-४१३००६**

### जाहिर प्रगटन जिल्हा - लातूर

या जाहिर नोटीसीने खाली दिलेल्या सामनेवाले यांना कळविण्यात येते की, दावेदार **लोकमंगल मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटी लि, सोलापूर** या संस्थेने खाली नमुद कर्जदार, जामीनदारांविरुद्ध थकीत कर्जाची रक्कम वसुली अवॉर्ड मिळणेकामी लवाद न्यायालयाकडे दावे दाखल केले असून, कर्जदार जामीनदार यांनी दिलेल्या अधिकृत, नोंद पत्यावर लवाद न्यायालयाकडून पाठविलेल्या (आर.पी.ए.डी.ने) लवाद दाव्याचे नोटीसा रजिस्टर पोस्टाने न बजावता परत आले आहे.

न्यायाच्या दृष्टीने संबंधित कर्जदार व जामिनदारांना योग्य संधी देऊन न्याय निवाडा करणेकामी हि जाहिर नोटिस प्रसिध्दीस दिली आहे, खालील नमूद सामनेवाले यांनी पुढील निर्देशित तारखेपूर्वी दि, ११/०८/२०२५ रोजी अथवा तारखेस वर नमूद पत्यावर लवाद न्यायालयासमोर उपस्थित राहून लेखी म्हणणे न मांडल्यास एकतर्फी न्यायनिवाडा करण्याचे सुचित करत आहे.

| अ. क्र. | लवाद दावा क्र व दिनांक | नाव | | शाखा | पत्ता | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | लवाद दावा क्र. २१४/२०२१ | लिंबाजी शामराव सुर्यवंशी (मयत) दिगंबर लिंबाजी सूर्यवंशी (वारस) | कर्जदार | निलंगा | रा.मु.पो. माकणी, थोर, ता.निलंगा, जि. लातूर - ४१३५२२ | १,२२,२६३ |
| | ११/०८/२०२५ | कासीम जिलानी सय्यद | जामिनदार | | रा.मु.पो. बाभळगाव, ता, निलंगा, जि. लातूर ४१३५२१ | |
| | | कांबळे जिजाबाई पिराजी | जामिनदार | | रा. मु. पो. आण्णाभाऊ साठे नगर, ता. निलंगा, जि. लातूर ४१३५२१ | |

येणे प्रमाणे जाहिरनोटीस प्रसिध्द केली. ता.३०/०७/२०२५

सही
**लवाद अधिकारी**
ॲड. अजित एम. देशमुख, एम. ए. मराठी, एम.ए (एम.सी. जे) एम कॉम. एल.एल.बी

## मध्य रेल्वे

**सोलापूर विभाग**
**ई-निविदा सूचना**
**निविदा सूचना क्रमांक**
**SUR-N-T-2025-2026-14**
**दिनांक : 31/07/2025**

डीआरएम (एस अँन्ड टी) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर यांनी भारताच्या राष्ट्रपतींच्यावतीने आणि त्यांच्या वतीने रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा मागवल्या आहेत. खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांना माहिती द्या :- कामाचे नाव आणि त्याचे परिसर : मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात विविध वस्तूंचे शेड आणि चेंजिंग रूमच्या विकासासाठी एफओआयएस नेटवर्कसह दूरसंचार सुविधेची तरतूद/स्थलांतर. निविदा क्रमांक SUR-N-T-2025-2026-14, कामाची किंमत रु. 1,22,45,668.66/-, निविदा फॉर्मची किंमत - शून्य, बयाणा रक्कम रु. 2,11,200.00/- जमा करायची आहे, काम पूर्ण करण्याचा कालावधी - 8 महिने. निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ www.ireps.gov.in: 22.08.2025 रोजी 15.30 वाजता तपशील IREPS वेबसाइटवर उपलब्ध आहेत. शुद्धीपत्रक/दुरुस्ती असल्यास केवळ वरील ई-खरेदी वेबसाइटवर अपलोड केली जाईल. फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/पोस्टल/ई-मेल, फॅक्स, हस्तलिखित निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदारांना विनंती आहे की वर्ग III डिजिटल स्वाक्षरी मिळवा. कंपनीच्या नावासह प्रमाणपत्र घ्या आणि www.ireps.gov.in वर नोंदणी करा. बयान रक्कम (EMD) नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक गॅरंटी स्वरूपात स्वीकारली जाईल. जो निविदा सादर करण्याच्या शेवटच्या तारखेपूर्वी (म्हणजे बोली सादर करण्याची शेवटची तारीख वगळून) निविदा दस्तऐवजात दर्शविलेल्या अधिकाऱ्याला व्यक्तीशः वितरित केला पाहिजे. अधिक माहितीसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या.

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक**
SUN 72 **एस अँड टी शाखा**

टिकट के लिए UTS APP डाउनलोड करें

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे झाडी, ता. बार्शी येथील व त्या परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे - झाडी, ता. बार्शी येथील जमीन, गट नं. १९८ क्षेत्र ०० हे. ५६ आर, आकार ०० रू. १२ पै., या जमीनीपैकी मधील बाजू पैकी उत्तरेकडील बाजूची प्लॉटची जमीन / जागा, याची पुर्व-पश्चिम रूंदी फुट ३४ व दक्षिण-उत्तर लांबी फुट ५९ याचे क्षेत्रफळ २००० चौ. फुट या मापाची प्लॉटची जागा, यासी **चतुःसिमा :- पुर्वेस -** ८ फुट रस्ता, **दक्षिणेस -** सदर गटातील उर्वरित क्षेत्र, **पश्चिमेस -** सचिन नरसू मते, **उत्तरेस -** गोपिनाथ माने याची जागा, येणेप्रमाणे चतुःसिमापूर्वक वर्णनाची प्लॉटची जागा, आतील सर्व तदंगभूत वस्तुसह, याचा ग्रामपंचायत घर नंबर ३१९ असून याचे पाणी व वागणूक पूर्व बाजूने जाते व आहे.

सदरची प्लॉटची जागा संपत रामहारी मते, रा. झाडी, ता. बार्शी यांनी, आमचे अशिलास, र.रू. १,००,०००/- (अक्षरी रू. एक लाख) या किंमतीस, कायमखुष खरेदी देण्याचे ठरवून, ता. २४/०९/२०१४ रोजी सदरची रक्कम रोख घेवून, आमचे अशिलाचे हक्कात, करारपत्राचा नोटरीकृत दस्त लिहून नोंदवून दिला. तसेच कराराचा एक भाग म्हणून, सदर मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जाही, त्यांनी आमचे अशिलास दिला. त्या दिवशीपासून सदर जागेत, आमचे अशिलाची मालकी हक्काने कब्जेवहीवाट होती व आहे.

सदरची जागा झाडी गावचे गावठाणालगत असल्याने, ग्रामपंचायत झाडी यांनी, सदरची जागा गावठाणात समाविष्ट करून, त्या जागेस ग्रामपंचायत घर नं. ३१९ हा दिलेला आहे. आमचे अशिल मालक या नात्याने, सदर ग्रामपंचायतीचे कर भरत आलेले आहेत.

सदर जागेचे ग्रामपंचायत मालमत्ता रजिष्टरला, आमचे अशिलाचे नावाची नोंद झालेली आहे. परंतु सदर गट नं. १९८ जमीनीचे रेकॉर्ड ऑफ राईटला, संपत मते यांचे नावाची पोकळ नोंद आहे. सदर पोकळ नोंदीचा गैरफायदा घेवून, सदर संपत मते सदर मिळकतीची विल्हेवाट लावण्याचे व रक्कम हडप करण्याच्या प्रयत्नात आहे. तेव्हा सदर संपत मते याचेशी, सदर जमीनीस असणाऱ्या पोकळ नोंदी आधारे, कोणीही, त्यांचे बरोबर, गहाण, दान, लिज, भाडेपट्टा, बक्षिसपत्र, खरेदी, वहीवाटीचे हक्क, फेडपत्र, तसेच अन्य हस्तांतरणाचे स्वरूपाचे व्यवहार आणि कर्ज बोजाचे स्वरूपाचे व्यवहार करू नयेत, केलेस ते बेकायदेशीर व रद्दबातल होतील. तसेच आमचे आशिलाचे हक्क हिस्यावर बंधनकारक राहणार नाहीत. तशा स्वरूपाचे व्यवहार करणाऱ्यावर आमचे आशिल कायदेशीर कारवाई करतील. मग खर्चाची व परिणामाची संपूर्ण जबाबदारी त्यांचेवरच राहील. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून हि जाहीर नोटीस दिली. कळावे ता. ०१/०८/२०२५

सही/-
**ॲड. श्री. गुंड एस.एम. (लाडोळेकर)**
**ॲड. श्री. गुंड ए.एस. (लाडोळेकर)**
**ॲडव्होकेटस्, बार्शी 'सदानंद' ७३०/२/३७**
**सिध्देश्वर नगर, कासारवाडी रोड,**
**बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर**
**अभिजित सुरेश जगदाळे, रा. झाडी, ता. बार्शी**
**तर्फे ॲडव्होकेट्स**

**महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग**
**तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात**
**संकलन - अभिलेख कक्ष**

दुरध्वनी नं.-०२१८१-२२०२३३ Email- tahakkalkotgmail.com

जा.क्र.२०२५/अभिलेख/कावि/ ३३/२०२५ दि.२८/७/२०२५

### जाहिर प्रसिध्दीकरण

प्रति,
**श्रीम. राजाबी अहमद बिराजदार**
रा. कोर्सेगांव ता. अक्कलकोट -- **अर्जदार**
विरुध्द
जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय
ग्रामपंचायत, कोर्सेगांव ता अक्कलकोट -- **सामनेवाला**

ज्याअर्थी, यातील राजाबी अहमद बिराजदार ता. अक्कलकोट जि. सोलापूर यानी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांचा जन्म दि.०१/०१/१९७६ रोजी मौजे कोर्सेगांव ता. अक्कलकोट येथील राहत्या घरी झाला आहे. परंतू माझ्या जन्माची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी त्याच्या जन्माची नोंद करुन राजाबी अहमद बिराजदार या नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) अन्वये मा. तहसिलदार अक्कलकोटच्या न्यायालयात दि. २३/०४/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांनी जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे, मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल.

हे आज दि. १०/०७/२०२४ रोजी आमचे सहीने च कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे.

शिक्का

सही/-
**(विनायक मगर)**
**तहसीलदार अक्कलकोट**

## जाहीर प्रसिध्दीकरण

पुढील नेमली तारीख ०३/०९/२०२५
दि.कि.अ.नं. ९२/२०२५ नि. ०५

### बार्शी येथील मे. जिल्हा न्यायाधिश साहेब यांचे न्यायालयात

**तन्वी भास्कर निमगिरे,**
वय - १५ वर्षे, धंदा - शिक्षण,
रा. वरकुटे (मलवडी), ता. माण, जि. सातारा
**अज्ञान याचे अ.पा.क. श्रीमती नयना भास्कर निमगिरे,**
वय - ३४ वर्षे, धंदा - घरकाम, रा. सदर — **अर्जदार**
विरुध्द
**महाराष्ट्र शासन** - **सा.वाला**

ज्याअर्थी डि. सोलापूर, सब डि. करमाळा यापैकी मौजे जेऊरवाडी ग्रामपंचायत मिळकत नं. १९ क्षेत्र ० हे. २६ आर + पो.ख. ०.०१ आर एकूण ० हे. २७ आर आकार रु. ०.४५ पैसे यापैकी अर्जदार व तिची अ.पा.क. आई याचे हिश्याची मिळकत क्षेत्र ० हे. ०५.५० आर यासी **चतुःसिमा :- पुर्वेस -** कुंभेज जेऊरवाडी रस्ता, ग.नं.१८, **पश्चिमेस -** ग.नं. १९ पैकी अरुण निमगीरे व **उत्तरेस -** गोरख निमगिरे यांची जमीन येणेप्रमाणे मिळकत आतील तदंगभूत वस्तुसह यामध्ये अज्ञान अर्जदार तन्वी भास्कर निमगिरे हिचे हिश्याची मिळकत. अज्ञान अर्जदार यांचा सांभाळ, शिक्षण, पालनपोषण सर्व काही अज्ञान अर्जदाराची आई हिच आई या नात्याने पाहत आहेत. अज्ञान अर्जदाराचे वडिल मयत असून अज्ञान अर्जदारचे शिक्षणाचा दिवसेंदिवस वाढत चाललेला खर्च व भविष्यातील शिक्षणाचा खर्च करणेकरीता त्यांचे अ.पा.क. आईनी वर नमूद जमीन विक्रीस काढली त्याची माहिती प्रकाश साहेबराव शिंदे रा. कुंभेज, ता. करमाळा यांचेशी व्यवहार ठरवलेला आहे. तथापि, सदर मिळकतीचे मालक हे अज्ञान असलेने अज्ञानाचे हिश्याची मिळकत विक्रीकरीता मा. जिल्हा न्यायालयाची परवानगी आवश्यक आहे. सदरची कृती योग्य व गरजेची असून अज्ञानाचे हिताची आहे, असे कथन करुन अर्जदाराचेवतीने त्यांचे अज्ञान पालनकर्ते आईनी या मे. न्यायालयात अज्ञानाची मिळकत विक्री करणेस परवानगी मागणेचा अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांच्या वरील मागणी, कथनासंबंधाने कोणाचे काही हरकती, तक्रारी, आक्षेप असल्यास वा सदर मिळकतीत अन्य कोणाचे काही हक्क अधिकार असलेस संबंधीतांनी ही जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर पुढील नेमली तारीख ०३/०९/२०२५ रोजी या मे. कोर्टात स्वतः अगर वकीलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे, हरकती, तक्रारी सादर कराव्यात. मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास मा. न्यायालयाचे प्रकरणी पुढील यथायोग्य आदेश होतील.

हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्कयानिशी प्रसिध्दी केले असे. तारीख : २९/०७/२०२५

कोर्टाचा शिक्का

सही/-
**अधिक्षक**
**अपर जिल्हा न्यायालय, बार्शी**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि. अर्ज नंबर ८४/२०२५
पुढील नेमलेली तारीख: ०२/०९/२०२५
नि.नं.: ०५

### बार्शी येथील मे. सि.ज.ज्यु.डि. साहेब यांचे कोर्टात

**(मे. आर.पी. बागडे, ४थे सह दिवाणी न्यायाधीश)**

१) **जमुना संजय चित्राव**
वय - ४८ वर्षे, धंदा - घरकाम
रा. जामगांव (आ), ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **सरोजनी रामलिंग चित्राव**
वय - ८५ वर्षे, धंदा - घरकाम, रा. सदर.
३) **पल्लवी संजय चित्राव**
वय - २६ वर्षे, धंदा - घरकाम, रा. सदर.
४) **प्राची संजय चित्राव**
**(लग्नानंतरचे नाव प्राची हृषीकेश पिंगळे)**
वय - २४ वर्षे, धंदा - घरकाम
रा. उपळाई रोड, बार्शी, जि. सोलापूर. — **अर्जदार**
विरुध्द
**कोणीही नाही** - **सामनेवाला**

**अर्ज Bombay Regulation VIII प्रमाणे**

ज्याअर्थी अर्जदार नं. १ यांचे पती अर्जदार नं. २ यांचा मुलगा अर्जदार नं. ३ व ४ यांचे वडील मयत श्री. संजय रामलिंग चित्राव यांचा मृत्यू दि ०९/०५/२०१७ रोजी जगदाळे मामा हॉस्पिटल, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर याठिकाणी अल्पशा आजाराने मृत्यू झाला आहे. व अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे त्यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे करिता बार्शी येथील दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर बार्शी येथे अर्जदारांनी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मयत श्री. संजय रामलिंग चित्राव यांना इतर कोणी वारस नाहीत. असेल तर त्याबाबत काही म्हणणे असल्यास जाहीर प्रसिध्दीकरणापासून ३० दिवसांचे आत अथवा पुढील नेमलेली तारीख ०२/०९/२०२५ रोजी मे. कोर्टात हजर राहून आपले म्हणणे व हरकत लेखी स्वरुपात पुराव्यानिशी दाखल करावी अन्यथा मुदतीत कोणाचीही हरकत वा म्हणणे आले नाही तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदार यांना अर्जाप्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. हे प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सही शिक्क्यानिशी दिले असे. ता. ०१/०८/२०२५

सही-
**कनिष्ठ लिपिक**

कोर्टाचा शिक्का

सही-
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर,**
**बार्शी. ता बार्शी, जि. सोलापूर**










**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)